


# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अकोला, गुरुवार ५ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०








## इराण आणि इस्त्रायलमधील संघर्ष भारताच्या सीमेपर्यंत

# इराणच्या युद्धनौकेवर अमेरिकेचा पाण्याखालून हल्ला; ८० ठार





*विशाखापट्टणम येथे १५-२५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयोजित इंटरनॅशनल फ्लीट रिव्ह्यू (IFR) २०२६ आणि मिलन २०२६ चे नेतृत्व राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले. भारत आणि मित्र राष्ट्रांची जहाजे, पाणबुड्या आणि विमानांचा समावेश असलेल्या या भव्य सोहळ्यात राष्ट्रपती मुर्मू यांची उपस्थिती होती. सशस्त्र दलांच्या सर्वोच्च कमांडर म्हणून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी INS सुमेधावरून IFR 2026 चे पुनरावलोकन (Review) केले होते यात ५० हून अधिक देशांची नौदले, जहाजे, आणि विमाने या कार्यक्रमात सहभागी झाली होती यात या जहाजाचा समावेश होते.*





***#IFR2026_India आणि #MILAN2026 मध्ये सहभागी होण्यासाठी विशाखापट्टणम येथे आगमन झाल्यावर भारतीय नौदलाने इराणी नौदलाच्या आयआरआयएस देना यांचे स्वागत केले, जे दोन्ही राष्ट्रांमधील दीर्घकालीन सांस्कृतिक संबंधांचे प्रतिबिंब आहे. (एक क्षण)***

**विशाखापट्टणम/वृत्तसंस्था :** हिंदी महासागरात श्रीलंकेच्या किनारपट्टीजवळ अमेरिकेच्या एका अण्वस्त्रसज्ज पाणबुडीने इराणची युद्धनौका आयआरआयएस देना ही टार्पेडोचा हल्ला करुन बुडवल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या भीषण हल्ल्यात किमान ८० जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात आली असून, दुस-या महायुद्धानंतर एखाद्या शत्रु राष्ट्राची युद्धनौका टार्पेडोने बुडवण्याची ही पहिलीच वेळ असल्याचा दावा अमेरिकेने केला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे ही युद्धनौका काही दिवसांपूर्वीच भारतात सरावासाठी आली होती. इराण आणि इस्त्रायलमधील संघर्ष आता हिंदी महासागरापर्यंत आणि भारताच्या सीमेपर्यंत पोहोचल्याचे या घटनेवरून दिसत आहे. अमेरिकेने थेट इराणी युद्धनौका बुडवल्यामुळे आता इराणकडून कोणती प्रतिक्रिया येते, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. हिंदी महासागरात वाढलेला हा तणाव जागतिक शांततेसाठी धोक्याची घंटा मानली जात आहे.

अमेरिकेचे संरक्षण सचिव पिट हेगसेथ यांनी या हल्ल्याची पुष्टी दिली. 'आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रात स्वतःला सुरक्षित समजणा-या इराणच्या युद्धनौकेला आमच्या पाणबुडीने जलसमाधी दिली आहे. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या हत्येचा प्रयत्न करणा-या युनिटच्या म्होरक्याला काल कंठस्नान घालण्यात आले. इराणने ट्रम्प यांना मारण्याचा प्रयत्न केला होता, पण अखेर विजय (पान २ वर)

## सोने स्वस्त

**नवी दिल्ली-** आज ४ मार्च रोजी सोने आणि चांदीच्या दरात घसरण झाली आहे. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन नुसार, १० ग्रॅम



२४ कॅरेट सोन्याचा भाव ६,१४९ रुपयांनी घसरून १.६१ लाखांवर आला आहे. यापूर्वी सोमवारी त्याची किंमत प्रति १० ग्रॅम १.६७ लाख रुपये होती. तर, एक किलो चांदी २३,४१७ रुपयांनी घसरून २.६६ लाखांवर आली आहे. यापूर्वी सोमवारी त्याची किंमत प्रति किलो २.८९ लाख रुपये होती. सोने-चांदीच्या दरातील ही घसरण प्राफिट बुकिंगमुळे झाली आहे. मंगळवारी होळीच्या सणामुळे बाजार बंद होता.
**वाहतूक आणि सुरक्षाः** सोने एका शहरातून दुस-या शहरात नेण्यासाठी इंधन आणि मोठ्या (पान २ वर)

## घरगुती गॅस पुरवठ्यावर मोठे संकट

# इराण अमेरिका युद्धाची थेट झळ; फक्त 25 दिवसांचाच साठा शिल्लक

**मुंबई/प्रतिनिधी :** अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव वाढला. मात्र, या युद्धाचा फटका अनेक देशांना थेटपणे बसताना दिसत आहे. या युद्धाच्या पार्श्वभूमीवर तेलाच्या किंमतींमध्ये मोठी वाढ होण्याचा अंदाज आहे. यासोबतच इराणने मोठा निर्णय घेत महत्वपूर्ण सागरी मार्ग बंद केल्याने टँकर येण्याची संख्या कमी आहे. स्टेट ऑफ होर्मुजवर तेल टँकर ८० टक्के कमी झाल्याचे स्पष्ट झाले. यासोबतच जल मार्गावर हजारो टँकरचा मोठा जाम लागला आहे.



स्टेट ऑफ होर्मुज मार्ग बंद ठेवण्याचा निर्णय अमेरिकेने घेतला. यासोबतच येथे टँकर दिसले तर आम्ही आग लावू अशी धमकीही इराणकडून देण्यात आली, ज्यामुळे अनेक देश कोंडीत सापडली आहेत. इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या, एलपीजी आणि एलएनजी गॅसच्या किंमतीत वाढ होत आहे. यासोबतच भारत देखील तणावात आहे. कारण सध्याच्या स्थितीला भारतात होणारी उर्जेची आयात जवळपास बंद झाली. भारत सरकारकडून स्पष्ट करण्यात आले की, भारताकडे भरपूर सध्या स्टाक आहे. पुढील २५ दिवस चालेल इतका साठा भारताकडे डिझेल आणि पेट्रोलचा आहे. भारताकडून हे देखील स्पष्ट करण्यात आले की, भारत सध्या इतर पर्यायी गोष्टींसाठी प्रयत्न करत आहे. युद्ध जास्त काळ सुरू राहिले तर स्वयंपाक घरात लागणार एलपीजी गॅसचा तुटवडा निर्माण होउ शकतो. (पान २ वर)







## अमेरिका अन् इस्त्रायलच्या हल्ल्यात 1045 इराणी नागरिकांचा मृत्यू

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेला संघर्ष दिवसेंदिवस तीव्र होत आहे. इराणच्या सरकारी टेलिव्हिजनने दिलेल्या माहितीनुसार, आजही(बुधवारी) सकाळी इराणची राजधानी तेहरान येथे अनेक स्फोटांचे आवाज ऐकू आले. दरम्यान, इस्त्रायलने सांगितले की, इराणकडून डागण्यात आलेल्या मिसाइल हल्ल्यांमुळे त्यांना एअर डिफेन्स



सिस्टम सक्रिय करावी लागली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही या युद्धाबाबत प्रतिक्रिया देताना हा संघर्ष अजून काही आठवडे किंवा त्याहून अधिक काळ चालू शकतो, असे संकेत दिले आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार, इराणमधील एका सरकारी संस्थेच्या हवाल्याने दावा केला जातोय की, अमेरिका आणि इस्त्रायलसोबत सुरू असलेल्या संघर्षात इराणमध्ये आतापर्यंत किमान १,०४५ लोकांचा मृत्यू झाला आहे. फाउंडेशन ऑफ मार्टर्स अँड व्हेटरन्स अफेयर्स या संस्थेने सांगितले की, ही संख्या ओळख पटवून दफनासाठी तयार करण्यात आलेल्या मृतदेहांच्या आधारावर निश्चित करण्यात आली आहे.

**इराणकडून मिसाइल आणि ड्रोन हल्ले-** इस्त्रायलने इराणच्या मिसाइल लान्चर आणि एका अणु संशोधन केंद्रावर हवाई हल्ले केले होते. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने इस्त्रायल, अमेरिकन दूतावास आणि गल्फ प्रदेशातील काही भागांना लक्ष्य केले. या हल्ल्यांमुळे उर्जा पुरवठा आणि हवाई उड्डाणांवर परिणाम झाल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, अमेरिकेच्या संरक्षण विभाग पेंटागनने कुवैतमधील कमांड सेंटरवर झालेल्या ड्रोन हल्ल्यात मृत्यू झालेल्या अमेरिकन आर्मी रिझर्व्हच्या चार सैनिकांची ओळख जाहीर केली आहे.






# जनमाध्यम

epaper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा, गुरुवार ५ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०











## इराण आणि इस्त्रायलमधील संघर्ष भारताच्या सीमेपर्यंत

# इराणच्या युद्धनौकेवर अमेरिकेचा पाण्याखालून हल्ला; ८० ठार





*विशाखापट्टणम येथे १५-२५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयोजित इंटरनॅशनल फलीट रिव्ह्यू (IFR) २०२६ आणि मिलन २०२६ चे नेतृत्व राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले. भारत आणि मित्र राष्ट्रांची जहाजे, पाणबुड्या आणि विमानांचा समावेश असलेल्या या भव्य सोहळ्यात राष्ट्रपती मुर्मू यांची उपस्थिती होती. सशस्त्र दलांच्या सर्वोच्च कमांडर म्हणून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी INS सुमेधावरून IFR 2026 चे पुनरावलोकन (Review) केले होते यात ५० हून अधिक देशांची नौदले, जहाजे, आणि विमाने या कार्यक्रमात सहभागी झाली होती यात या जहाजाचा समावेश होते.*





***#IFR2026_India आणि #MILAN2026 मध्ये सहभागी होण्यासाठी विशाखापट्टणम येथे आगमन झाल्यावर भारतीय नौदलाने इराणी नौदलाच्या आयआरआयएस देना यांचे स्वागत केले, जे दोन्ही राष्ट्रांमधील दीर्घकालीन सांस्कृतिक संबंधांचे प्रतिबिंब आहे. (एक क्षण)***

**विशाखापट्टणम/वृत्तसंस्था :** हिंदी महासागरात श्रीलंकेच्या किनारपट्टीजवळ अमेरिकेच्या एका अण्वस्त्रसज्ज पाणबुडीने इराणची युद्धनौका आयआरआयएस देना ही टार्पेडोचा हल्ला करुन बुडवल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या भीषण हल्ल्यात किमान ८० जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात आली असून, दुस-या महायुद्धानंतर एखाद्या शत्रु राष्ट्राची युद्धनौका टार्पेडोने बुडवण्याची ही पहिलीच वेळ असल्याचा दावा अमेरिकेने केला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे ही युद्धनौका काही दिवसांपूर्वीच भारतात सरावासाठी आली होती. इराण आणि इस्त्रायलमधील संघर्ष आता हिंदी महासागरापर्यंत आणि भारताच्या सीमेपर्यंत पोहोचल्याचे या घटनेवरून दिसत आहे. अमेरिकेने थेट इराणी युद्धनौका बुडवल्यामुळे आता इराणकडून कोणती प्रतिक्रिया येते, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. हिंदी महासागरात वाढलेला हा तणाव जागतिक शांततेसाठी धोक्याची घंटा मानली जात आहे.

अमेरिकेचे संरक्षण सचिव पिट हेगसेथ यांनी या हल्ल्याची पुष्टी दिली. 'आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रात स्वतःला सुरक्षित समजणा-या इराणच्या युद्धनौकेला आमच्या पाणबुडीने जलसमाधी दिली आहे. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या हत्येचा प्रयत्न करणा-या युनिटच्या म्होरक्याला काल कंठस्नान घालण्यात आले. इराणने ट्रम्प यांना मारण्याचा प्रयत्न केला होता, पण अखेर विजय (पान २ वर)

## सोने स्वस्त

**नवी दिल्ली-** आज ४ मार्च रोजी सोने आणि चांदीच्या दरात घसरण झाली आहे. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन नुसार, १० ग्रॅम



२४ कॅरेट सोन्याचा भाव ६,१४९ रुपयांनी घसरून १.६१ लाखांवर आला आहे. यापूर्वी सोमवारी त्याची किंमत प्रति १० ग्रॅम १.६७ लाख रुपये होती. तर, एक किलो चांदी २३,४१७ रुपयांनी घसरून २.६६ लाखांवर आली आहे. यापूर्वी सोमवारी त्याची किंमत प्रति किलो २.८९ लाख रुपये होती. सोने-चांदीच्या दरातील ही घसरण प्राफिट बुकिंगमुळे झाली आहे. मंगळवारी होळीच्या सणामुळे बाजार बंद होता.
**वाहतूक आणि सुरक्षाः** सोने एका शहरातून दुस-या शहरात नेण्यासाठी इंधन आणि मोठ्या (पान २ वर)

## घरगुती गॅस पुरवठ्यावर मोठे संकट

# इराण अमेरिका युद्धाची थेट झळ; फक्त 25 दिवसांचाच साठा शिल्लक

**मुंबई/प्रतिनिधी :** अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव वाढला. मात्र, या युद्धाचा फटका अनेक देशांना थेटपणे बसताना दिसत आहे. या युद्धाच्या पार्श्वभूमीवर तेलाच्या किंमतींमध्ये मोठी वाढ होण्याचा अंदाज आहे. यासोबतच इराणने मोठा निर्णय घेत महत्वपूर्ण सागरी मार्ग बंद केल्याने टँकर येण्याची संख्या कमी आहे. स्टेट ऑफ होर्मुजवर तेल टँकर ८० टक्के कमी झाल्याचे स्पष्ट झाले. यासोबतच जल मार्गावर हजारो टँकरचा मोठा जाम लागला आहे.



स्टेट ऑफ होर्मुज मार्ग बंद ठेवण्याचा निर्णय अमेरिकेने घेतला. यासोबतच येथे टँकर दिसले तर आम्ही आग लावू अशी धमकीही इराणकडून देण्यात आली, ज्यामुळे अनेक देश कोंडीत सापडली आहेत. इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या, एलपीजी आणि एलएनजी गॅसच्या किंमतीत वाढ होत आहे. यासोबतच भारत देखील तणावात आहे. कारण सध्याच्या स्थितीला भारतात होणारी उर्जेची आयात जवळपास बंद झाली. भारत सरकारकडून स्पष्ट करण्यात आले की, भारताकडे भरपूर सध्या स्टाक आहे. पुढील २५ दिवस चालेल इतका साठा भारताकडे डिझेल आणि पेट्रोलचा आहे. भारताकडून हे देखील स्पष्ट करण्यात आले की, भारत सध्या इतर पर्यायी गोष्टींसाठी प्रयत्न करत आहे. युद्ध जास्त काळ सुरू राहिले तर स्वयंपाक घरात लागणार एलपीजी गॅसचा तुटवडा निर्माण होउ शकतो. (पान २ वर)









## अमेरिका अन् इस्त्रायलच्या हल्ल्यात 1045 इराणी नागरिकांचा मृत्यू

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेला संघर्ष दिवसेंदिवस तीव्र होत आहे. इराणच्या सरकारी टेलिव्हिजनने दिलेल्या माहितीनुसार, आजही(बुधवारी) सकाळी इराणची राजधानी तेहरान येथे अनेक स्फोटांचे आवाज ऐकू आले. दरम्यान, इस्त्रायलने सांगितले की, इराणकडून डागण्यात आलेल्या मिसाइल हल्ल्यांमुळे त्यांना एअर डिफेन्स सिस्टम सक्रिय करावी लागली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही या युद्धाबाबत प्रतिक्रिया देताना हा संघर्ष अजून काही आठवडे किंवा त्याहून अधिक काळ चालू शकतो, असे संकेत दिले आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार, इराणमधील एका सरकारी संस्थेच्या हवाल्याने दावा केला जातोय की, अमेरिका आणि इस्त्रायलसोबत सुरू असलेल्या संघर्षात इराणमध्ये आतापर्यंत किमान १,०४५ लोकांचा मृत्यू झाला आहे. फाउंडेशन ऑफ मार्टर्स अँड व्हेटरन्स अफेयर्स या संस्थेने सांगितले की, ही संख्या ओळख पटवून दफनासाठी तयार करण्यात आलेल्या मृतदेहांच्या आधारावर निश्चित करण्यात आली आहे.



**इराणकडून मिसाइल आणि ड्रोन हल्ले-** इस्त्रायलने इराणच्या मिसाइल लान्चर आणि एका अणु संशोधन केंद्रावर हवाई हल्ले केले होते. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने इस्त्रायल, अमेरिकन दूतावास आणि गल्फ प्रदेशातील काही भागांना लक्ष्य केले. या हल्ल्यांमुळे उर्जा पुरवठा आणि हवाई उड्डाणांवर परिणाम झाल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, अमेरिकेच्या संरक्षण विभाग पेंटागनने कुवैतमधील कमांड सेंटरवर झालेल्या ड्रोन हल्ल्यात मृत्यू झालेल्या अमेरिकन आर्मी रिझर्व्हच्या चार सैनिकांची ओळख जाहीर केली आहे.




# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वाशीम, गुरुवार ५ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०








## इराण आणि इस्त्रायलमधील संघर्ष भारताच्या सीमेपर्यंत

# इराणच्या युद्धनौकेवर अमेरिकेचा पाण्याखालून हल्ला; ८० ठार





*विशाखापट्टणम येथे १५-२५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयोजित इंटरनॅशनल फ्लीट रिव्ह्यू (IFR) २०२६ आणि मिलन २०२६ चे नेतृत्व राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले. भारत आणि मित्र राष्ट्रांची जहाजे, पाणबुड्या आणि विमानांचा समावेश असलेल्या या भव्य सोहळ्यात राष्ट्रपती मुर्मू यांची उपस्थिती होती. सशस्त्र दलांच्या सर्वोच्च कमांडर म्हणून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी INS सुमेधावरून IFR 2026 चे पुनरावलोकन (Review) केले होते यात ५० हून अधिक देशांची नौदले, जहाजे, आणि विमाने या कार्यक्रमात सहभागी झाली होती यात या जहाजाचा समावेश होते.*





***#IFR2026_India आणि #MILAN2026 मध्ये सहभागी होण्यासाठी विशाखापट्टणम येथे आगमन झाल्यावर भारतीय नौदलाने इराणी नौदलाच्या आयआरआयएस देना यांचे स्वागत केले, जे दोन्ही राष्ट्रांमधील दीर्घकालीन सांस्कृतिक संबंधांचे प्रतिबिंब आहे. (एक क्षण)***

**विशाखापट्टणम/वृत्तसंस्था :** हिंदी महासागरात श्रीलंकेच्या किनारपट्टीजवळ अमेरिकेच्या एका अण्वस्त्रसज्ज पाणबुडीने इराणची युद्धनौका आयआरआयएस देना ही टार्पेडोचा हल्ला करुन बुडवल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या भीषण हल्ल्यात किमान ८० जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात आली असून, दुस-या महायुद्धानंतर एखाद्या शत्रु राष्ट्राची युद्धनौका टार्पेडोने बुडवण्याची ही पहिलीच वेळ असल्याचा दावा अमेरिकेने केला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे ही युद्धनौका काही दिवसांपूर्वीच भारतात सरावासाठी आली होती. इराण आणि इस्त्रायलमधील संघर्ष आता हिंदी महासागरापर्यंत आणि भारताच्या सीमेपर्यंत पोहोचल्याचे या घटनेवरून दिसत आहे. अमेरिकेने थेट इराणी युद्धनौका बुडवल्यामुळे आता इराणकडून कोणती प्रतिक्रिया येते, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. हिंदी महासागरात वाढलेला हा तणाव जागतिक शांततेसाठी धोक्याची घंटा मानली जात आहे.

अमेरिकेचे संरक्षण सचिव पिट हेगसेथ यांनी या हल्ल्याची पुष्टी दिली. 'आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रात स्वतःला सुरक्षित समजणा-या इराणच्या युद्धनौकेला आमच्या पाणबुडीने जलसमाधी दिली आहे. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या हत्येचा प्रयत्न करणा-या युनिटच्या म्होरक्याला काल कंठस्नान घालण्यात आले. इराणने ट्रम्प यांना मारण्याचा प्रयत्न केला होता, पण अखेर विजय (पान २ वर)

## सोने स्वस्त

**नवी दिल्ली-**आज ४ मार्च रोजी सोने आणि चांदीच्या दरात घसरण झाली आहे. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन नुसार, १० ग्रॅम



२४ कॅरेट सोन्याचा भाव ६,१४९ रुपयांनी घसरून १.६१ लाखांवर आला आहे. यापूर्वी सोमवारी त्याची किंमत प्रति १० ग्रॅम १.६७ लाख रुपये होती. तर, एक किलो चांदी २३,४१७ रुपयांनी घसरून २.६६ लाखांवर आली आहे. यापूर्वी सोमवारी त्याची किंमत प्रति किलो २.८९ लाख रुपये होती. सोने-चांदीच्या दरातील ही घसरण प्राफिट बुकिंगमुळे झाली आहे. मंगळवारी होळीच्या सणामुळे बाजार बंद होता.

**वाहतूक आणि सुरक्षाः** सोने एका शहरातून दुस-या शहरात नेण्यासाठी इंधन आणि मोठ्या (पान २ वर)

## घरगुती गॅस पुरवठ्यावर मोठे संकट

# इराण अमेरिका युद्धाची थेट झळ; फक्त 25 दिवसांचाच साठा शिल्लक

**मुंबई/प्रतिनिधी :** अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव वाढला. मात्र, या युद्धाचा फटका अनेक देशांना थेटपणे बसताना दिसत आहे. या युद्धाच्या पार्श्वभूमीवर तेलाच्या किंमतींमध्ये मोठी वाढ होण्याचा अंदाज आहे. यासोबतच इराणने मोठा निर्णय घेत महत्वपूर्ण सागरी मार्ग बंद केल्याने टँकर येण्याची संख्या कमी आहे. स्टेट ऑफ होर्मुजवर तेल टँकर ८० टक्के कमी झाल्याचे स्पष्ट झाले. यासोबतच जल मार्गावर हजारो टँकरचा मोठा जाम लागला आहे.



स्टेट ऑफ होर्मुज मार्ग बंद ठेवण्याचा निर्णय अमेरिकेने घेतला. यासोबतच येथे टँकर दिसले तर आम्ही आग लावू अशी धमकीही इराणकडून देण्यात आली, ज्यामुळे अनेक देश कोंडीत सापडली आहेत. इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या, एलपीजी आणि एलएनजी गॅसच्या किंमतीत वाढ होत आहे. यासोबतच भारत देखील तणावात आहे. कारण सध्याच्या स्थितीला भारतात होणारी उर्जेची आयात जवळपास बंद झाली. भारत सरकारकडून स्पष्ट करण्यात आले की, भारताकडे भरपूर सध्या स्टाक आहे. पुढील २५ दिवस चालेल इतका साठा भारताकडे डिझेल आणि पेट्रोलचा आहे. भारताकडून हे देखील स्पष्ट करण्यात आले की, भारत सध्या इतर पर्यायी गोष्टींसाठी प्रयत्न करत आहे. युद्ध जास्त काळ सुरू राहिले तर स्वयंपाक घरात लागणार एलपीजी गॅसचा तुटवडा निर्माण होउ शकतो. (पान २ वर)







## अमेरिका अन् इस्त्रायलच्या हल्ल्यात 1045 इराणी नागरिकांचा मृत्यू

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेला संघर्ष दिवसेंदिवस तीव्र होत आहे. इराणच्या सरकारी टेलिव्हिजनने दिलेल्या माहितीनुसार, आजही(बुधवारी) सकाळी इराणची राजधानी तेहरान येथे अनेक स्फोटांचे आवाज ऐकू आले. दरम्यान, इस्त्रायलने सांगितले की, इराणकडून डागण्यात आलेल्या मिसाइल हल्ल्यांमुळे त्यांना एअर डिफेन्स



सिस्टम सक्रिय करावी लागली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही या युद्धाबाबत प्रतिक्रिया देताना हा संघर्ष अजून काही आठवडे किंवा त्याहून अधिक काळ चालू शकतो, असे संकेत दिले आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार, इराणमधील एका सरकारी संस्थेच्या हवाल्याने दावा केला जातोय की, अमेरिका आणि इस्त्रायलसोबत सुरू असलेल्या संघर्षात इराणमध्ये आतापर्यंत किमान १,०४५ लोकांचा मृत्यू झाला आहे. फाउंडेशन ऑफ मार्टर्स अँड व्हेटरन्स अफेयर्स या संस्थेने सांगितले की, ही संख्या ओळख पटवून दफनासाठी तयार करण्यात आलेल्या मृतदेहांच्या आधारावर निश्चित करण्यात आली आहे.

**इराणकडून मिसाइल आणि ड्रोन हल्ले-**इस्त्रायलने इराणच्या मिसाइल लान्चर आणि एका अणु संशोधन केंद्रावर हवाई हल्ले केले होते. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने इस्त्रायल, अमेरिकन दूतावास आणि गल्फ प्रदेशातील काही भागांना लक्ष्य केले. या हल्ल्यांमुळे उर्जा पुरवठा आणि हवाई उड्डाणांवर परिणाम झाल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, अमेरिकेच्या संरक्षण विभाग पेंटागनने कुवैतमधील कमांड सेंटरवर झालेल्या ड्रोन हल्ल्यात मृत्यू झालेल्या अमेरिकन आर्मी रिझर्व्हच्या चार सैनिकांची ओळख जाहीर केली आहे.





# जनमाध्यम

epaper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, गुरुवार ५ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०










## इराण आणि इस्त्रायलमधील संघर्ष भारताच्या सीमेपर्यंत

# इराणच्या युद्धनौकेवर अमेरिकेचा पाण्याखालून हल्ला; ८० ठार





*विशाखापट्टणम येथे १५-२५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयोजित इंटरनॅशनल फ्लीट रिव्ह्यू (IFR) २०२६ आणि मिलन २०२६ चे नेतृत्व राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले. भारत आणि मित्र राष्ट्रांची जहाजे, पाणबुड्या आणि विमानांचा समावेश असलेल्या या भव्य सोहळ्यात राष्ट्रपती मुर्मू यांची उपस्थिती होती. सशस्त्र दलांच्या सर्वोच्च कमांडर म्हणून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी INS सुमेधावरून IFR 2026 चे पुनरावलोकन (Review) केले होते यात ५० हून अधिक देशांची नौदले, जहाजे, आणि विमाने या कार्यक्रमात सहभागी झाली होती यात या जहाजाचा समावेश होते.*





***#IFR2026_India आणि #MILAN2026 मध्ये सहभागी होण्यासाठी विशाखापट्टणम येथे आगमन झाल्यावर भारतीय नौदलाने इराणी नौदलाच्या आयआरआयएस देना यांचे स्वागत केले, जे दोन्ही राष्ट्रांमधील दीर्घकालीन सांस्कृतिक संबंधांचे प्रतिबिंब आहे. (एक क्षण)***

**विशाखापट्टणम/वृत्तसंस्था :** हिंदी महासागरात श्रीलंकेच्या किनारपट्टीजवळ अमेरिकेच्या एका अण्वस्त्रसज्ज पाणबुडीने इराणची युद्धनौका आयआरआयएस देना ही टार्पेडोचा हल्ला करुन बुडवल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या भीषण हल्ल्यात किमान ८० जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात आली असून, दुस-या महायुद्धानंतर एखाद्या शत्रु राष्ट्राची युद्धनौका टार्पेडोने बुडवण्याची ही पहिलीच वेळ असल्याचा दावा अमेरिकेने केला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे ही युद्धनौका काही दिवसांपूर्वीच भारतात सरावासाठी आली होती. इराण आणि इस्त्रायलमधील संघर्ष आता हिंदी महासागरापर्यंत आणि भारताच्या सीमेपर्यंत पोहोचल्याचे या घटनेवरून दिसत आहे. अमेरिकेने थेट इराणी युद्धनौका बुडवल्यामुळे आता इराणकडून कोणती प्रतिक्रिया येते, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. हिंदी महासागरात वाढलेला हा तणाव जागतिक शांततेसाठी धोक्याची घंटा मानली जात आहे.

अमेरिकेचे संरक्षण सचिव पिट हेगसेथ यांनी या हल्ल्याची पुष्टी दिली. 'आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रात स्वतःला सुरक्षित समजणा-या इराणच्या युद्धनौकेला आमच्या पाणबुडीने जलसमाधी दिली आहे. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या हत्येचा प्रयत्न करणा-या युनिटच्या म्होरक्याला काल कंठस्नान घालण्यात आले. इराणने ट्रम्प यांना मारण्याचा प्रयत्न केला होता, पण अखेर विजय ➪(पान २ वर)

## सोने स्वस्त

**नवी दिल्ली-**आज ४ मार्च रोजी सोने आणि चांदीच्या दरात घसरण झाली आहे. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन नुसार, १० ग्रॅम



२४ कॅरेट सोन्याचा भाव ६,१४९ रुपयांनी घसरून १.६१ लाखांवर आला आहे. यापूर्वी सोमवारी त्याची किंमत प्रति १० ग्रॅम १.६७ लाख रुपये होती. तर, एक किलो चांदी २३,४१७ रुपयांनी घसरून २.६६ लाखांवर आली आहे. यापूर्वी सोमवारी त्याची किंमत प्रति किलो २.८९ लाख रुपये होती. सोने-चांदीच्या दरातील ही घसरण प्रॉफिट बुकिंगमुळे झाली आहे. मंगळवारी होळीच्या सणामुळे बाजार बंद होता.

**वाहतूक आणि सुरक्षा:** सोने एका शहरातून दुस-या शहरात नेण्यासाठी इंधन आणि मोठ्या ➪(पान २ वर)

## घरगुती गॅस पुरवठ्यावर मोठे संकट

# इराण अमेरिका युद्धाची थेट झळ; फक्त 25 दिवसांचाच साठा शिल्लक

**मुंबई/प्रतिनिधी :** अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव वाढला. मात्र, या युद्धाचा फटका अनेक देशांना थेटपणे बसताना दिसत आहे. या युद्धाच्या पार्श्वभूमीवर तेलाच्या किंमतींमध्ये मोठी वाढ होण्याचा अंदाज आहे. यासोबतच इराणने मोठा निर्णय घेत महत्वपूर्ण सागरी मार्ग बंद केल्याने टँकर येण्याची संख्या कमी आहे. स्टेट ऑफ होर्मुजवर तेल टँकर ८० टक्के कमी झाल्याचे स्पष्ट झाले. यासोबतच जल मार्गावर हजारो टँकरचा मोठा जाम लागला आहे.



स्टेट ऑफ होर्मुज मार्ग बंद ठेवण्याचा निर्णय अमेरिकेने घेतला. यासोबतच येथे टँकर दिसले तर आम्ही आग लावू अशी धमकीही इराणकडून देण्यात आली, ज्यामुळे अनेक देश कोंडीत सापडली आहेत. इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्धामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या, एलपीजी आणि एलएनजी गॅसच्या किंमतीत वाढ होत आहे. यासोबतच भारत देखील तणावात आहे. कारण सध्याच्या स्थितीला भारतात होणारी उर्जेची आयात जवळपास बंद झाली. भारत सरकारकडून स्पष्ट करण्यात आले की, भारताकडे भरपूर सध्या स्टाक आहे. पुढील २५ दिवस चालेल इतका साठा भारताकडे डिझेल आणि पेट्रोलचा आहे. भारताकडून हे देखील स्पष्ट करण्यात आले की, भारत सध्या इतर पर्यायी गोष्टींसाठी प्रयत्न करत आहे. युद्ध जास्त काळ सुरू राहिले तर स्वयंपाक घरात लागणार एलपीजी गॅसचा तुटवडा निर्माण होउ शकतो. ➪(पान २ वर)







## अमेरिका अन् इस्त्रायलच्या हल्ल्यात 1045 इराणी नागरिकांचा मृत्यू

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेला संघर्ष दिवसेंदिवस तीव्र होत आहे. इराणच्या सरकारी टेलिव्हिजनने दिलेल्या माहितीनुसार, आजही(बुधवारी) सकाळी इराणची राजधानी तेहरान येथे अनेक स्फोटांचे आवाज ऐकू आले. दरम्यान, इस्त्रायलने सांगितले की, इराणकडून डागण्यात आलेल्या मिसाइल हल्ल्यांमुळे त्यांना एअर डिफेन्स सिस्टम सक्रिय करावी लागली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही या युद्धाबाबत प्रतिक्रिया देताना हा संघर्ष अजून काही आठवडे किंवा त्याहून अधिक काळ चालू शकतो, असे संकेत दिले आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार, इराणमधील एका सरकारी संस्थेच्या हवाल्याने दावा केला जातोय की, अमेरिका आणि इस्त्रायलसोबत सुरू असलेल्या संघर्षात इराणमध्ये आतापर्यंत किमान १,०४५ लोकांचा मृत्यू झाला आहे. फाउंडेशन ऑफ मार्टर्स अँड व्हेटरन्स अफेयर्स या संस्थेने सांगितले की, ही संख्या ओळख पटवून दफनासाठी तयार करण्यात आलेल्या मृतदेहांच्या आधारावर निश्चित करण्यात आली आहे.



**इराणकडून मिसाइल आणि ड्रोन हल्ले-**इस्त्रायलने इराणच्या मिसाइल लान्चर आणि एका अणु संशोधन केंद्रावर हवाई हल्ले केले होते. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने इस्त्रायल, अमेरिकन दूतावास आणि गल्फ प्रदेशातील काही भागांना लक्ष्य केले. या हल्ल्यांमुळे उर्जा पुरवठा आणि हवाई उड्डाणांवर परिणाम झाल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, अमेरिकेच्या संरक्षण विभाग पेंटागनने कुवैतमधील कमांड सेंटरवर झालेल्या ड्रोन हल्ल्यात मृत्यू झालेल्या अमेरिकन आर्मी रिझर्व्हच्या चार सैनिकांची ओळख जाहीर केली आहे.

# न्याय देताना करिअरचा विचार करू नये

## ● न्यायमूर्ती नागरत्ना यांचे प्रतिपादन
## ● न्यायाधीशांनी अलोकप्रिय निर्णयांना घाबरू नये

**कोची/वृत्तसंस्था :** सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना म्हणाल्या की न्यायाधीशांनी आपले निर्णय देताना त्यांच्या कारकिर्दीवर होणा-या परिणामांची चिंता करू नये. जरी अलोकप्रिय निर्णयांचा पदोन्नती किंवा कार्यकाळ वाढवण्यावर परिणाम होत असला तरी, त्यांनी आपल्या पदाची शपथ आणि न्यायिक धर्माचे पालन केले पाहिजे.

केरळ उच्च न्यायालयात आयोजित न्यायमूर्ती टी.एस. कृष्णमूर्ती अय्यर स्मृती व्याख्यानात त्यांनी परिवर्तनकारी संवैधानिकता आणि मूळ संरचना सिद्धांत यांच्या संदर्भात न्यायिक पुनरावलोकनाच्या महत्त्वावर आपले विचार मांडले. त्या म्हणाल्या की, वैयक्तिक स्वातंत्र्याला सामूहिक हिताच्या नावाखाली दुर्बळ केले जाउ नये. न्यायमूर्ती नागरत्ना म्हणाल्या की, मूळ संरचना सिद्धांत संविधानाच्या किमान मर्यादा निश्चित करतो, तर परिवर्तनकारी संवैधानिकता त्याला पुढे जाण्याची दिशा देते. या मर्यादांचे निरीक्षण न्यायपालिकेमार्फत न्यायिक पुनरावलोकनाद्वारेच शक्य आहे.



**जस्टिस नागरत्ना यांचे महत्त्वाचे मुद्दे-** परिवर्तनकारी संविधानवादाचा वापर वैयक्तिक स्वातंत्र्य कमी करण्यासाठी किंवा राज्याच्या दडपशाहीच्या शक्तींना सामान्य करण्यासाठी केला जाउ शकत नाही. त्यांनी सांगितले की, हेबियस कार्पस सारखे अधिकार संविधानाच्या मूळ भावनेचा भाग आहेत आणि त्यांना कमकुवत करणे घटनात्मक मर्यादांच्या विरोधात असेल.न्यायिक पुनर्विलोकनाखाली न्यायालयांना अनेकदा कायदे असंवैधानिक घोषित करावे लागतात, कार्यपालिकेच्या कारवाईला स्थगिती द्यावी लागते किंवा संसदेने मंजूर केलेल्या घटनादुरुस्त्याही रद्द कराव्या लागतात. अशा निर्णयांचे राजकीय परिणाम होउ शकतात, म्हणून ते घेणे सोपे नसते. न्यायमूर्ती नागरत्ना म्हणाल्या की, न्यायपालिकेचे स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठी न्यायाधीशांना कार्यकाळाची सुरक्षितता, पारदर्शक आणि व्यवस्थित नियुक्ती प्रक्रिया तसेच प्रशासकीय व आर्थिक स्वायत्तता मिळाली पाहिजे. यामुळे कोणत्याही प्रकारचा अप्रत्यक्ष दबाव रोखला जाउ शकतो.

# तब्बल 5 एस-400 च्या खरेदीला भारताची मंजुरी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** संपूर्ण जगाचे लक्ष मध्य पूर्वेकडे लागलेले आहे. अमेरिका आणि इस्रायल इराणवर भीषण हल्ले करत आहेत. इराणकडूनही प्रत्युत्तर दिले जात आहे. इराणकडूनही आखाती देशांमधील अमेरिकेच्या लष्करी तळांवर हल्ला केला जात आहे. भारताने हे युद्ध थांबण्याचे आवाहन केले आहे आणि चर्चेतून मार्ग काढावा असा सल्ला दिला आहे. या युद्धाच्या काळात भारताने आपले हवाई क्षेत्र सुरक्षित करण्यासाठी मोठे पाउल उचलले आहे. ज्यामुळे पाकिस्तानची झोप उडाली आहे. भारताने एका शस्त्र खरेदीला मान्यता दिली आहे.



गेल्या वर्षी मे मध्ये भारताने ऑपरेशन सिंदूर राबवले होते. या ऑपरेशनमध्ये पाकिस्तानच्या हल्लांना नष्ट करण्यासाठी वापरलेल्या क्षेपणास्त्रांबाबत भारतीय हवाई दलाने एक मोठा निर्णय घेतला आहे. आता आणखी काही एस-४०० हवाई संरक्षण प्रणाली भारताच्या ताफयात दाखल होणार आहेत. अहवालानुसार संरक्षण खरेदी मंडळाने भारतीय हवाई दलासाठी रशियाकडून आणखी पाच एस-४०० हवाई संरक्षण प्रणाली खरेदी करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. संपूर्ण जगात युद्धाचा भडका उडाला आहे. अशावेळी भारताने हा निर्णय घेतल्याने सर्वांच्या भूवया उंचावल्या आहेत.

संरक्षण सचिव राजेश कुमार सिंग यांच्या अध्यक्षतेखालील संरक्षण अधिग्रहण मंडळाने भारतीय हवाई दलाच्या एस-४०० हवाई संरक्षण प्रणाली खरेदी करण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. आता हा प्रस्ताव संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखालील संरक्षण अधिग्रहण परिषदेकडे पाठवला जाणार आहे. त्यानंतर खरेदीची प्रक्रिया सुरू होणार आहे. भारताकडे सध्या तीन एस-४०० हवाई संरक्षण प्रणाली आहेत, ज्याचा वापर ऑपरेशन सिंदूरमध्ये करण्यात आला होता. आता आणखी ५ एस-४०० हवाई संरक्षण प्रणाली खरेदी केल्या जाणार आहे.

**पाकिस्तानची झोप उडवणारी बातमी**

ऑपरेशन सिंदूर दरम्यान रशियन बनावटीच्या एस-४०० ने जबरदस्त कामगिरी करत पाकिस्तानकडून येणारी क्षेपणास्त्रे त्यांनी नष्ट केली होती. यामुळे मुनीर आणि शाहबाज शरीफ यांचे हल्ले नाकाम झाले होते. आता रशियाकडून आणखी पाच एस-४०० प्रणाली खरेदी केल्या जाणार आहेत. त्यामुळे आगामी काळात भारत आणि पाकिस्तान यांच्यात संघर्ष झाल्यास याचा फायदा भारतीय सैन्याला होणार आहे.

पान १ व १० वरून

## इराणच्या युद्धनौकेवर

आमचाच झाला आहे,‘ असे हेगसेथ यांनी सांगितले.

**श्रीलंकेकडून बचावकार्य सुरु** -श्रीलंकेचे परराष्ट्र मंत्री विजिथा हेरथ यांनी संसदेत दिलेल्या माहितीनुसार, इराणची माउज-क्लास फ्रिगेट आयआरआयएस देना ही युद्धनौका बुडाली. श्रीलंकेच्या दक्षिण किनारपट्टीपासून ४० नाटिकल मैल दूर आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रात हा हल्ला झाला. या जहाजावर सुमारे १८० नौसैनिक होते. श्रीलंकन नौदलाने आतापर्यंत ३२ जणांना सुखरूप वाचवले असून अनेकांचे मृतदेह हाती लागले आहेत. जखमींवर गाले इथल्या सरकारी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**भारतातील युद्धअभ्यासाहून परतताना हल्ला-** विशेष म्हणजे, ही इराणी युद्धनौका भारतात आयोजित इंटरनॅशनल फ्लीट रिव्ह्यू २०२६ आणि मिलन २०२६ या नौदल सरावात सहभागी होउन परतत होती. विशाखापट्टणम येथे भारतीय नौदलाने या जहाजाचे जंगी स्वागत केले होते. १८ ते २५ फेब्रुवारी दरम्यान बंगालच्या उपसागरात झालेल्या सरावानंतर ही नौका परतीच्या प्रवासाला निघाली होती.

**श्रीलंकेची भूमिका आणि तणाव-** सुरुवातीला श्रीलंकन नौदलाने तांत्रिक बिघाडामुळे जहाज बुडाल्याची शक्यता वर्तवली होती, मात्र अमेरिकेच्या अधिकृत कबुलीने चित्र स्पष्ट झाले आहे. श्रीलंकेच्या हवाई दलाला आणि नौदलाला घटनेच्या वेळी परिसरात इतर कोणतेही जहाज किंवा विमान दिसले नव्हते, कारण हा हल्ला पाणबुडीद्वारे पाण्याखालून करण्यात आला होता.

## सोने स्वस्त

सुरक्षेचा खर्च येतो. आयात केंद्रांपासून अंतर वाढल्यास वाहतूक खर्च वाढतो, ज्यामुळे स्थानिक दर वाढतात. दक्षिण भारतासारख्या प्रदेशात जास्त वापर (सुमारे ४०ऽ) असल्यामुळे ज्वेलर्स मोठ्या प्रमाणात सोने खरेदी करतात. मोठ्या प्रमाणात खरेदीवर मिळणा-या सवलतीचा फायदा ग्राहकांना कमी दरांच्या रूपात मिळतो.

**स्थानिक ज्वेलरी असोसिएशन:** प्रत्येक राज्य आणि शहराचे स्वत?चे ज्वेलरी असोसिएशन (उदा. तामिळनाडूमधील मद्रास ज्वेलर्स असोसिएशन) असतात. हे संघ स्थानिक मागणी आणि पुरवठ्याच्या आधारावर त्यांच्या भागासाठी सोन्याचा दर ठरवतात.

**जुना साठा आणि खरेदी किंमत:** ज्वेलर्सनी आपला साठा कोणत्या दराने खरेदी केला आहे, हे देखील महत्त्वाचे आहे. ज्या ज्वेलर्सकडे जुना आणि स्वस्त दरात खरेदी केलेला साठा असतो, ते ग्राहकांकडून कमी किंमत घेउ शकतात.या वर्षी सोने-चांदीच्या किमतीत सतत चढ-उतार दिसून येत आहे. ३१ डिसेंबर २०२६ रोजी सोन्याचे दर १.३३ लाख रुपये होते, जे २९ जानेवारी रोजी वाढून १.७६ लाख रुपयांच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचले होते. तेव्हापासून आतापर्यंत सोने १४,७९९ रुपयांनी स्वस्त झाले आहे.तर, चांदीची किंमत ३१ डिसेंबर २०२६ रोजी २.३० लाख रुपये होती, जी २९ जानेवारी रोजी ३.८६ लाख रुपयांच्या सर्वकालीन उच्चांकावर पोहोचली होती. तेव्हापासून आतापर्यंत ३४ दिवसांत चांदी १.१९ लाख रुपयांनी स्वस्त झाली आहे. LKP सिक्युरिटीजचे व्हीपी रिसर्च नालिस्ट जतीन त्रिवेदी यांच्या मते, ‘पुढील आठवडा अमेरिकेच्या आर्थिक आकडेवारीच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा आहे. तेथील उत्पादन आणि बेरोजगारीचे आकडे येणार आहेत, ज्यामुळे फेडरल रिझर्व्हच्या धोरणाचा अंदाज येईल. तांत्रिकदृष्ट्या जोपर्यंत सोने १,६४,००० च्या वर आहे, तोपर्यंत त्यात मजबूत स्थिती कायम राहील. वरच्या बाजूने १,७२,००० चा स्तर पार केल्यास ते आणखी वर जाउ शकते.‘ तर, एनरिच मनीचे सीईओ पोनमुडी आर यांचे म्हणणे आहे की, ‘सोने सध्या कंसोलिडेशन (स्थिरता) च्या टप्प्यात आहे, परंतु त्याचा ट्रेंड सकारात्मक आहे. जर चांदी २.५० लाख ते २.७० लाख दरम्यान टिकून राहिली, तर ती पुन्हा ३.२० लाख ते ३.३० लाख पर्यंत जाउ शकते.‘

## इराण अमेरिका युद्धाची

**सर्वसामान्य बसणार झळ-** ज्याचा परिणाम थेट लोकांच्या घरापर्यंत होईल. तेल कंपन्यांनी यूनिटसोबत एलपीजी गॅसचे उत्पादन वाढवण्यास सुरूवात केली. सरकारकडून स्पष्ट करण्यात आले की, सध्याच्या परिस्थितीला कच्चे तेल, एलपीजी आणि एलएनजीची कोणतीही समस्या नाही. मात्र, असे असले तरीही देशात मोठ्या संख्येने दररोज उर्जा लागते, त्याची आयात अत्यंत महत्वाची आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात सध्याच्या घडीला जरी डिझेल आणि पेट्रोलच्या किंमती वाढत असल्या तरीही त्याचा कोणताही परिणाम सर्वसामान्य लोकांवर होणार नाही. डिझेल, पेट्रोल आणि गॅसच्या किंमती स्थिर राहतील.

**सद्यस्थितीत एलपीजी गॅसची चिंता-** मुळात म्हणजे सध्याच्या घडीला भारताची चिंता डिझेल, पेट्रोल नाहीच, एलपीजी गॅस ही चिंता आहे. कारण भारतात ८० टक्के एलपीजी गॅस होर्मुजहून भारतात येते आणि तोच मार्ग इराणकडून बंद करण्यात आला. यासोबतच भारताकडे एलपीजी गॅसचे कोणताही पर्याय नाही. आपल्या देशात ६० टक्के एलपीजी गॅस आयात केला जातो.

## विषारी पाणी प्यायल्याने

व्यवसाय सुरू केला होता. कुटुंबाचा उदरनिर्वाह याच बकरी पालनावर अवलंबून होता. नुकसान झालेल्या महिलांमध्ये शमशादबी मोहम्मद रियाज, शहनाजबी वाईद खा, जयबूनबी सालीमुद्दीन, हुस्नाबी शेख हमीद,शमाबी ईस्राईल खा, शबानाबी सलमान खा, शकिलाबी सय्यद रियाजूदिन व सलामाबी शेख इरफान यांचा समावेश यांचा समावेश आहे. या सर्व महिलांनी संबंधित शेतमालकावर गुन्हा दाखल करून तात्काळ नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून ठाणेदार सूरज बोंडे यांनी तात्काळ घटनास्थळाला भेट देऊन पंचनामा केला. मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी न्याय वैद्यकीय पथकाला पाचारण करण्यात आले आहे. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच बकऱ्यांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला हे स्पष्ट होईल. मात्र, हातावर पोट असलेल्या या महिलांसाठी ही घटना अत्यंत वेदनादायी ठरली आहे.

## पाण्याच्या शोधात बिबट्या

ऑपरेशनला सुरुवात केली. विहिरीत लोखंडी पिंजरा सोडण्यात आला. बिबट्याने सुरुवातीला प्रतिकार केला, पण अखेर थकलेल्या बिबट्याने पिंजऱ्यात प्रवेश केला आणि सर्वांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. त्यानंतर बिबट्याला पिंजऱ्यासहित विहिरी बाहेर काढण्यात आले. वनविभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार, जंगलातील पाण्याचे स्त्रोत आटल्यामुळे हा बिबट्या पाण्याच्या शोधात मानवी वस्तीकडे आला असावा. रात्रीच्या अंधारात विहिरीचा अंदाज न आल्याने तो थेट पाण्यात कोसळला. सुदैवाने, पाईपचा आधार मिळाल्याने तो मृत्यूशी झुंज देऊ शकला.

**वन्य प्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर-**

वनविभागाच्या सतर्कतेमुळे आणि टीमच्या धाडसामुळे बिबट्याला सुखरूप बाहेर काढता आले. सध्या त्याची वैद्यकीय तपासणी केली जात असून, त्यानंतर त्याला नैसर्गिक अधिवासात सोडले जाईल, असे नेर वनपरिक्षेत्राच्या वन अधिकाऱ्यांनी सांगितले. या थरारक रेस्क्यू ऑपरेशननंतर बाणगावच्या ग्रामस्थांनी वनविभागाच्या कामगिरीचे कौतुक केले आहे. मात्र, उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच घडलेल्या या घटनेने वन्यप्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## बागापूर द्धसंस्थानच्या कोट्यवधी

झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणी शरद भाऊराव चौधरी, गोवर्धन वामनराव चौधरी, अशोक वामनराव चौधरी, सुरेश वामनराव चौधरी (सर्व रा. बागापूर), धर्मेंद्र गोवर्धन चौधरी, सोनाली धर्मेंद्र चौधरी, पद्माकर गोवर्धन चौधरी (सर्व रा. गिरजानगर, धामणगाव रेल्वे) आणि अर्चना प्रशांत गंधोळे (रा. यवतमाळ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे बागापूरसह चांदूर रेल्वे तालुक्यात धार्मिक संस्थांच्या मालमत्तेच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कोट्यवधींच्या संपत्तीवर डोळा ठेवून बनावट कागदपत्रांचा आधार घेणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक रोहित कुबडे हे ठाणेदारांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

## अंजनगाव पेपरफुटी ध्रकरणात

रूममध्ये अधिकृत आदेश नसतानाही का बोलावले होते, याची चर्चा आता तालुक्यात रंगली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या पेपरफुटीच्या प्रकरणात जिल्हा परिषदेचे अनेक शिक्षक सहभागी असण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे झालेल्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा पुन्हा घेतल्या जाव्यात का, अशी मागणीही नागरिकांमधून होत आहे.

दुसरीकडे, पोलीस तपासात अटकेत असलेला आरोपी वारंवार आपले बयाण बदलत असल्याने तपासात अडथळे निर्माण होत आहेत. फरार आरोपीला पकडण्यासाठी पोलिसांची दोन पथके रवाना झाली असून, या प्रकरणात आणखी कोणा कोणाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाते, याकडे लक्ष लागले आहे.

## अर्थसंकल्पीय अधिवेशनात

संबंधित विभागांनी समन्वय साधून वेळेत कामे पूर्ण करावीत, अशी मागणी सुद्धा त्यांनी केली. अचलपूर विधानसभा मतदार संघातील चांदूरबाजार, अचलपूर तालुक्यातील पांदण रस्त्यांना गती देतांना नाल्या, नदीवर पुलाची निर्मिती करण्याची तरतूद व्हावी, कच्चे रस्ते पक्के व्हावे याची मागणी केली. आमदार प्रवीण तायडे यांच्या या भूमिकेचे शेतकरी व ग्रामीण भागातून स्वागत करण्यात येत असून, यामुळे ग्रामीण पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## दर्यापूर तहसिलच्या मिटिंग

सामान्य नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरत आहे.

तहसिल कार्यालय हे महसूल व प्रशासकीय कामकाजाचे प्रमुख केंद्र मानले जाते. अशा ठिकाणीच जर अधिकारी बैठकीदरम्यान निष्क्रिय दिसत असतील, तर कामकाजाच्या पारदर्शकतेवर आणि गतीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून दखल घेऊन संबंधितांकडून स्पष्टीकरण मागविण्यात येणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## उधारीच्या पैशांवरून तरुणाची

फुटेज उपलब्ध नसतानाही गुन्हे शाखेने पारंपरिक तपासपद्धतीचा अवलंब केला. गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीनुसार महादेवखोरी परिसरातील काही युवकांनी एका इसमाला मारहाण करून विहिरीत फेकल्याचा धागा पोलिसांना मिळाला आणि तपासाला निर्णायक वळण मिळाले.

**उधारीच्या पैशांवरून रचला कट-**

तपासात उघड झालेल्या माहितीनुसार, उधारीच्या पैशांच्या वादातून आरोपींनी अमर व्यास यांना छत्री तलाव परिसरात नेले. तेथे लाथाबुक्यांनी, लाठीने व चाकूने वार करून त्यांची हत्या करण्यात आली. गुन्हा लपविण्यासाठी मृतदेह जंगलातील विहिरीत फेकण्यात आला. आदेश तेलमोर, रोहित तायडे, दिप उर्फ यशोदीप वेलकर, जय कोकाटे, गौरव गजभीये, निश्चय पोटफोडे, संजय वानखेडे आणि तुषार सुपनेर अशी आरोपींची नावे निष्पन्न झाली आहेत. यापैकी चौघांना अटक करण्यात आली असून एक आरोपी फरार आहे. काही आरोपी सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर यापूर्वीही खून व खुनाच्या प्रयत्नाचे गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे.

ही संपूर्ण कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात पार पडली. पुढील तपास सुरू आहे.

**आरोपींची संपूर्ण माहिती-**

या गुन्ह्यातील आरोपींमध्ये आदेश रघुनाथ तेलमोर (वय २४ वर्ष, रा. महादेव खोरी, पो. स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती -सध्या मध्यवर्ती कारागृहात), रोहित संजय तायडे (वय २३ वर्ष, कैलास नगर, महादेव खोरी, अमरावती मध्यवर्ती कारागृहात), दिप उर्फ यशोदीप विनायकराव वेलकर (वय २५ वर्ष, रा. महादेव खोरी, अमरावती – मध्यवर्ती कारागृहात), जय नागोराव कोकाटे (वय १९ वर्ष, रा. वरून नगर, महादेव खोरी, अमरावती), गौरव दिलीप गजभीये (वय २५ वर्ष, रा. संजय गांधी नगर, अमरावती), निश्चय सुनील पोटफोडे (वय २१ वर्ष, रा. जीवनछाया कॉलनी, रुख्मिणी नगरजवळ, अमरावती), संजय विलास वानखेडे (वय २३ वर्ष, रा. महादेव खोरी, अमरावती) तसेच तुषार अनिल सुपनेर (वय २५ वर्ष, रा. संजय गांधी नगर, अमरावती – फरार) यांचा समावेश आहे.

## तलावात आंघोळ जीवावर

अंदाज न येणे धोकादायक ठरते. या घटनेनंतर तलाव परिसरात सुरक्षाव्यवस्था वाढविण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे.

## धुलीवंदनात चाकू दाखवत

पळ काढला. घाईत तोल जाऊन ते खाली पडले व त्यांच्या उजव्या पायाला दुखापत होऊन रक्तस्त्राव झाला. मित्रांनी त्यांना तात्काळ रेडीयंट हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल केले. त्यानंतर त्यांनी तिघांविरुद्ध तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून गुन्हा नोंदविण्यात आला असून तपास सुरू करण्यात आला. घटनेची माहिती मिळताच राजापेठ पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. गुप्त माहितीच्या आधारे मोठ्या शिताफीने मुख्य आरोपी उज्ज्वल प्रकाश भोयर (वय १८, रा. शिवशक्ती नगर) याला तसेच दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना ग्राम वडगाव माहोरे, पो.स्टे. नांदगाव पेठ हद्दीतून ताब्यात घेण्यात आले. आरोपींकडून एमएच-२७ एपी-३४२५ क्रमांकाची निळ्या रंगाची स्प्लेंडर मोटारसायकल (किंमत अंदाजे ४०,००० रुपये) व गुन्ह्यात वापरलेला चाकू जप्त करण्यात आला आहे. पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या पथकात पो.उपनि. मिलिंद हिवरे व पोलीस अमलदार सागर सरदार, पवन तिवारी आणि दिनेश भिसे यांचा सहभाग होता. धुलीवंदनासारख्या उत्सवाच्या दिवशी घडलेल्या या घटनेने परिसरात खळबळ उडाली होती; मात्र राजापेठ पोलिसांच्या तातडीच्या कारवाईमुळे आरोपींना गजाआड करण्यात यश आले आहे.

## अवैध ध्रवासी वाहतुकीवर

करणाऱ्या वाहनांवर कडक कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. दरम्यान, जानेवारी २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या ५१३ बसेसविरुद्ध मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई करून २० लाख १ हजार रुपयांचे तडजोड शुल्क आकारण्यात आले असल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी अनिल मानकर यांनी दिली. या व्यापक मोहिमेमुळे वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत वाहनचालकांमध्ये जागरूकता निर्माण होत असल्याचे चित्र आहे. आरटीओकडून रस्ता सुरक्षेला प्राधान्य देत तपासणी मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. अवैध वाहतूक, भारक्षमतेपेक्षा जास्त मालवाहतूक तसेच प्रवासी वाहनांतून मालवाहतूक करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा अधिकाऱ्यांनी दिला आहे.

भरारी पथकाची व्यापक कारवाई (जानेवारी २०२५ – फेब्रुवारी २०२६)

हेल्मेट न वापरणे – ३७२ प्रकरणे;
सीटबेल्ट न वापरणे – ७७६ प्रकरणे
वैध विमा नसलेली वाहने – ३०७३
जादा मालवाहतूक – ३३८
मोबाईलवर बोलत वाहनचालक – २५०
रिफ्लेक्टर नसलेली वाहने – ११३४
परवाना नसलेले चालक – २७७८
फिटनेस संपलेली वाहने – ३४२२
परवाना संपलेली वाहने – ५७२
पीयुसी नसलेली वाहने – ४२७०
तपासणीदरम्यान पळून गेलेली – १३५
बसेसविरुद्ध कारवाई – ५७०
भरधाव वेग – २६५६
एकूण दोषी वाहने : २०,३४६
एकूण तडजोड शुल्क : ३,८७,७५,५००

**मोहीम अधिक प्रभावीपणे राबविणार-**

अवैध प्रवासी वाहतूक, जादा मालवाहतूक तसेच नियमबाह्य प्रवासी सेवा देणाऱ्या वाहनांविरुद्ध पुढेही सातत्याने कारवाई करण्यात येणार आहे. रस्ता सुरक्षेला बाधा आणणाऱ्या चालक व वाहनमालकांविरुद्ध कठोर भूमिका घेत तपासणी मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येईल, असे प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी स्पष्ट केले.

## नवसारी चौकात जुन्या

स्टेशन चे ठाणेदार गोरखनाथ जाधव पथकासह घटनास्थळी दाखल झाले. जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी प्राथमिक चौकशी करून जखमींचे जबाब नोंदविले आहेत. हल्लेखोरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून आरोपींच्या शोधासाठी विशेष पथक रवाना करण्यात आले आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून जुन्या वादाचा नेमका धागा शोधण्याचे काम सुरू आहे. या प्रकारामुळे नवसारी चौक परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला आहे.

## चांदूर रेल्वेत नप करावरील

देण्यासाठी ‘अभय योजना’ची कार्यपद्धती निश्चित केली आहे. त्या अनुषंगाने १९ मे २०२५ पर्यंत थकीत शास्ती माफीसाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार चांदूर रेल्वे नगर परिषदेकडून ५०% शास्ती माफीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. चांदूर रेल्वे नगर परिषदेची एकूण मालमत्ता कर थकबाकी १कोटी ८८लाख ४६हजार ८४२ रुपये इतकी आहे. वाढत्या शास्तीमुळे करदात्यांवर आर्थिक भार वाढून वसुलीवर विपरीत परिणाम होत होता.

नगराध्यक्ष प्रियंका विश्वकर्मा यांनी ही बाब गांभीर्याने घेत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे माफीचा प्रस्ताव सादर केला. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्याचे सांगितले जात आहे. जिल्हाधिकारी, अमरावती यांनी शासन निर्णयाच्या अधीन राहून आदेश निर्गमित करत २ मार्च २०२६ ते २० मार्च २०२६ या कालावधीत अभय योजना राबविण्याचे निर्देश दिले आहेत.या कालावधीत थकीत व चालू कराची एकूण ७०% वसुली झाल्यास ३१ मार्च २०२६ पर्यंत योजना वाढविण्याचा निर्णय मुख्याधिकारी स्तरावर घेता येणार आहे. या निर्णयामुळे शहरातील हजारो मालमत्ता धारकांना मोठा दिलासा मिळणार आहे. वाढत्या दंडामुळे अडचणीत आलेल्या करदात्यांना आता थकीत कर भरण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. नगराध्यक्ष प्रियंका विश्वकर्मा यांच्या प्रयत्नांमुळे हा महत्त्वाचा निर्णय मार्गी लागल्याने सर्वसामान्य नागरिकांत समाधान व्यक्त होत आहे. नगर परिषदेकडून सर्व थकबाकीदारांनी अभय योजनेचा लाभ घेऊन थकीत कर भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ‘कर भरा, दंड माफ करा’ या संकल्पनेतून शहराच्या विकासाला गती देण्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरणार आहे. शहरात नगरपरिषद करावरील दंड माफीचा ऐतिहासिक निर्णय झाला असून मी नागरिकांना दिलेला शब्द पूर्ण केला आहे. याचे श्रेय सर्व नगरसेवक व मुख्याधिकारी यांना जाते. तरी शहरातील जास्तीत जास्त जनतेने या योजनेचा लाभ घ्यावा.

## मनपाच्या लाल शाळेमध्ये आग

आगीने रौद्ररूप धारण केले. रात्रीचा वेळ असल्यामुळे कोणाचेही याकडे लक्ष गेले नाही. यामुळे आग शाळेपर्यंत पोहोचली. शाळेच्या वरच्या मजल्यापर्यंत आग गेली. आगीचे लोळ दिसल्यावर नागरिक तिकडे धावले. त्यांनी घटनेची माहिती अग्निशमन विभागाला दिली. माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. दोन तासाच्या अथक प्रयत्नानंतर त्यांनी आगीवर नियंत्रण मिळविले. या आगीत शाळेमध्ये ठेवलेले साहित्य जळून पूर्णतः खाक झाले. आगीचे कारण अद्यापही अस्पष्ट आहे. धूळवड असल्यामुळे शाळेला सुटी होती. रात्रीचा वेळ असल्यामुळे मोठा अनर्थ टळला.

## दर्यापूर–अकोला मार्गावर

की आसपासच्या नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. अपघातात दुचाकीचा मोठ्या प्रमाणात चुराडा झाला असून युवकाच्या डोक्याला व पायाला गंभीर दुखापत झाली आहे.

अपघाताची माहिती मिळताच शिवसेना मदत कक्षाचे रुग्णसेवक गोपाल अरबट हेमंत उमाळे, सागर गेठे, आकाश पुंडकर, राहुल भुंबर, कमलेश वानखडे, आशिष उमाळे, विनय गावंडे यांनी तसेच कार्यकर्त्यांनी जखमी युवकाला रुग्णवाहिकेद्वारे दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. तसेच वाहतूक सुरळीत करण्यासाठीही मदत केली. दरम्यान, स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून अपघाताचे नेमके कारण शोधण्यास सुरुवात केली आहे. या अपघातामुळे काही काळ दर्यापूर–अकोला मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून नागरिकांकडून संबंधित रस्त्यावर वेगमर्यादा व सुरक्षा उपाययोजना कडक करण्याची मागणी होत आहे.

# नागपूरमार्गे येणा-या सुपारी वाहतुकीवर कडक कारवाई;

**मुंबई:** सुपारी प्रामुख्याने कर्नाटकातून येउन नागपूरमार्गे दिल्ली, पश्चिम बंगालसारख्या राज्यांत पाठवली जाते. वाहतुकीतील अनियमितता, जीएसटी चुकवेगिरी आणि संभाव्य अमली पदार्थ तस्करी रोखण्यासाठी मकोकाच्या धर्तीवर कठोर कायदा करण्याबाबत प्रारूप तयार असून ते विधि व न्याय विभागाकडे पाठवण्यात येणार असल्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधानपरिषरदेचे सांगितले.सदस्य कृपाल तुमाने यांनी नागपूरमार्गे होणा-या सुपारी वाहतुकीतील अनियमितता, जीएसटी चुकवेगिरी आणि संभाव्य अमली पदार्थ तस्करीच्या पार्श्वभूमीवर विधान परिषदेत लक्षवेधी सूचना मांडली. नागपूर व गुजरात बेल्टमध्ये इंटेलिजन्स बेस नाकाबंदीबाबतीत मनुष्यबळ उपलब्ध करून नियमित तपासणी व नाकाबंदी करण्यात येईल, असे मंत्री झिरवाळ यांनी सांगितले.

***No.2***

**CIVIL JUDGE SENIOR DIVISION**

IN THE COURT OF **Smt. S.V. Chandak**

16th Jt.Civil Judge, Sr. Dn. Amravati, AMRAVATI

**SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES (0.5, R.1, 5)**

Spl.C.S../891/2024

**Smt. Anjali Pramod Gharote -Vs- Sanjay Shankarrao Dalal**

**NEXT DATE -13.03.2026**

**To,**
1) Smt. Jayashree Deepak Charade, R/o.Shanti Sadan Colony, Amravati
2) Suraj Ramdas Ghore, R/o.Kholapuri Gate, Hanuman Nagar, Amt.
3) Amar Murlidhar Dhore, Kharkadipura, Amravati
4) Yuvraj Suresh Aagle, R/o. Hariom Vatika Sitabardi, Nagpur
5) Sangita Ganeshrao Raut, R/o. Hanuman Nagar, Amravati
6) Pravin Mahadeorao Mohoture,R/o.Jalka Shahapur,Tq. & Dist. Amt.
7) Rajesh Uttamrao Kasar, R/o. Gandhi Nagar, Amravati
8) Nitin Prabhakarrao Kandalkar, R/o.Anand Nagar, Nashik (M.S.)
9) Nagorao Pandurang Shende, R/o. Akola Jahangir, Dist. Akola
10) Mamta Diliprao Solanke, R/o.Hanuman Nagar, Amravati
11) Niyzuddin Pathan Nijamuddin Pathan, R/o.Nagpuri Gate, Amt.
12) Sonali Gajanan Nimke, R/o.Bhim Nagar, Ghatkopar, W. Mumbai

Whereas **Smt.Anjali Pramod Gharote** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the **13.03.2026** at **11.00 o'clock in the forenoon**, to answer the claim, and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base y our defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement. Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this **26.02.2026.**

**16th Jt.Civil Judge Sr.Dn.**

**Notice :** 1) Should you apprehend your witnesses will not attend of their own accord, y ou can have a summons from this Court to compel the attendance of any witness, and the production of any document that you have a right to call on the witness to produce, on applying to the Court and on depositing the necessary exenses. (2) If you admit the claim, you should pay the money into Court together with the costs of the suit, to avoid execution of the decree, which may be against your person or property, or both.

**Visit ecourts.govi.in for updates or download mobile app "ecourts Services" from Android or IOS.**

शिक्का

**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,
अमरावती

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, ५ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# मनपा 'ॲक्शन मोड'मध्ये

## सभापती विजय अग्रवाल यांनी पहिल्याच दिवशी घेतली आढावा बैठक

■ प्रतिनिधी | अकोला ■

*नवनिर्वाचित स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी पदभार स्वीकारताच अकोला महानगरपालिकेचा कारभार 'ॲक्शन मोड'मध्ये आणला आहे. सोमवारी सायंकाळी मनपा स्थायी समिती सभागृहात झालेल्या धडक आढावा बैठकीत त्यांनी प्रशासनाला विकास, वसुली आणि शिस्त या तीन मुद्द्यांवर स्पष्ट शब्दांत निर्देश दिले.*

बैठकीला महापौर शारदा रणजीत खेडकर, मनपा आयुक्त डॉ. सुनिल लहाने, उपमहापौर अमोल गोगे, सभागृहनेता पवन महल्ले, नगरसेवक सिद्धार्थ उपरवट, हर्षद भांबेरे यांच्यासह अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, मुख्य लेखापरीक्षक जगदीश मानमोठे, उपायुक्त विजय पारतवार, दिलीप जाधव, कार्यकारी अभियंता अजय गुजर, सचिव अमोल डोईफोडे आणि सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. नवनिर्वाचित सभापती विजय अग्रवाल यांच्या पहिल्याच बैठकीत प्रशासनाला स्पष्ट संदेश मिळाला असून, मनपाच्या कारभारात शिस्त, वेग आणि उत्तरदायित्वावर भर राहणार असल्याचे संकेत मिळाले आहेत.



**'विकासासाठी शासन - प्रशासन समन्वय हवा'**

सभापती अग्रवाल यांनी स्पष्ट केले की, 'शासन आणि प्रशासन यांचा समन्वय साधून अकोला शहराला विकासाच्या दिशेने नेणे हे आपले ध्येय आहे. नागरिकांना मुलभूत सुविधा दर्जेदार आणि अखंडित मिळाल्याच पाहिजेत. त्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करणे गरजेचे आहे.' मनपाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी उत्पन्नाच्या स्त्रोतांमधून वसुली वाढविणे, खर्चात काटकसर करणे आणि नवीन उत्पन्न स्त्रोत निर्माण करण्यावर भर देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

**पाणीपुरवठा व वसुलीवर विशेष भर**

शहरातील पिण्याच्या पाण्याचा अपव्यय रोखणे, दैनंदिन पाणीपुरवठ्याकडे वाटचाल करणे, बंद पडलेले हॅण्डपंप व सबमर्सिबल पंप दुरुस्त करणे, नादुरुस्त मीटरधारकांना नोटिसा देऊन मीटर बदलणे, गढूळ पाण्याच्या तक्रारींवर तत्काळ लिकेज दुरुस्ती व टाक्यांची स्वच्छता करणे, अवैध नळजोडण्या तोडण्यासाठी संयुक्त मोहीम राबविणे, तसेच पाणीपट्टी वसुली वाढविण्यासाठी नियोजन करण्याचे आदेश देण्यात आले.

**स्वच्छता व वाहन व्यवस्थापनात सुधारणा**

कचरा संकलनासाठी वापरल्या जाणाऱ्या कॉम्पेक्टर वाहनांचे अननुभवी चालकांमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी कंपनीकडून प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला. जेसीबी चालकांची दोन शिफ्टमध्ये नियुक्ती करून स्वच्छता कामात अडथळे दूर करावेत, कचरा ट्रॅक्टरची दुरुस्ती करावी, ऑनलाईन तक्रारी तात्काळ निकाली काढाव्यात, तसेच जन्म दाखले दोन दिवसांत देण्याची प्रक्रिया पूर्ण करावी, असे आदेश देण्यात आले.

**मोर्णा नदी सौंदर्यीकरणाला गती**

*शहराच्या मध्यभागातून वाहणाऱ्या मोर्णा नदी सौंदर्यीकरणाच्या प्रस्तावांना गती देणे, नदीतील वाढती जलकुंभी काढण्याचे नियोजन करणे, डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी फवारणी वाढविणे, नव्याने उभारलेल्या खांब्यांवर पथदिवे बसविण्याचा प्रस्ताव सादर करणे व दिवसा सुरू राहणाऱ्या पथदिव्यांवर नियंत्रण ठेवण्याच्या सूचना दिल्या.*

**अतिक्रमण, अनधिकृत बांधकामांवर कारवाई**

*शहरातील ३५ ते ३८ टक्के झोपडपट्टी भागातून येणाऱ्या तक्रारी तातडीने निकाली काढण्याचे निर्देश देताना, मनपाच्या जागांचा शोध घेऊन अहवाल सादर करण्यास सांगितले. अतिक्रमण विभागाने शहर अतिक्रमणमुक्त करण्यासाठी मोहीम राबवावी, पार्किंगसाठी जागा निश्चित कराव्यात, रस्त्यावर म्हशी बांधणाऱ्या मालकांवर कारवाई करावी, तसेच अनधिकृत बांधकामांवर लक्ष ठेवण्यासाठी झोन कार्यालयांत अभियंत्यांची संख्या वाढविण्याचे निर्देश दिले.*

# लाखपुरीतील शेतक-याच्या मुलाची बँकिंग क्षेत्रात तिहेरी भरारी

## शुभम इंगळे यांची आरआरबी पीओ, एसबीआय जेए व सीबीआय सीएसए पदासाठी एकत्रित निवड

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

तालुक्यातील लाखपुरी येथील निसर्गावर अवलंबून शेती करणाऱ्या कुटुंबातील युवकाने जिद्द, चिकाटी आणि नियोजनाच्या बळावर बँकिंग क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. श्री. वसंतराव महादेव इंगळे यांचे सुपुत्र शुभम इंगळे यांची ग्रामीण बँक परिविक्षाधीन अधिकारी, भारतीय स्टेट बँक कनिष्ठ सहयोगी (लिपिक) तसेच सेंट्रल बँक ग्राहक सेवा सहायक या तीन प्रतिष्ठित पदांसाठी एकत्रित निवड झाली आहे. या तिहेरी यशामुळे लाखपुरीसह संपूर्ण मुर्तिजापूर तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


शुभमचे वडील शेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतात, तर आई सौ. सुधा इंगळे गृहिणी आहेत. मर्यादित आर्थिक परिस्थितीतून शिक्षण घेत शुभमने यशाचा हा टप्पा गाठला. प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पूर्ण करून माध्यमिक शिक्षण लाखपुरी



येथील अर्चना विद्यालयात घेतले. पुढील शिक्षणासाठी त्यांनी दर्यापूर येथील आदर्श महाविद्यालयात प्रवेश घेतला. पदवीचे शिक्षण जे. डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालय, दर्यापूर येथे पूर्ण केले, तर पदव्युत्तर शिक्षण अकोला येथील आर. एल. टी. महाविद्यालयात पूर्ण केले. याशिवाय त्यांनी शासकीय महाविद्यालयातून शिक्षणशास्त्र पदवीही संपादन केली आहे.

गेल्या तीन वर्षांपासून शुभम सातत्याने स्पर्धा परीक्षांची तयारी करत होते. शेतीत कष्ट करणाऱ्या वडिलांचा आदर्श आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा मनात ठेवून त्यांनी नियोजनबद्ध अभ्यास सुरू ठेवला. कठोर परिश्रम आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी बँकिंग क्षेत्रातील तीन पदांवर एकाच वेळी यश मिळवले. ग्रामीण भागातील युवकांसाठी शुभमचे हे यश प्रेरणादायी ठरत असून, मेहनत आणि सातत्य असेल तर शासकीय बँकेत नोकरी मिळवणे शक्य आहे, हा संदेश त्यांनी दिला आहे. लाखपुरी गावासह मुर्तिजापूर तालुक्यात सर्व स्तरातून त्यांच्या या यशाबद्दल अभिमान व्यक्त केला जात आहे.

# वाशीममधून सुरु झाली ध्यान क्रांती; आता संपूर्ण जिल्हा होणार ध्यानमय'



■ प्रतिनिधी | वाशिम ■

येथील सामाजिक व आध्यात्मिक संस्था पिरामिड स्पिरिचुअल सोसायटी मूवमेंट यांच्या वतीने अलीकडेच वाशीम शहर 'ध्यानमय' करण्याचा संकल्प करण्यात आला होता. या संकल्पाअंतर्गत संस्थेच्या साधकांनी सलग ४० दिवस शहरातील विविध भागांमध्ये मोफत ध्यान सत्रांचे आयोजन केले. या उपक्रमात प्रामुख्याने आय.यू.डी.पी. कॉलनी, तिरुपती सिटी, लाखाळा परिसर, चांडक लेआउट, लाल बहादूर कॉलनी, शुक्रवार पेठ, हरिओम नगर, देवपेठ, गुरुवार बाजार परिसर, पुसद नाका, ग्रीन पार्क कॉलनी, विठ्ठलवाडी परिसर, रिद्धी-सिद्धी सोसायटी आदी भागांचा समावेश होता.

या अभियानात सुमित खत्री, राधिका खत्री, संजय व्यास, रुपा व्यास, रामदेव भाटी, वर्षा भाटी, रुपेश लड्ढा, पूनम लड्ढा, रेनू मितेश खत्री, भारती सुमित चांडक यांच्यासह इतर अनेक पिरामिड साधकांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

# टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिरात गौरक्षणातून संस्कृतीचा संदेश

■ प्रतिनिधी | अकोला ■

**- माजी विद्यार्थी संघाचा आगळी-वेगळी होळी**

**- गो संगोपन, स्वच्छता मोहिमेतून जपली सामाजिक बांधिलकी**

शहरातील टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर, मोठी उमरी येथील माजी विद्यार्थी संघाने यंदाची होळी आणि धुलीवंदन उत्सव आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करत रंगांच्या उधळणीसोबतच सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. गाई-वासरांचे पूजन, पुरणपोळीचा नैवेद्यसह गोसंगोपन आणि स्वच्छता मोहिमेतून समाजासमोर आदर्श ठेवला आहे.

टिळक राष्ट्रीय सरस्वती मंदिर, मोठी उमरी येथील माजी विद्यार्थी संघाच्या पुढाकारातून शाळेच्या आवारातील गौरक्षण परिसराची संपूर्ण स्वच्छता



करण्यात आली. परिसर झाडून स्वच्छ करून श्रीकृष्ण मूर्तीचे विधीवत पूजन करण्यात आले. त्यानंतर गाई-वासरांचे पूजन करून त्यांना पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. या उपक्रमातून 'सण साजरा करताना सामाजिक जबाबदारी विसरू नये' हा संदेश देण्यात आला. गोरक्षणाचे महत्त्व, भारतीय संस्कृतीतील गाईचे स्थान आणि पर्यावरणपूरक सण साजरे करण्याची गरज यावर मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी गाई-वासरांच्या संगोपनाची जबाबदारी माजी विद्यार्थी संघाने स्वीकारण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. तसेच शाळेच्या परिसराची दर रविवारी स्वच्छता मोहीम राबविण्याचा संकल्पही करण्यात आला आहे.

पारंपरिक होळीला सामाजिक सेवेची जोड देत साजरा केलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी मनापासून कौतुक केले. या कार्यक्रमाला माजी विद्यार्थी संघाच्या सुमारे ५० ते ६० सदस्यांची उपस्थिती होती. रंग, उत्साह आणि संस्कार यांचा संगम साधणाऱ्या या कार्यक्रमामुळे सकारात्मक संदेश पसरला असून, माजी विद्यार्थी संघाच्या या उपक्रमाचे सर्वत्र स्वागत होत आहे.

# कॅन्टीनवरील वादातून वॉर्डबॉयवर दगडाने हल्ला

## अकोट फाईल ठाण्यात गुन्हा दाखल

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील सन्मित्र हॉस्पिटल येथे कार्यरत कर्मचाऱ्यांमध्ये कॅन्टीनवर झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर थेट मारहाणीत झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. चहा घेत असताना झालेल्या शाब्दिक वादातून एका डॉक्टरांनी वॉर्डबॉयवर दगडाने हल्ला केल्याची तक्रार अकोट फाईल पोलीस ठाणे येथे दाखल करण्यात आली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी रोशन रविंद्र थोरात (वय २३, रा. बाळापूर रोड) हे संबंधित रुग्णालयात वॉर्डबॉय म्हणून कार्यरत आहेत. २ मार्च रोजी सायंकाळी सुमारे साडेचार वाजण्याच्या सुमारास ते नर्स पूजा चव्हाण यांच्यासह अकोट रोडवरील कॅन्टीनवर चहा घेण्यासाठी गेले होते. यावेळी तेथे डॉ. सायन राम बुटे, डॉ. सुनिल खराटे, डॉ. सालगर तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, फिर्यादीने डॉ. भुषण माहोकार यांच्याकडे नर्स पूजा चव्हाण संदर्भातील काही तक्रारीबाबत विचारणा केली. या मुद्द्यावरून दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला.

तक्रारीनुसार, संतापाच्या भरात डॉ. माहोकार यांनी शिवीगाळ करत हातातील दगड फिर्यादीच्या डोक्यावर मारला. या हल्ल्यात रोशन थोरात यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. उपस्थितांनी तातडीने मध्यस्थी करत दोघांमधील भांडण सोडवले. या घटनेप्रकरणी रोशन थोरात यांच्या फिर्यादीवरून अकोट फाईल पोलीस ठाण्यात मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. घटनेनंतर शहरात विविध चर्चांना उधाण आले असून, पोलिसांकडून या प्रकरणात नेमकी कोणती कारवाई केली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**व्यवस्थापनावरही प्रश्नचिन्ह**

दरम्यान, जखमी रोशन थोरात यांनी रुग्णालय व्यवस्थापनावर गंभीर आरोप केले आहेत. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अवस्थेत मदत करण्याऐवजी व्यवस्थापनाने आरोपी डॉक्टरचीच बाजू घेतल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच डॉ. राधिका केळकर यांनीही घटनेची गांभीर्याने दखल न घेता संबंधित डॉक्टरच्या बचावासाठी प्रयत्न केल्याचा दावा जखमींकडून करण्यात आला आहे.

# धुलीवंदनाच्या दिवशी दुचाकीचा भीषण अपघात; १९ वर्षीय युवक ठार, एक जखमी



■ प्रतिनिधी | रिसोड ■

धुलीवंदनाच्या दिवशी रिसोड–मालेगाव मार्गावर गवळी फार्म हाऊसजवळ दुचाकी नाल्याच्या पुलावर दुभाजकामध्ये जाऊन भीषण अपघात झाला. या अपघातात १९ वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. हे घटना दिनांक ३ मार्च रोजी दुपारी एक वाजता घडली. घटनेतील मृतक व जखमी हे रिसोड तालुक्यातील गणेशपुर येथील निवासी असून या घटनेनंतर गणेशपुर गावावर शोककळा पसरलेली आहे. विशीतल्या दोन तरुणाचा झालेला अपघाताची माहिती मिळताच ग्रामस्थांनी रिसोड ग्रामीण रुग्णालय गाठले.पवन सुरेश खंडागळे वय वर्ष १९ असे मृतकाचे नाव असून गौरव पाचरणे वय २० वर्ष असे जखमीचे नाव आहे.मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, दोघे युवक दुचाकीवरून मालेगाव चे दिशेने रिसोड कडे येत असताना वाहनावरील ताबा सुटल्याने दुचाकी रस्त्याच्या कडेला नालाच्या पुलांमधील दुभाजकामध्ये घुरली. धडक इतकी जबरदस्त होती की पवन खंडागळे या युवकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला. दोघं युवकांना युवकाला तातडीने ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले मात्र या ठिकाणी पवन खंडागळे याच्यावर डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर मृत घोषित केले. असून गौरव पाचरणे यास पुढील उपचाराकरिता वाशीम येथे रवाना करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. अपघाताचे नेमके कारण वेग, रस्त्याची स्थिती की अन्य काही याबाबत पुढील तपास सुरू आहे.धुलीवंदनासारख्या सणाच्या दिवशी घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी सणासुदीच्या काळात वाहन चालवताना वेगावर नियंत्रण ठेवावे व सुरक्षिततेचे नियम पाळावेत, असे आवाहन करण्यात येत आहे.

# वनोजा येथील महाविद्यालयाच्या प्राध्यापकांच्या कॉर्पोरेट अकाउंटिंग पुस्तकांचे उमरखेड येथे विमोचन

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

यवतमाळ जिल्हा अखिल कुणबी समाज संचालित गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालय, उमरखेड (जि. यवतमाळ) येथे पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी 'संशोधन पद्धती व बौद्धिक संपदा हक्क (घ्र्ढ्ढ)' या विषयावर एक दिवसीय विद्यापीठ स्तरीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेच्या निमित्ताने वाणिज्य शाखेतील महत्त्वपूर्ण पुस्तकांचे भव्य विमोचन करण्यात आले. या प्रसंगी मंगरुळपीर तालुक्यातील वनोजा येथिल साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालयातील प्राध्यापक यांनी एन.ई.पी. बी.कॉम. सत्र ४ च्या विद्यार्थ्यांसाठी विशेषतः तयार करण्यात आलेली 'कॉर्पोरेट अकाउंटिंग' आणि 'ॲडव्हान्स्ड कॉर्पोरेट अकाउंटिंग' ही दोन पुस्तके मान्यवरांच्या हस्ते पद्धतीने प्रकाशित व विमोचित करण्यात आली. ही पुस्तके प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव यांनी प्रकाशित केली आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ.



वाय. एम. राऊत यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी डॉ. चारुशीला रुमाले , कार्यशाळा संयोजक प्रा. माधव बी. कदम , प्रा. जयंत पोरे , डॉ. रूपा गुप्ता, गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक प्रा. बोंबीलवार मॅडम, तसेच कार्यशाळेचे संसाधन व्यक्ती व पुस्तकाचे लेखक प्रा. डॉ. वसुदेव गोलाईत (एम. ई. एस. कला व वाणिज्य महाविद्यालय, मेहकर) आणि लेखक प्रा. किशोर नवसागरे (गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालय, उमरखेड) यांची प्रमुख उपस्थिती होती. ही पुस्तके विद्यार्थ्यांना विषय अत्यंत सोप्या, सुबोध आणि उदाहरणाधारित पद्धतीने समजावून सांगण्यासाठी तयार करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे ही पुस्तके संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अद्ययावत अभ्यासक्रमानुसार तसेच बदललेल्या प्रश्नपत्रिका पद्धतीनुसार सिद्ध करण्यात आली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचे सखोल आकलन, प्रभावी परीक्षा तयारी आणि संकल्पनांची स्पष्ट मांडणी करण्यास मोठी मदत होणार आहे. मान्यवरांनी आपल्या मनोगतात प्रशांत पब्लिकेशन्स, जळगावचे रंगराव पाटील तसेच लेखक माजी प्राचार्य लक्ष्मण करांगळे, प्रा. वसुदेव गोलाईत, प्रा. सचिन कडू, प्रा. किशोर नवसागरे, प्रा. सुनिल बोरचाटे आणि प्रा. विनोद चव्हाण यांचे अभिनंदन केले. या पुस्तकांमुळे वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना निश्चितच मोठा शैक्षणिक लाभ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण यशस्वी

**वाशिम :** दि. ४ मार्च रोजी शेलगाव घुगे येथे कृषी विज्ञान केंद्र, वाशिम व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने 'Compost Production Technology' या विषयावर प्रात्यक्षिकाधारित (Method Demonstration) प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमास डॉ. आर. एल. काळे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, वाशिम; डॉ. भरत दशरथ गीते, प्रभारी अधिकारी, कृषी संशोधन केंद्र, वाशिम; शशिकांत गोटे, कनिष्ठ संशोधन सहाय्यक; तसेच संदीप पी. गुट्टे, कृषी सहाय्यक उपस्थित होते.

# विशेष उपक्रमातून भूमी अभिलेखच्या सेवांचा लाभ घ्यावा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रेरणेतून राज्यभर राबविण्यात येणाऱ्या महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्र. १ अंतर्गत महसूल विषयक दैनंदिन प्रश्नांचे तात्काळ निराकरण करण्यासाठी मंडळ स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. ग्रामीण व नागरी भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या प्रलंबित तक्रारी निकाली काढणे, महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करणे तसेच डिजिटल सेवांचा प्रभावी वापर सुनिश्चित करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

मंडळ स्तरावर दि. ७ मार्च, १४ मार्च, १० एप्रिल व १७ एप्रिल २०२६ रोजी समाधान शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. या शिबिरांमध्ये महसूल विभागाच्या विविध ऑनलाईन प्रणालींचा प्रत्यक्ष लाभ देण्यात येणार असून, सेवा थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

# गुजरातचे मुख्य निवडणूक अधिकारी संदीप सागळे यांचा सोनार महासंघातर्फे सत्कार

■ प्रतिनिधी | अकोला ■

भारतीय निवडणूक आयोगाने २००७ च्या बॅचचे ज्येष्ठ आयएएस अधिकारी संदीप जनार्दन सागळे यांची गुजरात राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारीपदी नियुक्ती केली आहे. या निवडीबद्दल अकोला जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून, सोनार महासंघातर्फे त्यांचा अहमदाबाद येथे जाऊन सत्कार करण्यात आला.

## अकोल्याचे सुपुत्र असल्याचा सार्थ अभिमान - विलास अनासाने

संदीप सागळे हे मूळ अकोल्याचे सुपुत्र असून, शिस्तप्रिय आणि कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांनी गुजरात कॅडरमध्ये विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. अहमदाबाद, बनासकांठा व भरूच आदी जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी म्हणून त्यांनी प्रभावी



कामगिरी बजावली आहे. तसेच गांधीनगर महानगरपालिकेचे आयुक्त म्हणूनही त्यांनी कार्य केले आहे. गुजरातमध्ये मतदार यादीची विशेष सघन सुधारणा पूर्ण झाल्यानंतर भारतीय निवडणूक आयोगाने नवीन मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची नियुक्ती जाहीर केली. स्वच्छ प्रतिमा आणि प्रशासकीय कौशल्य लक्षात घेऊन आयोगाने सागळे यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे.

सोनार महासंघाचे माजी अध्यक्ष विलास अनासाने यांनी सांगितले की, 'संदीप सागळे हे अकोल्याचे सुपुत्र असून त्यांनी देशपातळीवर नावलौकिक मिळविला आहे. त्यांच्या नियुक्तीचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. त्यांनी सोपविलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडावी, अशी अपेक्षा आहे.' अहमदाबाद येथील त्यांच्या शासकीय निवासस्थानी जाऊन सोनार महासंघातर्फे सागळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जनार्दन सागळे व विशाल माथने (बडोदा) उपस्थित होते.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ९७ ■ गुरुवार, ५ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## ‘स्पेशल २६’ची पुनरावृत्ती टळली

# तोतया आयकर अधिकारी रामनगर पोलिसांच्या जाळ्यात

**वर्धा जनमाध्यम :** १९ मार्च १९८७ रोजी मुंबईतील ओपेरा हाऊस येथे सीबीआय अधिकारी असल्याचे भासवून २६ जणांनी दागिन्यांच्या दुकानावर बनावट छापा टाकत कोट्यवधींची लूट केली. या थरारक घटनेवर आधारित Special २६ हा चित्रपट प्रदर्शित झाला असून, या चित्रपटातील धाडसदृश कथानकाची आठवण करून देणारी घटना बुधवारी वर्धा शहरात उघडकीस आली.

आयकर विभागाचे अधिकारी असल्याचा बनाव करून सर्च वॉरंटसह घरात प्रवेश करून आर्थिक गंडा घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन तरुणांना नागरिकांच्या सतर्कतेमुळे रामनगर पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून बनावट वॉरंट, ओळखपत्रे आणि अन्य कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत.

**दुपारी ‘धाड’ टाकण्याचा प्रयत्न**

४ मार्च रोजी दुपारी सुमारे २ वाजताच्या सुमारास साईनगर परिसरातील श्रीनिवास कॉलनी येथे राहणारे चिंतामण कोंगरे यांच्या घरी दोन तरुण आले. त्यांनी आपली नावे किसन पर्बत व चेतन चव्हाण अशी सांगितली. आपण मुंबई येथील आयकर विभागाचे अधिकारी असून तुमच्या घरावर सर्च वॉरंट आहे, तपासणी करावयाची आहे, असे सांगत त्यांनी घरात प्रवेश केला.

घरझडतीच्या बहाण्याने त्यांनी कागदपत्रे, रोकड रक्कम आणि मौल्यवान वस्तू बाहेर काढण्यास सांगितले. एवढेच नव्हे तर मोबाईलद्वारे संपूर्ण कारवाईचे चित्रिकरण सुरू असल्याचा बनाव करून कुटुंबीयांवर मानसिक दबाव टाकण्याचाही प्रयत्न केला.

**संशय, पडताळणी आणि पोलिसांना माहिती**



दरम्यान, संबंधित तरुणांच्या बोलण्यात विसंगती आढळल्याने कोंगरे कुटुंबीयांना संशय आला. चिंतामण कोंगरे यांचे पुत्र सुहास यांनी तात्काळ शेखर शेंडे व प्रवीण हिवरे यांना माहिती दिली. पुढील खातरजमेसाठी सीए जगदीश चांडक यांच्याशी संपर्क साधण्यात आला. संवादादरम्यान संबंधित तरुणांच्या उत्तरांमध्ये तफावत जाणवल्याने ते खरे अधिकारी नसावेत, असा संशय बळावला.

त्यानंतर उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद मकेश्वर तसेच पोलिस नियंत्रण कक्षाला माहिती देण्यात आली. रामनगर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत दोन्ही संशयितांना ताब्यात घेतले व पोलिस ठाण्यात आणले.

**कागदपत्रे प्रथमदर्शनी बनावट**

पोलिसांनी आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांना पाचारण करून सादर केलेल्या वॉरंट व ओळखपत्रांची पडताळणी केली असता ती प्रथमदर्शनी बनावट असल्याचे दिसून आले. दोघांकडील कागदपत्रे, ओळखपत्रे व अन्य साहित्य जप्त करण्यात आले असून अधिक चौकशी सुरू आहे.

रात्री सुमारे ७.२४ वाजेपर्यंत तक्रार स्वीकारून गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया रामनगर पोलिस ठाण्यात सुरू होती. या प्रकरणी फसवणूक, बनावट कागदपत्रे तयार करणे आदी कलमांन्वये गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे.

या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे. शासकीय अधिकारी असल्याचे सांगून घरात प्रवेश मागितल्यास संबंधित विभागाशी थेट संपर्क साधून खातरजमा करावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. नागरिकांच्या जागरूकतेमुळे मोठी आर्थिक फसवणूक टळली असून, अशा प्रकारच्या टोळ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल, असेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## ७ मार्चला भारत गणेशपुरे यांची ग्रामपंचायतींना भेट

**वर्धा जनमाध्यम :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत सहभागी ग्रामपंचायतींना प्रोत्साहन देण्यासाठी ७ मार्च २०२६ रोजी प्रसिद्ध अभिनेते भारत गणेशपुरे जिल्ह्यातील तीन गावांना भेट देणार आहेत. या भेटीदरम्यान अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या कामांची पाहणी करून ग्रामस्थांशी संवाद साधण्यात येणार आहे.



कारंजा तालुक्यातील भालेवाडी, वर्धा तालुक्यातील सालोड (हिरापूर) आणि समुद्रपूर तालुक्यातील कानकाटी या ग्रामपंचायतींमध्ये अभियानाची अंमलबजावणी सुरू आहे. या ग्रामपंचायतींनी विविध विकासकामे हाती घेतली असून, त्याचा आढावा घेण्यासाठी तसेच ग्रामस्थांचा उत्साह वाढविण्यासाठी ही भेट आयोजित करण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सन २०२५-२६ पासून राबविण्यात येत आहे. या अभियानाचा उद्देश ग्रामपंचायती, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांची कार्यक्षमता वाढविणे, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत लाभ पोहोचविणे हा आहे. स्पर्धात्मक वातावरणातून ग्रामपंचायतींना प्रोत्साहन देऊन गावांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न या माध्यमातून होत आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायती अभियानात सहभागी झाल्या आहेत. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) अमोल भोसले तसेच संबंधित अधिकारी कर्मचारी गावोगावी भेट देऊन कामांची पाहणी करत आहेत.

या भेटीदरम्यान ग्रामस्थांनी लोकसहभागातून विकासकामांत पुढाकार घ्यावा, श्रमदानातून गावांचा कायापालट घडवून आणावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. अभियान अधिक लोकाभिमुख व्हावे आणि ग्रामविकासाला चालना मिळावी, हा या कार्यक्रमामागील मुख्य हेतू आहे.

## वर्ध्यात होणार भव्य ‘वनभवन’, २३ कोटी २९ लक्ष मंजूर

### -पालकमंत्री डॉ.भोयर यांच्या प्रयत्नाचे फलीत

**वर्धा जनमाध्यम :** येथील उपवनसंरक्षक कार्यालयाची विद्यमान इमारत अत्यंत जुनी व प्रशासकीयदृष्ट्या अपुरी होती. वाढत्या प्रशासकीय कामकाजाच्या तुलनेत ही इमारत लहान ठरत होती. दरम्यान, अलीकडेच बोर व्याघ्र प्रकल्पाच्या उपसंचालक कार्यालयास मंजुरी मळाल्याने वन विभागाच्या कामकाजात आणखी वाढ झाली. याशिवाय वन विभागाच्या अखत्यारितील सामाजिक वनीकरण विभागाचे कार्यालयही वेगळ्या ठिकाणी कार्यरत होते.ही बाब लक्षात घेत पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी राज्य शासनाकडे वनभवनासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नाला यश आले आहे. महसूल व वन विभागाने वनभवनासाठी २३ कोटी २९ लक्ष रूपयांचा निधी मंजूर केला आहे.

शहरातील सिव्हिल लाईन परिसरात उप वन संरक्षक यांचे कार्यालय आहे. सदर कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम बरेच जुने आहे. वन विभागाच्या अखत्यारीतील अन्य कार्यालय इतरत असल्याने प्रशासनिक दृष्टया सोयीचे नव्हते. त्यामुळे अनेक अडचणी निर्माण होत होत्या. शेतकरी, नागरिक व लाभार्थ्यांना वनविभागाशी संबंधित विविध कामांसाठी वेगवेगळ्या कार्यालयांमध्ये फे-या माराव्या लागत होत्या. त्यामुळे वेळ, श्रम आणि खर्च वाढत होता. ही परिस्थिती लक्षात घेऊन जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी वर्धा येथे सर्व उप वन संरक्षक कार्यालय परिसरात स्वतंत्र व सुसज्ज वनभवन उभारण्यासाठी पुढाकार घेतला. वन विभाग, बोर व्याघ्र प्रकल्पाचे उपसंचालक कार्यालय आणि सामाजिक वनीकरण विभागाची कार्यालये एकाच छताखाली आणण्याच्या दृष्टीने त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने उपवनसंरक्षक कार्यालयाच्या परिसरात तिन्ही विभागांसाठी एकत्रित वनभवन उभारण्याचा सविस्तर प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केला. या प्रस्तावामध्ये तळमजला अधिक दोन मजले, प्रशासकीय कक्ष, सभागृह तसेच वाहनतळाची सुविधा समाविष्ट करण्यात आली आहे.

एकूण ४,९८९.२१ चौ. मीटर क्षेत्रात या भव्य इमारतीचे बांधकाम करण्यात येणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी २३ कोटी २९ लाख रुपयांच्या खर्चास उच्चस्तरीय समितीने मान्यता दिली असून, याबाबतचा अधिकृत शासन आदेश महसूल व वन विभागाने २ मार्च रोजी निर्गमित केला आहे.

**अशी असणार वास्तू**

उप वनसंरक्षक कार्यालय परिसरात ४९८९.२१ चौ. मी. जागेत वनभवन उभे राहणार आहे. १३११.५५ चौ. मीटर मध्ये वाहनतळ तसेच ३६७७.६६ चौ.मीटर मध्ये तळमजला अधिक दोन मजले अशी इमारत राहणार आहे. सुरक्षा भिंत, दोन लिफ्ट व अन्य सुविधा राहणार आहे. तथापि, तिन्ही कार्यालय एकाच ठिकाणी राहणार असल्याने प्रशासनिक दृष्टया सोयीचे होणार आहे. यासंदर्भात पालकमंत्री डॉ. भोयर यांनी राज्याचे वन मंत्री गणेश नाईक यांची मागील आठवडयात भेट घेऊन वन भवनाच्या इमारतीसाठी निधी देण्याची मागणी केली होती. एका आठवडयात वनमंत्री नाईक यांनी निधी उपलब्ध करून दिला आहे. पालकमंत्री डॉ. भोयर यांनी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, वनमंत्री गणेश नाईक यांचे आभार मानले.

## रेतीघाट हत्याकांडः आमदार बकाने यांची विधानसभेत सीआयडी चौकशीची मागणी

**पुलगाव/देवळी जनमाध्यम :** पुलगाव-देवळी मतदारसंघाचे आमदार राजेश बकाने यांनी विधानसभेत भारत नागपाल हत्याकांडाची स्वतंत्र सीआयडी चौकशी करण्याची ठाम मागणी केली. सभापतीसमोर बोलताना त्यांनी प्रकरणातील गंभीर बाबी मांडल्या आणि सरकारकडे तातडीने निष्पक्ष चौकशी जाहीर करण्याची मागणी केली.

बकाने म्हणाले की, भारत नागपाल यांना नियोजनपूर्वक रेतीघाटावर बोलावण्यात आले. घाटाबाहेर जाण्याचा मार्ग वाहनांनी अडवून सुमारे २० जणांच्या गटाने त्यांच्यावर हल्ला केला. निहत्थ्या नागपाल यांची निर्घृण हत्या करून त्यांना नदीपात्रात फेकण्यात आले, असे त्यांनी सभागृहात सांगितले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये संताप पसरला आहे.

आमदार बकाने यांनी पोलिसांवरही टीका केली. २० जणांपैकी फक्त १४ जणांवर गुन्हा दाखल केला गेला असून, त्यापैकी १२ जणांना अटक करण्यात आली आहे. घटनेचा संपूर्ण तपास निष्पक्षपणे व्हावा आणि खरे दोषी कडक शिक्षा भोगतील, यासाठी सीआयडी चौकशी अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

बकाने म्हणाले की, महसूल विभागाने रेतीघाटाचे योग्य सीमांकन केले असते तर अशा घटना टाळता आल्या असत्या. भविष्यात अशा घटनेपासून बचावासाठी सीमांकन प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, अशी मागणी त्यांनी केली.

## नागपाल हत्याकांड: तीन आरोपी जेरबंद

**वर्धा/जनमाध्यम :** वणा नदी पात्रातील वाळू व्यावसायिक भारत नागपाल हत्याकांड प्रकरणातील फरार असलेल्या तीन आरोपींना वर्धा स्थानिक गुन्हे शाखेने इगतपुरी येथून अटक केली. अटक केलेल्या आरोपींमध्ये अक्षय खडसे, सौरभ ठाकूर आणि अमोल कामडी यांचा समावेश आहे. कारवाईनंतर तिघांना वरोरा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.वरोरा न्यायालयाने सुनावणीदरम्यान तिघांना ९ तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिस आता हत्येमागील आर्थिक व्यवहार, वाळू घाटांवरील वाद आणि इतर आरोपींचा सहभाग यांचा सखोल तपास करत आहेत.

## घरफोडी करणारे अट्टल चोरटे जेरबंद

### -एलसीबीची कारवाई; १०.४१ लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** शहरासह जिल्ह्यात घरफोडीच्या घटनांनी डोके वर काढले असतानाच स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) धडक कारवाई करत दोन अट्टल चोरट्यांना जेरबंद केले. आरोपींकडून सोने-चांदीचे दागिने, रोख रक्कम, दुचाकी व मोबाईल असा एकूण १० लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

प्रवीण अंबादास लोहवेरा (रा. समता नगर, वर्धा) यांनी घरफोडीबाबतची तक्रार वर्धा शहर पोलिस ठाणे येथे दाखल केली होती. त्यावरून गुन्हा नोंदवून तपास सुरू करण्यात आला. तपासादरम्यान एलसीबी पथकाने विविध जिल्ह्यांतील घरफोडीच्या गुन्ह्यांचा तपशील तपासला.



गोपनीय माहितीच्या आधारे विवेक उर्फ मांडा बबन मंगरे (वय १९, रा. तलाव फैल, यवतमाळ) व आकाश उर्फ रॅपर राजू वाढवे (वय २२, रा. तलाव फैल, यवतमाळ, सध्या ह.मु. पुणे) यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. चोरी केलेला मुद्देमाल प्रसाद उर्फ दादू ज्ञानेश्वर देवकते (वय २०, रा. तलाव फाईल, पॉवर हाऊसजवळ, यवतमाळ) व आकाश उर्फ भुई सुरेश शेंडे (वय १९, रा. तलाव फाईल, यवतमाळ) यांच्या माध्यमातून विकल्याचे उघड झाले. त्यानुसार दोघांनाही अटक करण्यात आली. चारही आरोपींकडून ६१ ग्रॅम सोन्याचे दागिने, ३५ ग्रॅम चांदीचे दागिने, १ लाख ४१ हजार ५०० रुपये रोख रक्कम, गुन्ह्यात वापरलेली दुचाकी, मोबाईल व इतर साहित्य असा एकूण १० लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. आरोपींना पुढील कारवाईसाठी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) पथकाने केली. ही मोहीम पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पथकात पोलिस उपनिरीक्षक विजयसिंग गोमलाडू, प्रकाश लसुंते, शेखर डोंगरे, अरविंद येनुरकर, रोशन निंभोरकर, रवी पुरोहित, विकास मुंढे, सुगम चौधरी, शुभम राऊत, अभिषेक नाईक, राहुल लुटे, रितेश गेटमे, दिनेश बोथकर, अक्षय राऊत व गोविंद मुंडे यांचा समावेश होता.


## नगर परिषद कार्यालय, देवळी, जि.वर्धा

### वार्षिक ठेका व खरेदी, देखभाल व दुरुस्तीबाबत

### निविदा सुचना

दिनांक ०४.०३.२०२६ क्रमांक - नपदे/साप्रवि/३१४/२०२६

देवळी नगर परिषदेला सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरीता विविध कामाच्या वार्षिक निविदा पंजीकृत कंत्राटदारांकडून/पुरवठाधारकांकडून दिनांक ०५.०३.२०२६ ते १८.०३.२०२६ पर्यंतचे दुपारी ३.०० वाजेपर्यंत निविदा मागविण्यात येत आहे. निविदा फॉर्म विक्री दिनांक ०६.०३.२०२६ ते १७.०३.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत राहील. निविदा बाबतचे अटी व शर्ती संबंधित विभागाकडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. (प्रत्येक कामाच्या निविदा द्वी-लिफाफा पध्दतीने वेगवेगळ्या दाखल करणत याव्या.)

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम | अनामत रक्कम | निविदा फॉर्म किंमत रु. |
|---|---|---|---|---|
| | **सामान्य प्रशासन विभाग** | | | |
| १. | सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता स्टेशनरी/प्रिंटींग साहित्य खरेदीबाबत दरपत्रक मागविणे | आवश्यकतेनुसार | ५,०००/- | १,०००/- |
| २. | नगर परिषद कार्यालयीन कामकाजाकरीता चारचाकी वाहन ड्रायव्हरसह, डिझेल/पेट्रोलसह पुरवठा करण्याबाबत | आवश्यकतेनुसार | ५,०००/- | १,०००/- |
| ३. | सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता कार्यालयीन विविध कामे करण्याकरीता कुशल, अर्धकुशल व अकुशल मनुष्यबळ बाह्य कंत्राट पध्दतीने एजंसी मार्फत आवश्यकतेनुसार पुरवठा करणे | आवश्यकतेनुसार | ५,०००/- | १,०००/- |
| | **बांधकाम विभाग** | | | |
| १. | सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता नगर परिषद क्षेत्रातील रस्ते दुरुस्ती अंतर्गत हार्ड मुरुम, दगडी चुरा पुरवठा करुन पसरविणयबाबत (दर प्रती १०० घनफुटाप्रमाणे रॉयल्टीसह द्यावे) | आवश्यकतेनुसार | ५,०००/- | १,०००/- |
| २. | सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता नगर परिषद क्षेत्रातील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे काढण्याकरीता जेसीबी मशीन डिझेल व ड्रायव्हरसह किरायाने घेण्याबाबत (दर प्रती तास प्रमाणे) | आवश्यकतेनुसार | ५,०००/- | १,०००/- |
| ३. | न.प.क्षेत्रातील तुटलेले स्लॅब क्लवट बांधकाम, रस्त्यावरील खड्डे बुजविणे, नाली दुरुस्ती बांधकामाचा वार्षिक कंत्राट बाबत. | आवश्यकतेनुसार | ५,०००/- | १,०००/- |
| ४. | नगर परिषद क्षेत्रातील झाडांच्या फांद्या मजुराद्वारा कटाई करण्याबाबत | आवश्यकतेनुसार | १,०००/- | १,०००/- |
| | **स्वच्छता विभाग** | | | |
| १. | सन २०२६-२७ या वर्षाकरीता बॅनर्स/होर्डिंग्ज/स्टिकर्स व पॉम्लेट छपाई करुन पुरवठा करण्याबाबत | आवश्यकतेनुसार | ५,०००/- | १,०००/- |
| २. | सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता स्वच्छता विभागाकरीता साफसफाई करीता आवश्यक असणारे साहित्य खरेदी करण्याबाबत | आवश्यकतेनुसार | ५,०००/- | १,०००/- |
| ३. | सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता नगर परिषद कार्यालय परिसरातील बगीचा व डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातील बगीचा, खाडे लेआऊट येथील बगीचा व वाचनालय बगीच्याची देखभाल व ईतर ठिकाणी झाडांची लागवड व देखभाल करणे बाबत. | आवश्यकतेनुसार | ५,०००/- | १,०००/- |
| ४. | सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता स्वच्छता विभागाकरीता आवश्यक असणारे जंतुनाशके खरेदी करणे | आवश्यकतेनुसार | ५,०००/- | १,०००/- |
| ५. | सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरीता स्वच्छ सर्वेक्षण, माझी वसुंधरा व ईतर शासकीय कार्यक्रमाकरीता शहरात माहिती व प्रसिध्दी करीता सार्वजनिक ठिकाणी रंगरंगोटी करणे | आवश्यकतेनुसार | ५,०००/- | १,०००/- |
| ६. | माझी वसुंधरा अभियान अंतर्गत, शहरातील रस्त्यांच्या दुतर्फा, मोकळ्या प्रांगणात, खुल्या व पडीत जागेवर वृक्षारोपण करण्याकरीता आवश्यक असलेल्या वृक्षांचा पुरवठा करणे बाबत. | आवश्यकतेनुसार | ५,०००/- | १,०००/- |
| ७. | सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता न.प.मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी सुरक्षा रक्षक (चौकीदार) यांचा आवश्यकतेनुसार पुरवठा करणे बाबत. | आवश्यकतेनुसार | ५,०००/- | १,०००/- |
| | **संगणक विभाग** | | | |
| १. | सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता नगर परिषद कार्यालयीन संगणक संच (AMC), झेरॉक्स मशीन देखभाल व दुरुस्ती, प्रिंटर व झेरॉक्स मशीन मधील कार्टेज रिफिलींग व दुरुस्ती तसेच आवश्यक संगणक साहित्य खरेदी बाबत वार्षिक निविदा. | आवश्यकतेनुसार | ५,०००/- | १,०००/- |
| | **अग्निशमन विभाग** | | | |
| १. | सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता नगर परिषद अग्निशमन विभागाकरीता ड्रायव्हर, फायरमन यांचा आवश्यकतेनुसार पुरवठा करणे. | आवश्यकतेनुसार | ५,०००/- | १,०००/- |
| | **विद्युत विभाग** | | | |
| १. | सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता नगर परिषद देवळी क्षेत्रातील सर्व प्रकारचे एल.ई.डी. स्ट्रीट लाईट व हायमास्टचे एल.ई.डी.लाईट साहित्यासह देखभाल व दुरुस्ती करणे व शहरातील सर्व स्ट्रीट लाईट चालू व बंद करणे, तसेच शॉट सर्कीटचे देखभाल व दुरुस्ती करणे बाबत. | आवश्यकतेनुसार | ५,०००/- | १,०००/- |

**टीप -**

१) लागणारे साहित्याची यादी व ठेक्यासंबंधीची, लिलावाची माहिती/अटी व शर्ती संबंधित विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

२) संबंधित कामाच्या/ठेक्याच्या/साहित्याच्या दराबाबतचे निविदा फॉर्म रोखपाल, न.प.यांचेकडे कार्यालयीन वेळेत विकत मिळेल.

३) निविदा द्वी-लिफाफा पध्दतीने सिलबंद लिफाफ्यात सादर करावी. निविदा सादर करतांना रोखपाल, न.प.यांचेकडे अनामत रकमेचा भरणा करुन नंतर आवक लिपिकाकडे द्यावी

**स्वा/-**
**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, देवळी,**
**जि.वर्धा**

■ गुरुवार ५ मार्च २०२६

paper www.janmadhyam.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

## राज्यसभेसाठी भाजपची यादी जाहीर

# महाराष्ट्रातून विनोद तावडे, रामदास आठवले, रामराव वडकुते, माया इवनाते यांना उमेदवारी













**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** राज्यसभेसाठी भाजपने आज उमेदवार यादी जाहीर केली असून महाराष्ट्रातून विनोद तावडे, रामदास आठवले, रामराव वडकुते आणि माया इवनाते यांना उमेदवारी देण्यात आली आहे. महाराष्ट्रातील राज्यसभेच्या ७ जागांसाठी १६ मार्च रोजी मतदान होणार आहे.भाजपचे राष्ट्रीय महासचिव अरुण सिंह यांनी ही यादी जाहीर केली. राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख ५ मार्च असून ६ मार्च रोजी अर्जांची छाननी होईल. उमेदवारांना माघार घेण्यासाठी ९ मार्चपर्यंतची मुदत आहे. विनोद तावडे महाराष्ट्र विधान परिषदेत विरोधी पक्षनेतेपद भूषविले आहे. त्यांनी शालेय शिक्षण, उच्च आणि तांत्रिक शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास तसेच मराठी भाषा (भाषा) आणि संस्कृती खात्याचे मंत्रिपदही भूषविले आहे. मात्र, त्यानंतर पुन्हा त्यांना पक्षसंघटनेत काम करण्याची संधी देण्यात आली. सध्या ते भाजपच्या महाराष्ट्र युनिटचे सरचिटणीस आहेत. अखिल भारतीय राष्ट्रीय कार्यकारी परिषदेचे सदस्य आणि १२ व्या आणि १३ व्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजपच्या समन्वय समितीचेही ते प्रमुख सदस्य होते. आता राज्यसभेची उमेदवारी मिळाल्यामुळे ते पुन्हा एकदा संघटनात्मक कामातून मुख्य प्रवाहात आलेत.

**आठवलेंना तिस-यांदा संधी-** रिपाइंचे रामदास आठवले यांना यंदा राज्यसभेची उमेदवारी मिळणार की नाही, याबाबत साशंकता होती. त्यांचा पत्ता कट होणार, अशी शक्यताही वर्तवली जात होती. मात्र, भाजपने आपल्या कोट्यातून सलग तिस-यावेळेस आठवलेंना राज्यसभेची संधी दिली.

**वडकुते धनगर समाजाचे नेते-** हिंगोली जिल्ह्यातले भाजप नेते व माजी आमदार रामराव वडकुते यांना यंदा भाजपने राज्यसभेची उमेदवारी जाहीर केली. धनगर समाजाचे नेते ही वडकुते यांची ओळख. ते २००४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होते. त्यांना पक्षाने विधानसभेची उमेदवारीही दिली होती. मात्र, त्यांचा पराभव झाला. पुढे २००९ मध्ये ही जागा काँग्रेसच्या वाट्याला गेली. येथून युवक काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष राजीव सातव यांची वर्णी लागली. त्यानंतर वडकुते यांना राष्ट्रवादी काँग्रेसने विधान परिषदेवर पाठवले. मात्र, २०१९ विधानसभा निवडणुकीपूर्वी ते भाजपमध्ये आले. आता त्यांना पक्षाने राज्यसभेची उमेदवारी दिली.

**इवनाते आदिवासी नेत्या-**आदिवासी नेत्या असणारे माया इवनाते या सध्याच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या निकटवर्तीय म्हणून गणल्या जातात. अनुसूचित जमातीच्या राष्ट्रीय आयोगावर त्यांनी सदस्य म्हणून काम केले. त्या नागपूरच्या माजी महापौर राहिल्या आहेत. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीतही त्या नगरसेवक म्हणून निवडून आल्या होत्या. सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही नागपूरचे आहेत. त्यामुळे नागपूरच्या लेकीला भाजपने राज्यसभेची संधी दिली.

# मला राजकारणच नाही तर आयुष्यातून उठवण्याचे हे षडयंत्र

## लोकायुक्तांच्या निकालावर धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले समाधान

**मुंबई/प्रतिनिधीः-** राज्याच्या कृषीमंत्री पदी असताना केलेल्या कृषी साहित्य खरेदी संदर्भात मा. उच्च न्यायालयापाठोपाठ राज्य लोकायुक्त यांनी देखील आपल्याविरुद्ध केलेले सर्व आरोप फेटाळून लावले असून आपण शासनाच्या नियमानुसार व शेतकऱ्यांचे हित समोर ठेऊनच संबंधित खरेदी बाबतचा निर्णय शासनाच्या विशेष वृत्ती आराखड्याच्या अंतर्गत घेतला होता. या प्रकरणात न्यायव्यवस्था आणि नियतीने सत्य समोर आणले आहे, असे म्हणत धनंजय मुंडे यांनी लोकायुक्तांच्या निर्णयावर समाधान व्यक्त केले आहे.

आज मुंबईतील विधानभवन येथे धनंजय मुंडे यांनी बऱ्याच दिवसानंतर पत्रकारांशी सविस्तर चर्चा केली.

कृषी साहित्य खरेदी, ऑफिस ऑफ प्रॉफिट असे नाना प्रकारचे आरोप माझ्यावर करण्यात आले, यामध्ये कृषी खरेदीबाबत सुरुवातीला उच्च न्यायालयात ज्यांनी तक्रार केली होती, त्यांना खोटे पुरावे दिले आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून शासनाची बदनामी केली म्हणून उच्च न्यायालयाने एक लाखांचा दंड ठोठावला, त्यांनी तो भरला सुद्धा.ऑफिस ऑफ प्रॉफिट, पिक विमा असा कोणताही आरोप सिद्ध झाला नाही, मात्र माझ्या बदनामीच्या ट्रायल रंगवून दाखवल्या केल्या.

हे एक मोठे षडयंत्र असून, मला



केवळ राजकारण किंवा समाजकारण यामधून संपवायचे नाही तर काही लोकांना मी या पृथ्वीतलावर नको आहे, त्यातून हे सगळे घडवून आणले जात असल्याचा गंभीर आरोप धनंजय मुंडे यांनी यावेळी बोलताना केला.

अंजली दमानिया यांच्या बाबत विचारले असता धनंजय मुंडे म्हणाले की त्यांनी संपूर्ण जीवनात नितीन गडकरी साहेब, स्व. अजितदादा, खडसे साहेब, भुजबळ साहेब, तटकरे साहेब अशा अनेक नेत्यांवर ढीगभर आरोप करून बदनामी केली, मात्र त्यांनी केलेला एकतरी आरोप कुठे सिद्ध झालेला आहे का?

केवळ खोटे पुरावे समोर आणायचे, माध्यमांच्या समोर सनसनी निर्माण करायची आणि एखाद्याला बदनाम करायचे, हे सगळे थांबवले गेले पाहिजे. असे कळकळीचे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले. तर पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना आपण सध्यातरी अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार नसल्याचे मुंडेंनी स्पष्ट केले.

दरम्यान मागील काही महिन्यांपासून आपल्या विरुद्ध मोठे षडयंत्र रचले जात आहे. त्यातूनच रोज नवनवीन आरोप आणि बदनामीची एक अजब मालिका सुरू आहे. मात्र न्यायव्यवस्थेसमोर एकही आरोप सिद्ध झालेला नाही. आपली बाजू सत्याची आणि त्यामुळेच नियती आपल्या सोबत आहे; त्यामुळे सहकारी आणि कार्यकर्त्यांनी देखील संयम ठेवावा, असे आवाहनही धनंजय मुंडे यांनी आपल्या कार्यकर्त्यांना केले आहे.

## गर्भाशय-मुखाचा कॅन्सर रोखणार

# सरकारतर्फे मुलींना मोफत लस

**मुंबई/प्रतिनिधी :** महिलांमधील गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग (सर्वाइकल कॅन्सर) रोखण्यासाठी केंद्र सरकारतर्फे देशभरातील १४ वर्षे वयोगटातील मुलींचे एचपीव्ही लसीकरण मोहीम सुरू करण्यात आली आहे. मुलींना गार्डसिल ही ३,९२७ रुपयांची लस एकाच डोसच्या स्वरूपात देण्यात येत आहे. गार्डसिल ही लस एकाच डोसच्या स्वरूपात मोफत देण्यात येणार असून, या मोहिमेमुळे लाखो मुलींना भविष्यातील कर्करोगाच्या धोक्यापासून संरक्षण मिळणार आहे.




तज्ज्ञांच्या मते, वेळेवर लसीकरण केल्यास सर्वाइकल कॅन्सरचा धोका कमी करता येतो. केंद्र सरकारच्या या उपक्रमामुळे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला मोठा दिलासा मिळणार आहे. भारतात स्तनाच्या कर्करोगानंतर गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग हा महिलांमध्ये दुस-या क्रमांकाचा सर्वाधिक आढळणारा कर्करोग आहे. ग्रामीण व अल्पसुविधा असलेल्या भागांत तपासणीअभावी उशिरा निदान होते, त्यामुळे मृत्युदर जास्त आहे.

**लसीकरणाने धोका टळेल-** हा लसीकरणाने टाळता येणारा कर्करोग आहे. सन २०२२ मध्ये भारतातील कर्करोगाचा प्रादुर्भाव १ लाख महिलांमागे १७.७ टक्के इतका होता.

**पालिकेचा आरोग्य विभाग सज्ज-** या मोहिमेसाठी मुंबई महानगरपालिकेस लसीच्या २० हजार १६० मात्रा प्राप्त झाल्या आहेत. ही मोहीम यशस्वीपणे राबविण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत महानगरपालिकास्तरीय अधिकारी, २६२ वैद्यकीय अधिकारी, १००८ परिचारिका, ४४२८ आशा सेविका व आरोग्य स्वयंसेविका यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

**सर्वसामान्य कुटुंबांवरील आर्थिक भार होणार कमी-**१. एचपीव्ही हा विषाणू असून त्याच्या काही प्रकारांमुळे गर्भाशयाच्या मुखातील पेशींमध्ये बदल होउन पुढे कर्करोग होउ शकतो. दीर्घकाळ संसर्ग राहिल्यास धोका वाढतो. योग्य वयात एचपीव्ही लस घेतल्यास गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून सुमारे ८५ टक्क्यांपर्यंत संरक्षण मिळू शकते. त्यामुळे लसीकरण हा प्रतिबंधात्मक उपाय अत्यंत प्रभावी मानला जातो. या लसीची किंमत ३,९२७ रुपये प्रति डोस आहे. सरकारकडून ही लस मोफत देण्यात येणार असल्याने सर्वसामान्य कुटुंबांवरील आर्थिक भार कमी होईल. २. मोहिमेंतर्गत गार्डसिल-४ या एचपीव्ही लसीची एक मात्रा (०.५ मिली) डाव्या दंडावर स्नायूमध्ये दिली जाणार आहे. हे लसीकरण ऐच्छिक असून, पालकांच्या संमतीची आवश्यकता आहे. एचपीव्ही लसीकरणासाठीची नोंदणी यु-विन पोर्टलद्वारे डिजिटल पद्धतीने केली जाणार आहे.





# मेळघाट संघर्ष यात्रेचे आक्रमक स्वरुप

## हजारो समर्थकासह बच्चु कडु यांचा जरिदा वनविभागाच्या कार्यालयास घेराव

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरात आमदार बच्चू कडू यांनी आयोजित केलेल्या 'कर्जमुक्तीची आठवण व मेळघाट संघर्ष महापदयात्रे'चा आज चौथा दिवस असून, आज जारीदा येथे वनविभागाच्या कार्यालयाला घेराव टाकण्यात आला आहे. सरकारने जाहीर केलेल्या कर्जमुक्तीच्या आश्वासनाची आठवण करून देण्यासाठी तसेच मेळघाटातील प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी पदयात्रा काढण्यात आली आहे.

# रॅपिडो चालकाच्या खात्यात 300 कोटी

## चालकास फक्त10 हजार रुपये पगार; ईडीचे अधिकारी अवाक

**अहमदाबाद :** देशभरात अवैध क्रिकेट बेटिंग आणि स्टाक मार्केट रॅकेटचा भांडाफोड करण्याचे काम ईडीकडून सुरू आहे. यावेळी अहमदाबादमध्ये एक अजब प्रकार अधिका-यांच्या निदर्शनास आला. येथील एका रॅपिडो चालकाच्या बँक खात्यात तब्बल ३०० कोटी रुपयांचा व्यवहार झाल्याचे समोर आले. विशेष म्हणजे, या चालकाला मासिक १० ते १२ हजारांचे वेतन मिळते. ईडीच्या अधिका-यांनी हवाला साखळी उध्वस्त केली असून एकूण ५५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार उघडकीस आणला आहे.रॅपिडो चालकाच्या खात्यात ३०० कोटी रुपयांचा व्यवहार झाल्यानंतर ईडीच्या अधिका-यांना या साखळीचा शोध लागला. संपूर्ण देशभरात नियोजित पद्धतीने आर्थिक गुन्ह्याचे रॅकेट चालवले जात असल्याचे तपासकर्त्यांच्या निदर्शनास आले. दरमहा १० ते १२ हजार रुपये कमावणा-या प्रदीप आडेच्या बँक खात्यात एकदम ३०० कोटी रुपये आल्यानंतर तपास यंत्रणा सतर्क झाल्या. प्रदीपच्या खात्यात एकामागून एक असे मोठे व्यवहार होउ




लागल्यानंतर ईडीच्या अधिका-यांना संशय आला.अवैध क्रिकेट बेटिंग आणि शेअर बाजारात केलेल्या हेराफेरीतील रक्कम वळविण्यासाठी प्रदीप आडेच्या बँक खात्याचा वापर करण्यात आला होता. प्राथमिक तपासानंतर ईडीच्या सहायक संचालकांनी अहमदाबादच्या गुन्हे शाखेत औपचारिक तक्रार दाखल केली. प्रदीप ओडेची चौकशी झाली असता त्याने मान्य केले की, किरण परमार नामक व्यक्तीला त्याने त्याचे बँक खाते भाड्याने दिले होते. यासाठी त्याला किरण परमारकडून २५,००० रुपये मिळाले होते. तसेच स्वाक्षरी केलेल्या प्रत्येक धनादेशासाठी प्रदीपला ४०० रुपये दिले जात होते, असेही प्रदीपने सांगितले. एवढेच नाही तर फसवणूक करणा-यांनी प्रदीप आडेच्या ओळखपत्र आणि इतर कागदपत्रांच्या आधारे प्रदीप एंटरप्राइजेस नावाची कंपनीही स्थापन केली होती. तसेच तपासकर्त्यांना आढळले की, कमलेश ट्रेडिंग आणि रौनक ट्रेडर्स नामक कंपन्याही अशाच प्रकारे स्थापन करण्यात आल्या होत्या. या दोन कंपन्यांच्या खातत्यातही ५५० कोटी रुपयांचा व्यवहार झाल्याचे समोर आले. ईडीच्या अधिका-यांनी सांगितले की, ऑनलाइन क्रिकेट बेटिंग ऑपरेशन्समधून मिळणारा निधी वळविण्यासाठी या खात्याचा वापर केला गेला. महादेव जुगल, रवी आणि जीवराज अशा इतर आरोपींची नावेही समोर आली आहेत.

# महावितरण, अचलपुर विभागमध्ये लाईन मन दिवस उत्साहात



**अमरावती/प्रतिनिधीः-**केंद्रीय विद्युत प्राधिकरण, नवी दिल्ली यांचे सूचनेनुसार सर्वच विद्युत वितरण परवानाधारक कंपन्या मध्ये जोखमीचे काम करणाऱ्या आघाडीच्या कर्मचाऱ्यांचा त्यांच्या कामाबाबत आठवण ठेवून सत्कार करण्याकरिता दरवर्षी ४ मार्च हा २०२१ पासून लाईनमन दिवस म्हणुन साजरा केला जातो. त्याच अनुषंगाने सहाव्या लाईनमन दिनाचे औचित्य साधून महावितरण अचलपुर विभागीय कार्यालय द्वारे ४ मार्च रोजी तांत्रिक कर्मचारी यांचे करीता विविध कार्यक्रमांचे आयोजन करून लाईनमन दिवस उत्साहाने साजरा केला.

कार्यक्रमाचे सुरुवातीस दीप प्रज्वलन व विद्युत साहित्य पूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे कडून सुरक्षा शपथ वाचण केल्यानंतर लोकेश चंद्र, मुख्य व्यवस्थापकीय संचालक,महावितरण तसेच राजेंद्र पवार, संचालक ( मानव संसाधन), महावितरण यांचे शुभेच्छा संदेश वाचण करण्यात आले. कार्यक्रम दरम्यान 'विद्युत सुरक्षा' या विषयावर अभि. राजेश पाटील,अतिरिक्त कार्यकारी अभियंता, प्रशिक्षण केंद्र अमरावती यांचे व ' गोष्ट पैशा- पाण्याची' अंतर्गत आर्थिक व्यवस्थापन यावर अजयसिंग राजपुरोहित, शाखा व्यवस्थापक, एच. डि.एफ. सि. यांचे सखोल मार्गदर्शन झाले. कार्यक्रमा मध्ये विविध तांत्रिक कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. कर्मचारी यांचा ताण हलका व्हावा याकरिता 'सेवा आमची, खेळ आमचा' अंतर्गत टर्फ क्रिकेट सामन्यांचे आयोजन तसेच विविध मनोरंजन, सांगितीय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अभि. प्रदीप अंधारे, कार्यकारी अभियंता, अचलपुर यांनी लाईनमन दिनाचे महत्त्व विशद करून यावर्षी लाईनमन दिनाच्या संकल्पनेनुसार ' सेवा, सुरक्षा व स्वाभिमान' यावर भर देत कार्यरत तांत्रिक कर्मचारी यांनी काम करीत असतांना कायम या बाबींना महत्त्व देऊन सुरक्षा उपायांची अंमलबजावणी करीत ग्राहकांकरीता सेवा धर्म निभावण्यासाठी कटिबद्ध राहण्याबाबत आवाहन केले. कार्यक्रमास उपकार्यकारी अभियंते उमेश राठोड, नीलेश बोरीकर, संजय दातीर यांनी संबोधीत केले. कार्यक्रमाचे संचलन नीलेश मानकर व आभार प्रदर्शन नीलिमा गावंडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेश तिवारी, वंदना भलावी , विशाल पसारकर,मयूर वसू यांनी अथक परिश्रम घेतले.

# उर्जा क्षेत्राला सक्षम करण्यासाठी कालबद्धरित्या प्रकल्पांची अंमलबजावणी करावी-मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात उर्जा क्षेत्रात मोठी गुंतवणूक होत असून जलसंपदा विभागाच्या माध्यमातून उद्चंन जलविद्युत प्रकल्पांसाठीचे विविध कंपन्यांसोबत एकूण ५५ सामंजस्य करार आज करण्यात आले आहेत. या करारांद्वारे ७८,२१५ मेगावॅट वीज निर्मिती क्षमतेची उभारणी प्रस्तावित आहे. एकूण गुंतवणूक सुमारे ?४,१६,७०१ कोटी रुपये इतकी अपेक्षित असून या प्रकल्पाद्वारे सुमारे १,२७,९९० रोजगार निर्मिती होणार आहे. उर्जाक्षेत्राला सक्षम करण्यासाठी करार महत्वाचे असून कालबद्धरित्या या प्रकल्पांची अंमलबजावणी करावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

**■ राज्याची उर्जा क्षेत्रात 4.17 लक्ष कोटींची गुंतवणूक**

**■ 55 सामंजस्य करारांद्वारे 78,215 मेगावॅट क्षमतेची उभारणी**

विधानभवनात राज्यातील उद्चंन जलविद्युत प्रकल्पांची (पंपस्टोरेज प्रकल्प) आढावा बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली, त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी संबंधितांना सूचित केले. बैठकीस जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री गिरीश महाजन यांच्या सह जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर व इतर संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.






मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात मोठ्या प्रमाणात उर्जा क्षेत्राच्या बळकटीकरणाच्या दृष्टीने जलसंपदा विभागाच्या माध्यमातून उद्चंन जलविद्युत प्रकल्पांची उभारणी करण्यात येत आहे. या कामाची व्याप्ती वाढवण्याच्या दिशेने या क्षेत्रातील नामांकित विविध कंपन्यांसोबत राज्य शासनाने सांमजस्य करार केले आहेत. आतापर्यंत एकूण ५५ सांमजस्य करार हे उद्चंन जलविद्युत प्रकल्पांच्या निर्मितीसाठी करण्यात आले आहेत. अल्पावधीतच या प्रकल्पांच्या कामाने गती घेतली असून ५५ पैकी १०३०० मेगा वॅट क्षमतेच्या सहा प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांना केंद्रीय विद्युत प्राधिकरणाची मंजूरी मिळाली असून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली आहे. तसेच ८२०० मेगावॅट क्षमतेच्या पाच प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल मंजुरीच्या टप्प्यात आहेत. या गुंतवणुकीमुळे राज्यातील उर्जा उत्पादन क्षमता लक्षणीय वाढणार असून औद्योगिक विकासाला चालना मिळणार आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होउन स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल. या प्रकल्पांच्या उभारणीचे काम गतीने पुढे जात असून विहित कालमर्यादेत हे प्रकल्प कार्यान्वित होतील यादृष्टीने सर्व संबंधित यंत्रणांनी प्राधान्याने आणि समन्वयाने काम करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या.जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर यांनी सांगितले की, उद्चंन जलविद्युत प्रकल्पांचे सामंजस्य करार १२ ऑगस्ट, ३ सप्टेंबर, २६ सप्टेंबर २०२४ तसेच २९ एप्रिल, १ व १५ जुलै, ३ नोव्हेंबर आणि १० डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आले. प्रमुख कंपन्यांमध्ये अदानी ग्रीन एनर्जी लि. (९,९०० मेगावॅट, ?५४,४५० कोटी, ३०,००० रोजगार), एनएचपीसी लि. (७,३५० मेगावॅट, ?४४,१०० कोटी, ७,३५० रोजगार), जेएसडब्लू एनर्जी (८,२०० मेगावॅट, ?३६,५१४ कोटी, १५,२०० रोजगार), टीएचडीसीआयएल (६,७९० मेगावॅट, ?३३,६२२ कोटी, ६,३०० रोजगार) आणि टोरंट प?वर लि. (५,६०० मेगावॅट, ?२८,००० कोटी, १३,५०० रोजगार) यांचा समावेश आहे. याशिवाय टाटा प?वर कंपनी लि., एनटीपीसी लि., जेएसडब्ल्यू निओ एनर्जी लि., मेघा इंजि. अँड इन्फ्रा लि., वेलस्पन न्यू एनर्जी लि., रिन्यू हायड्रो प?वर प्रा. लि., महाजेनको रिन्यूएबल एनर्जी लि. आणि अवाडा ?क्वा बॅटरीज प्रा.लि या कंपन्यांनीही सामंजस्य करार केलेले आहेत.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## महायुध्दाची चाहूल

गेल्यावर्षी अमेरिकेने इराणवर हल्ला केला आणि आता पुन्हा इस्त्रायलसमवेत इराणविरुद्ध युद्ध पुकारून राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगाला तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर आणून ठेवले आहे. पंधरा दिवसांत आण्विक करार करा, अन्यथा गंभीर परिणामांना तोंड द्यावे लागेल, असा इशारा त्यांनी फेब्रुवारीत इराणला दिला होता. या करारास अंतिम स्वरूप दिले जात असताना अकराव्या दिवशीच त्यांनी इराणवर हल्ला चढवून आपण शब्दाचे पक्के नसल्याचे दाखवून दिले. इराणचे समर्थन असलेल्या हेजबुल्लासह अन्य दहशतवादी गटांनी तसेच इराणने अरब राष्ट्रांतील अमेरिकेच्या सैन्यतळांवर क्षेपणास्त्र हल्ले केले. इराणने बहरीन, अबुधाबी, दुबई, रियाध, कतार येथे क्षेपणास्त्रे व ड्रोन डागले. या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून इस्त्रायल व अमेरिकेने इराणवर तुफान बॉम्बफेक सुरू केली आहे. मुलींच्या प्राथमिक शाळेवर झालेल्या हल्ल्यात सुमारे १६८ जणांचा मृत्यू झाला असून, युद्धामधील किमान नैतिकताही पाळण्यास अमेरिका तयार नाही, हेच यावरून दिसून येते. ब्रिटन, फ्रान्स आणि जर्मनीने इराणकडून झालेले हल्ले बेकायदा असल्याचा आरोप केला आहे. त्याचप्रमाणे या तिन्ही देशांनी आपल्या हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी आणि इराणचे हल्ले रोखण्यासाठी एकत्रितपणे कारवाई करण्याची तयारी दर्शवली आहे. अमेरिकेचे माजी अध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू बुश यांनी या सहस्त्रकाच्या आरंभी अफगाणिस्तान आणि इराकविरोधात याच देशांची एक दहशतवादविरोधी आंतरराष्ट्रीय आघाडी स्थापन केली होती. आता या युद्धामुळे जग पुन्हा दोन गटांत विभागल्याचे चित्र दिसत आहे. इराणच्या प्रत्युत्तरात्मक हल्ल्यानंतर प्रमुख पाश्चात्त्य राष्ट्रे इस्त्रायल व अमेरिकेच्या बाजूने मैदानात उतरली आहेत. इराणच्या क्षेपणास्त्र तळांवर हल्ला करण्यासाठी लष्करी तळांचा वापर करू देण्याच्या अमेरिकेच्या विनंतीला ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी मान्यता दिली. ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनीही दडपशाहीविरुद्ध लढणाऱ्या इराणी लोकांच्या बाजूने आम्ही उभे राहू, असे घोषित केले, तर इराणच्या खुनी राजवटीविरुद्ध कठोर निर्बंध लादण्याचे संकेत युरोपियन कमिशनने दिले. दुसरीकडे रशियाने आंतरराष्ट्रीय कायद्याच्या चौकटीत राहून शांततापूर्ण मार्गाने तोडगा काढण्यास मदत करण्याची तयारी दर्शवली; मात्र युक्रेन युद्धात आधीच झळ पोहोचल्यामुळे रशिया आणखी एका युद्धात थेटपणे पडण्याची शक्यता नाही. इस्त्रायल व अमेरिकेची मोहीम म्हणजे इराणच्या सार्वभौमत्वाचे उल्लंघन आणि संयुक्त राष्ट्राच्या चार्टरच्या विरोधातील कृती असल्याचे चीनने म्हटले, तर खामेनी यांना 'शहीद' संबोधून पाकिस्तानने त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. वास्तविक 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पाकिस्तान व अमेरिकेची मैत्री घट्ट झाली होती. पंतप्रधान शाहबाझ शरीफ आणि लष्करप्रमुख आसिम मुनीर यांनी व्हाईट हाऊसचा दौरा केला होता. ट्रम्प यांनी दोघांचेही म्हणे कौतुक केले होते; परंतु आता इराणवरील हल्ल्याचा निषेध करत पाकिस्तानने आपला मित्र असलेल्या अमेरिकेचाच 'विश्वासघात' केला आहे. चीन हा इराणच्या तेलाचा प्रमुख खरेदीदार असून, निर्बंधांना न जुमानता तो इराणला आर्थिक पाठबळ देत आहे. चीनने इराणला हवाई यंत्रणा, संरक्षण उपकरणे आणि ड्रोन तंत्रज्ञानाचा पुरवठा केला; परंतु चीन यापलीकडे इराणच्या बाजूने प्रत्यक्ष युद्धात उडी घेण्याची शक्यता नाही. सौदी अरेबिया, यूएई, कतार वगैरे देशांच्या गल्फ को-ऑपरेशन कौन्सिलची बैठक होऊन, त्यांनी इराणच्या युद्धखोरीवर टीका केली. थोडक्यात, या युद्धामुळे जग दोन गटांत विभागले गेले असून, एकेकाळी इस्त्रायलविरुद्ध असलेले अरब देशही आता फक्त आपल्या आर्थिक हितसंबंधांचे रक्षण करण्यावरच भर देत आहेत. मध्यपूर्वेतील देशांमध्ये विशेषतः आखाती देशांत ९५ लाखांच्या आसपास भारतीय नागरिक राहतात. सर्वाधिक भारतीय यूएई व सौदी अरेबियात राहतात. इराणने या देशांवरील हल्ले वाढवल्यास अनेकांच्या जीवितास धोका निर्माण होईल. त्यांच्या नोकरी-व्यवसायांवर गदा येऊ शकते. हळूहळू काही भारतीयांना मायदेशी आणले जात असून, त्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांना दिलासा मिळाला आहे. या सर्वाचे केंद्र ठरलेली होर्मुझ सामुद्रधुनी बंद करण्यात आली असून, कोणतेही जहाज तेथून नेले, तर ते उडवून टाकू अशी धमकी इराणने दिल्यामुळे ब्रेंट क्रूडचे भाव बॅरलला ८० डॉलरवर जाऊन पोहोचले. ते आणखी वाढण्याची शक्यता असून, भारताचा आयातीवरील खर्च खूप वाढणार आहे. इराण, इराक व जॉर्डनने हवाई क्षेत्र बंद केले. पूर्व इराक हा जगातील सर्वात व्यस्त हवाई मार्गांपैकी एक असून, आशियातून युरोपला जाणाऱ्या असंख्य विमानांचा मार्ग तिथूनच जातो. आता मुंबई-दिल्ली ते युरोप-मध्यपूर्व हे प्रवासाचे मार्ग बदलावे लागणार आहेत. त्यामुळे हवाई प्रवास महागणार असून, पर्यटन व्यवसाय संकटात येणार आहे. लाल समुद्रातून जाणाऱ्या मालवाहतुकीची मासिक आर्थिक उलाढाल १४ अब्ज डॉलर्स इतकी आहे. हुथी बंडखोरांच्या हल्ल्यांमुळे जहाजांना आता 'केप ऑफ गुड होप'चा पर्यायी खर्चिक मार्ग घ्यावा लागत आहे. कांदा, केळी, द्राक्षे अशा शेतमालाची निर्यात खोळंबली असून, महाराष्ट्रातील बळीराजाच्या संकटात त्यामुळे भर पडणार आहे. कापड, रत्ने, दागिने, औषधे, इंजिनिअरिंग माल यांच्या निर्यातीसही फटका बसणार आहे. अमेरिकेच्या निर्बंधांमुळे इराणमधील चाबहार बंदराच्या विकासातून भारताची पीछेहाट झाल्याने पाकला वळसा घालून अफगाणिस्तान व मध्य आशियापर्यंत पोहोचण्याच्या भारताच्या स्वप्नास धक्का बसला आहे. चीनच्या ग्वादर बंदरास शह देण्याची संधी भारताच्या हातातून निसटून जाण्याची भीती आहे. शेअर बाजारात घसरगुंडी होत जाऊन गुंतवणूकदारांचे नुकसान होणार आहे. गेली काही वर्षे महागाई नियंत्रणात ठेवण्यात सरकारला यश आले होते; परंतु ते आता आणखी कठीण होईल. युद्धाची सर्वाधिक झळ गोरगरिबांना बसत असते. ती कमी करण्याचे आव्हान भारतासमोर असेलच, शिवाय महागाई आणि देशाचे अर्थकारण सावरण्याचेही असेल. अमेरिका व इस्त्रायलने आपल्या साम्राज्यवादी महत्त्वाकांक्षांमुळे जगाला काळोखात लोटले आहे. येत्या काही दिवसांत युद्धाची तीव्रता वाढणार, हे स्पष्ट आहे.

# पश्चिम आशियातील संघर्षामुळे महागाई वाढणार?

अ तेलाच्या किमतीत प्रति बॅरल दहा ते वीस डॉलर्सपर्यंत वाढ झाली तर भारतासारख्या देशांवर त्याचा मोठा आर्थिक परिणाम होईल. पश्चिम आशियातील राजकारण अनेक दशकांपासून तणाव, अविश्वास आणि शक्तिस्पर्धेच्या भोवऱ्यात अडकलेले आहे. समुद्री नाकेबंदी, आर्थिक निर्बंध, राजनैतिक दबाव आणि गुप्त कारवायांच्या मालिकेनंतर अखेर अमेरिकेने आणि इस्त्रायलने इराणवर मोठ्या प्रमाणावर हल्ला केला. क्षेपणास्त्र आणि लढाऊ विमानांच्या साहाय्याने झालेल्या या कारवाईमुळे संपूर्ण पश्चिम आशिया एका व्यापक युद्धाच्या उंबरठ्यावर येऊन उभा राहिला आहे. या हल्ल्यानंतर लगेचच इराणनेही प्रत्युत्तरात्मक कारवाई करत इस्त्रायलमधील तसेच आखाती प्रदेशातील अमेरिकेच्या लष्करी तळांवर क्षेपणास्त्रांचा मारा सुरू केला. त्यामुळे कुवेत, कतार, बहरीन, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीसारख्या देशांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या संघर्षामुळे केवळ दोन देशांपुरते मर्यादित राहणारे युद्ध घडले नाही, तर संपूर्ण प्रदेशातील राजकीय समीकरणे ढवळून निघाली आहेत. लेबनॉनमधील हिझ्बुल्ला आणि येमेनमधील हुथी गटांनीही इस्त्रायलविरुद्ध हल्ल्यांची मालिका सुरू केली आहे. त्यामुळे हा संघर्ष आता बहुपक्षीय स्वरूप धारण करत आहे. पश्चिम आशियातील विविध गट, संघटना आणि राष्ट्रे या संघर्षात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सहभागी होत असल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. या हल्ल्यांमध्ये इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खमेनी, संरक्षण मंत्री अमीर नासिरजादेह आणि इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्डचे प्रमुख जनरल मोहम्मद पाकपूर यांच्यासह दोनशेहून अधिक लोक मृत्युमुखी पडल्याची माहिती समोर आली आहे. दक्षिण इराणमधील एका शाळेवर झालेल्या हल्ल्यात ऐंशीपेक्षा अधिक लोकांचा मृत्यू झाला असल्याने या संघर्षाचे मानवी परिणाम अत्यंत भीषण स्वरूपात समोर येत आहेत. या घटनेनंतर इराणमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून सूडाची भावना अधिक तीव्र झाली आहे.

या कारवाईच्या पार्श्वभूमीवर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. चर्चेच्या नावाखाली सुरू असलेल्या राजनैतिक प्रक्रियेदरम्यान गुप्त माहितीच्या आधारे सर्वोच्च नेतृत्वावर हल्ला करण्यात आल्याची चर्चा सुरू आहे. काही विश्लेषकांच्या मते, इराणमध्ये सत्ताबदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला जाऊ शकला असता; परंतु सर्वोच्च नेतृत्वाची हत्या करण्याचा निर्णय हा गंभीर राजनैतिक चुकीचा निर्णय ठरू शकतो. यामुळे संघर्ष अधिक भडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या युद्धाबाबत अमेरिकेतील जनमत देखील विभागलेले दिसते. एका सर्वेक्षणानुसार केवळ एकतृतीयांश नागरिकांनी इराणवरील हल्ल्याला समर्थन दिले आहे. विरोधी पक्षातील नेत्यांनी असेही नमूद केले आहे की अशा महत्त्वाच्या लष्करी कारवाईपूर्वी संसदेला विश्वासात घेतले गेले नाही.



त्यामुळे प्रशासनाला या निर्णयाचे औचित्य सिद्ध करण्याचे मोठे राजकीय आव्हान उभे राहिले आहे.

या संघर्षामुळे अनेक देशांनी आपल्या नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली आहे. काही देशांनी इराणमधून बाहेर पडण्यासाठी विविध सीमामार्ग खुले केले आहेत. नागरिकांना तातडीने सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या उपाययोजनांवरून युद्ध दीर्घकाळ चालण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे संकेत मिळत आहेत. पश्चिम आशियातील अनेक देशांमध्ये अमेरिकेचे लष्करी तळ आहेत आणि ते आता संभाव्य लक्ष्य बनले आहेत. कतारमधील दोहा शहराबाहेरील अल उदैद हा तळ अमेरिकेच्या मध्य कमांडचे महत्त्वाचे मुख्यालय मानला जातो. येथे सुमारे दहा हजार सैनिक तैनात असून पश्चिमेकडील इजिप्तपासून पूर्वेकडील मध्य आशियापर्यंतच्या प्रदेशातील अनेक लष्करी कारवायांचे संचालन येथे केले जाते. कुवेतमधील कॅम्प अरीफजान आणि अली अल सालेम हे तळ इराक सीमेजवळ असल्याने त्यांचे धोरणात्मक महत्त्व अधिक आहे. कॅम्प ब्युहरिंग हा तळ इराक युद्धाच्या काळात उभारण्यात आला होता आणि आजही तो इराक आणि सीरियामधील कारवायांसाठी वापरला जातो.

संयुक्त अरब अमिरातीतील अल धाफ्रा हा तळ अमेरिकन वायुसेनेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. येथे विविध प्रकारची लढाऊ विमाने तैनात असून या प्रदेशातील हवाई कारवायांचे नियोजन येथे केले जाते. दुबईजवळील जेबेल अली बंदर हे अमेरिकन नौदलासाठी पश्चिम आशियातील सर्वात मोठे केंद्र मानले जाते. येथे नियमितपणे युद्धनौका आणि पुरवठा जहाजे ये-जा करत असतात.

इराकमधील ऐन अल-असद तळ अमेरिकन सैन्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या तळावरून इराकमधील सुरक्षा दलांना मदत दिली जाते आणि विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जातात. २०२० मध्ये इराणने याच तळावर क्षेपणास्त्र हल्ला केला होता. उत्तरी इराकमधील एरबिल परिसरातील हवाई तळ देखील अमेरिकन आणि मित्र राष्ट्रांच्या सैन्यासाठी महत्त्वाचा प्रशिक्षण केंद्र म्हणून ओळखला जातो. येथे गुप्तचर माहितीची देवाणघेवाण आणि लष्करी समन्वय साधला जातो. सौदी अरेबियातील प्रिन्स सुलतान तळ अमेरिकेच्या संरक्षण प्रणालींसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. येथे प्रगत क्षेपणास्त्र संरक्षण यंत्रणा तैनात करण्यात आल्या आहेत. जॉर्डनमधील अझराक परिसरातील हवाई तळावरून या प्रदेशातील अनेक कारवायांचे संचालन केले जाते. त्यामुळे या सर्व तळांवर संभाव्य हल्ल्यांचा धोका वाढला आहे.

या संघर्षामुळे मुस्लिम देशांमधील एकात्मतेलाही तडे गेलेले दिसत आहेत. काही देश अमेरिकेच्या बाजूने उभे राहिले आहेत, तर काही देशांनी संयम आणि संवादाचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले आहे. सौदी अरेबियाचे युवराज मोहम्मद बिन सलमान या प्रदेशातील घडामोडींवर लक्ष ठेवून विविध देशांशी संपर्क साधत आहेत. या संघर्षामुळे संपूर्ण प्रदेशातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे. या युद्धाचा सर्वात मोठा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो.

जर इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद केली तर जगातील सुमारे २५ टक्के तेलपुरवठा विस्कळीत होऊ शकतो. ही सामुद्रधुनी जागतिक ऊर्जा व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. त्यामुळे या मार्गावर अडथळे निर्माण झाल्यास तेलाच्या किमतीत मोठी वाढ होऊ शकते.

तेलाच्या किमतीत प्रति बॅरल दहा ते वीस डॉलर्सपर्यंत वाढ झाली तर भारतासारख्या देशांवर त्याचा मोठा आर्थिक परिणाम होईल. भारत हा जगातील सर्वात मोठ्या तेल आयातदार देशांपैकी एक आहे. त्यामुळे तेल आयात दरात मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. परिणामी चलनवाढ वाढेल, वाहतूक खर्च वाढेल आणि अन्नधान्याच्या किमतीही चढू शकतात. अशा परिस्थितीत मध्यवर्ती बँकेवर व्याजदर वाढवण्याचा दबाव वाढू शकतो. भारतासाठी आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आखाती देशांमध्ये कार्यरत असलेले भारतीय नागरिक. सुमारे ९० लाख भारतीय या प्रदेशात रोजगारासाठी गेलेले आहेत. त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत संवेदनशील आहे. युद्ध तीव्र झाल्यास त्यांना सुरक्षित बाहेर काढणे मोठे आव्हान ठरू शकते. तसेच या प्रदेशातून भारतात येणाऱ्या परदेशी चलनाच्या प्रवाहावरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

भारताच्या कच्च्या तेलाच्या आयातीपैकी जवळपास निम्मा भाग होर्मुझच्या सामुद्रधुनीमार्गे येतो. त्यामुळे या मार्गावर अडथळे निर्माण झाल्यास भारताच्या ऊर्जा सुरक्षेवर मोठा परिणाम होऊ शकतो. त्याचबरोबर लाल समुद्रातील अस्थिरतेमुळेही तेलपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

जागतिक स्तरावरही या युद्धामुळे आंतरराष्ट्रीय कायदा आणि सुव्यवस्थेच्या तत्त्वांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आधीच रशिया आणि युक्रेनमधील युद्ध तसेच इस्त्रायल आणि गाझामधील संघर्षामुळे जग अस्थिर झाले आहे. अशा परिस्थितीत आणखी एक मोठा संघर्ष उद्भवल्यास जागतिक व्यापार, पुरवठा साखळी आणि आर्थिक स्थैर्य यांना मोठा धक्का बसू शकतो. या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेला तातडीने पुढाकार घेण्याची गरज आहे. संवाद, मध्यस्थी आणि कूटनीतीच्या माध्यमातून संघर्ष टाळण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे. ओमान आणि कतारसारखे देश या प्रक्रियेत मध्यस्थ म्हणून भूमिका बजावू शकतात.

भारतासाठी सर्वात मोठे आव्हान म्हणजे संतुलित परराष्ट्र धोरण राखणे. भारताचे अमेरिका, इस्त्रायल, इराण आणि आखाती देशांशी दीर्घकालीन संबंध आहेत. त्यामुळे या संघर्षात कोणत्याही एका बाजूला स्पष्टपणे झुकणे भारतासाठी धोकादायक ठरू शकते. ऊर्जा सुरक्षा मजबूत करणे, धोरणात्मक तेलसाठे वाढवणे आणि पर्यायी ऊर्जा स्त्रोतांचा विकास वेगाने करणे ही काळाची गरज आहे. एकूणच पाहता, पश्चिम आशियातील हा संघर्ष केवळ प्रादेशिक युद्ध राहणार नाही, तर त्याचे राजकीय, आर्थिक आणि मानवी परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागतील. या परिस्थितीत संवाद, संयम आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य यांच्याशिवाय पर्याय नाही. मानवतेच्या हितासाठी हे युद्ध त्वरित थांबवणे आणि शांततेचा मार्ग स्वीकारणे हेच आजच्या काळातील सर्वात मोठे आव्हान ठरले आहे.

**विकास मेश्राम**

## 'पालखेड लढाई'

जगातील प्रमुख देशांच्या सैन्य अधिकाऱ्यांना व्युहरचनात्मक रणनीतीचा (स्ट्रॅटेजिक प्लॅनिंगचा) वस्तूपाठ शिकवणारी, इतिहासातील एकमेव ऐतिहासिक लढाई, मराठ्यांच्या लष्करी रणनीतीचे विशेषता घोडदलाच्या श्रेष्ठतेचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे पालखेड ची लढाई. मराठ्यांचा तरुण सेनानायक श्रीमंत बाजीराव पेशवे (थोरले) राज्यापासून दूर दक्षिण दिशेला गेले असल्याची बातमी हैदराबादच्या निजाम: निजाम उल मुल्क याला समजली. तो स्वतःला अनुभवी समजत होता. ही संधी साधून त्याने बलाढ्य फौज आणि तोफखाना घेऊन मराठ्यांची राजधानी पुण्यावर चाल केली. त्याच्या अपेक्षेप्रमाणे पेशवे दक्षिणेतून निघालेही पण अचानक मध्येच ते निजामा च्या राज्यात आजपर्यंत शिरले आणि त्यांनी राज्यात धुमाकूळ घातला, प्रचंड लुटालूट चालू केली त्यामुळे निजामाला त्याच्या मागे जावे लागले. पेशवे म्हणजे एक वादळच होते त्यामुळे ते कधी खानदेश, मराठवाडा, गुजरात करत निजामाची फरपट केली. त्यानंतर पेशवे माळव्यात आले आहे असे निजाम्याला समजले. त्याच्या प्रचंड तोफखाना आणि सैन्य असल्याने त्याला वेगवान हालचाली करता येत नव्हत्या म्हणून त्याने तोफखाना मागे ठेवून तो पेशव्यांच्या पाठलग करण्यास गेला. पाणी पिण्यासाठी निजामाचे सैन्य जवळच्या जलाशयाजवळ पोहोचले पण पेशवे आणि त्यांचे सैन्य तलावाची वाट अडवून उभे होते. त्यामुळे बलाढ्य आणि अनुभवावी निजाम्याला शरण येण्या वाचून पर्याय नव्हता आणि निजाम शरण आला. शत्रूचा संपूर्ण पराजय तोही स्वतःकडील एकही सैन्य न गमवता लढली गेलेली ही लढाई. ही लढाई २५ ते २८ फेब्रुवारी महाराष्ट्रातील नाशिक जवळील पालखेड येथे झाली. मराठ्याच्या तरुण सेनानायकाने अत्यंत वेगवान गमिनी कावा वापरून शत्रूच्या जेरिस आणले आणि त्याचा निर्णय पराभव केला. आज या लढाईचा म्हणजे पालखेडच्या युद्धाचा विजय दिन आहे. आपल्याला आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाचा जाज्वल्य इतिहास माहित असायलाच हवा. या लढाईचे वेळी पेशवे केवळ २८ वर्षाचे होते तर निजाम यांचे वय ५७ होते. ब्राह्मणांच्या नावाने ओरडणारे हा इतिहास लक्षात ठेवतील तो सुदिनच म्हणावा लागेल.

**लीना पनवेल**

## उद्योगांशिवाय पर्याय नाही

कुठल्याही देशाची अथवा राज्याची आर्थिक प्रगती मोजण्यासाठी तिथे औद्योगिक गुंतवणूक किती झाली किंवा होणार याचा विचार केला जातो. महाराष्ट्र राज्य हे अनेक दशके देशातील गुंतवणुकीबाबत अव्वल राज्य होते. आता मात्र तो सन्मान महाराष्ट्राने गमावला आहे. आणि इतर राज्ये महाराष्ट्रापेक्षा अधिक सरस ठरत आहेत. अलीकडेच देवेंद्र फडणवीस यांनी स्वित्झर्लंडची राजधानी दावोस येथे जागतिक गुंतवणूक बैठकीत सहभागी होऊन राज्यासाठी नव्या गुंतवणूकदारांना आपल्या राज्याकडे आकर्षित केल्याचे मानले जात आहे. ज्ञान, तंत्रज्ञान आणि विदेशी गुंतवणूक मिळवण्यासाठीच मुख्यमंत्री दावोस दौऱ्यावर गेले होते. या दौऱ्यात काही धोरणात्मक सामंजस्य करार करण्यात आले. वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांना उद्योगासाठी महाराष्ट्रात आणण्याच्या प्रयत्नांकडे सकारात्मक दृष्टीनेच पाहिले गेले. अन्यथा आगामी काही वर्षात मुंबई, पुणे यासारखी मोठी शहरे लोकसंख्येच्या स्फोटाने जेरीस येऊ शकतात. या पार्श्वभूमीवर नवीन उद्योगांची उभारणी आणि भावी गुंतवणूक याकडे लोकांचे लक्ष लागून राहिले आहे. केवळ मुंबई किंवा पुणे शहर यांच्या परिसरातच मोठमोठे उद्योग उभारण्या ऐवजी ग्रामीण महाराष्ट्रालाही त्यासाठी प्राधान्य दिले पाहिजे. त्यातूनच हजारो बेरोजगार तरुणांच्या हाताला हक्काचे काम मिळणार आहे. आपल्याकडे कुशल कामगारांची मुळीच कमतरता नाही. त्यासाठी विदेशातील धोरणांचा अभ्यास होण्याची गरज आहे. उद्योगांशिवाय दुसरा पर्याय नाही.

**प्रा. मधुकर चुटे**
नागपूर

# हक्क बजावताना कर्तव्याचा विसर

### युद्धकाळातील 'सुटका' आणि आपली कृतघ्नता..



अलीकडील जागतिक परिस्थितीमुळे परदेशातील भारतीय विद्यार्थी आणि नागरिकांना मायदेशी परत आणण्याचा प्रश्न सातत्याने ऐरणीवर येत आहे. रशिया-युक्रेन युद्धा दरम्यान युक्रेनमध्ये अडकलेल्या भारतीयांसाठी सरकारने फेब्रुवारी २०२२ मध्ये 'ऑपरेशन गंगा' ही मोहीम राबवली होती. तसेच गेल्या वर्षी इराण आणि इस्त्रायलमधील लष्करी तणावाच्या काळात 'ऑपरेशन सिंधू' अंतर्गत काश्मीरमधील अनेक विद्यार्थ्यांना आर्मेनियामार्गे विशेष विमानाने दिल्लीत आणले गेले.

मात्र, या मदतकार्यादरम्यान समोर आलेले वास्तव सुन्न करणारे आहे. जेव्हा सरकार युद्धभूमीतून नागरिकांचा जीव वाचवून त्यांना बाहेर काढते, तेव्हा काही नागरिक आणि पालकांची भूमिका 'कृतज्ञते'ऐवजी 'तक्रारी'ची दिसते. 'ऑपरेशन सिंधू'च्या पहिल्या खेपेत दिल्ली विमानतळावर उतरलेल्या एका विद्यार्थिनीची प्रतिक्रिया धक्कादायक होती. ती म्हणाली, 'आम्हाला काश्मीरला पोहोचवण्यासाठी सरकारने ज्या बसेस ठेवल्या आहेत, त्या 'भंगार' आहेत; केंद्र सरकारने आम्हाला घरापर्यंत सुखरूप पोहोचवले पाहिजे.' विशेष म्हणजे, त्या बसेस जम्मू-काश्मीरच्याच लोकनियुक्त नॅशनल कॉन्फरन्स सरकारद्वारे पाठवल्या गेल्या होत्या.

मृत्यूच्या दारातून सुखरूप वाचून आल्याचा आनंद मानण्याऐवजी, घरापर्यंत सोडून देण्याची अवास्तव मागणी करणे ही कृतघ्नतेची परिसीमा आहे. जेव्हा एखादा पालक लाखो रुपये खर्च करून पाल्याला उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठवतो किंवा एखादी व्यक्ती नोकरीसाठी विदेशात जाते, तेव्हा तो निर्णय पूर्णतः वैयक्तिक असतो. हा निर्णय घेताना सरकारला विचारले जात नाही. मग तिथे आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली की, अचानक सरकारचीच आठवण का येते? स्वजनांच्या काळजीचे रूपांतर सरकारवर अशा दबावात होते की, जणू तिथल्या परिस्थितीला आपले सरकारच जबाबदार आहे. तांत्रिकदृष्ट्या, परदेशात स्वमर्जीने गेलेल्या नागरिकांना परत आणण्याची आर्थिक जबाबदारी कोणत्याही सरकारची नसते.

दूतावासाच्या माध्यमातून राजनैतिक मदत करणे हे सरकारचे कर्तव्य आहेच, पण प्रत्येक वेळी करदात्यांच्या पैशातून विशेष विमाने पाठवणे, ही सरकारची 'नैतिक जबाबदारी' असल्याचे पालकांनी गृहीत धरू नये.

जागतिक स्तरावर डोकावून पाहिले तर लक्षात येते की, अमेरिका, ब्रिटन किंवा युरोपीय देशांची सरकारे आपल्या नागरिकांना केवळ 'प्रवास सूचना' (Advisory) जारी करून सतर्क करतात. युद्धजन्य परिस्थितीत जर सरकारने विशेष विमानांची सोय केलीच, तर त्याचा पूर्ण खर्च संबंधित नागरिकाला किंवा त्याच्या विमा कंपनीला सोसावा लागतो. भारतानेही आता विकसित देशांप्रमाणे कठोर धोरण अवलंबण्याची वेळ आली आहे. सरकारने केवळ तांत्रिक मदत करावी, मात्र सुटकेचा प्रत्यक्ष आर्थिक खर्च पालकांनीच उचलला पाहिजे. मराठीत एक म्हण आहे, 'ज्याचे करावे भले, तो म्हणतो माझे खरे'; ही परिस्थिती सध्या तंतोतंत अनुभवायला मिळते. आपल्या पाल्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी परदेशात लाखो रुपये खर्च करण्याची तयारी आपण ठेवतो, हा प्रगतीचा वैयक्तिक निर्णय असतो. आपण हे विसरता कामा नये की, विशेष विमानांचा हा अवाढव्य खर्च अखेर देशातील सामान्य करदात्याच्या खिशातूनच होत असतो.

त्यामुळे, हक्क बजावताना कर्तव्याचा विसर पडू देऊ नका. परदेशात जाण्याचा धाडसी निर्णय घेतानाच, उद्याच्या अनपेक्षित संकटात स्वतःला आणि आपल्या पाल्याला सुरक्षितपणे परत आणण्याची आर्थिक व नैतिक जबाबदारी स्वीकारण्याची मानसिक तयारीही ठेवा. सरकारचा मदतीचा हात हा एक 'आधार' असावा, तो आपला हक्क किंवा सरकारवर लादलेले 'ओझे' नसावे.

**अविनाश देशपांडे**

| गुरुवार, ५ मार्च २०२६ |

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# संत सावता माळी नागरी सहकारी पतसंस्थेच्या वाशीम शाखेचे उद्घाटन!

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - संत सावता माळी नागरी सहकारी पतसंस्था पुसद च्या वाशीम शाखेचे उद्घाटन माजी आमदार श्रीमती प्रज्ञाताई सातव यांच्या शुभ हस्ते रविवार दि.१ मार्च रोजी पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक,माजी आमदार लक्ष्मणराव तायडे,अकोला हे होते तर अकोला जिल्ह्याचे सहाय्यक उपनिबंधक डॉ.प्रवीण लोखंडे, वाशीम चे नगराध्यक्ष अनिल केंदळे, बालरोगतज्ज्ञ डॉ.विजयराव कानडे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी ज्योती पिठावर पतसंस्थेचे संस्थापक, अध्यक्ष आत्माराम जाधव, उपाध्यक्ष रतिराव बोरगडे सर, वाशीम शाखेचे अध्यक्ष केशवराव खासबागे, मालेगाव शाखा अध्यक्ष प्रा.प्रकाश कापुरे, जि.प.शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष विजय मनवर , उपाध्यक्ष राजु मते,साने गुरुजी सेवासंघाचे जिल्हाध्यक्ष मधुकरराव महाले, नगरसेवक गजु लांडगे हे उपस्थित होते.सर्व मान्यवरांनी प्रथम राष्ट्रसंत सावता माळी, क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केले.दिपप्रज्वलन करून व फीत कापून माजी आ.प्रज्ञाताई सातव यांनी पतसंस्थेच्या वाशीम शाखेचे उद्घाटन केले.याप्रसंगी सर्व मान्यवरांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.तसेच पतसंस्था संचालक मंडळ व पतसंस्थेच्या वाशीम शाखेच्या स्थानिक व्यवस्थापन समिती संचालकांचे उपस्थित मान्यवर तथा पाहुण्यांचे हस्ते स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाखा अध्यक्ष केशवराव खासबागे यांनी केले. संत सावता माळी नागरी सहकारी पतसंस्था पुसद ने वाशीम शहरात शाखा सुरू करुन समाजाच्या विकासासाठी संधी उपलब्ध करुन दिली असून या संधीचे सोने करून वाशीम शाखा प्रगतीचे उंच शिखर गाठेल असा विश्वास त्यांनी आपल्या प्रास्ताविकात व्यक्त केला.पतसंस्थेच्या यवतमाळ जिल्ह्यातील कार्यरत पाच शाखा सहकार क्षेत्रात अतिशय चांगले काम करत असून मागील अठरा वर्षात पतसंस्थेने ठेविदारांची विश्वासू पतसंस्था म्हणून ख्याती प्राप्त केली आहे. पतसंस्थेच्या विकासाचा चढता आलेख मांडून नियमानुसार,सुरक्षित कर्ज वाटप व चांगली वसुली यामुळेच पतसंस्थेने ग्राहक व ठेविदारांचा विश्वास कमावला आहे असे सांगून वाशीम शाखेचे कार्य सुद्धा नियमानुसारच राहील आणि ठेविदाराच्या विश्वासाला कुठेही तडा जाऊ दिला जाणार नाही याची ग्वाही पतसंस्थेचे संस्थापक,अध्यक्ष आत्माराम जाधव यांनी आपल्या मनोगतात दिली.या एका वर्षात पतसंस्थेच्या वाशीम शाखेने केलेली प्रगती आम्ही दाखवून देऊ अशी खात्री बालरोगतज्ज्ञ डॉ.विजय कानडे यांनी आपल्या मनोगतात व्यक्त करुन सर्वांना शुभेच्छा दिल्या. वाशिम नगरीचे प्रथम नागरिक नगराध्यक्ष अनिल केंदळे यांनी पतसंस्थेच्या कार्यासाठी व प्रगतीसाठी शुभेच्छा व्यक्त करून ही संस्था भविष्यात एक चांगली संस्था म्हणून नावारूपाला येईल असा विश्वास व्यक्त केला.अकोला जिल्ह्याचे जिल्हा उपनिबंधक डॉ.प्रवीण लोखंडे यांनी विदर्भ व मराठवाड्यात पतसंस्थेची संख्या कमी असल्यामुळे अवैध सावकारी वाढीस लागली असून आर्थिक अडचणींमुळे नागरिकांना आपली आर्थिक प्रगती करण्यात अडथळे येतात व शेतकरी आत्महत्या सारख्या घटना घडतात असे सांगून पश्चिम महाराष्ट्रात असंख्य पतसंस्थाच्या माध्यमातून सहकार क्षेत्रातून चांगली प्रगती मागील अनेक वर्षापासून झालेली दिसते असे मत व्यक्त केले.त्यामुळे विदर्भ, मराठवाड्यात असे चांगले कार्य करणाऱ्या पतसंस्था निर्माण झाल्या पाहिजेत असेही विचार त्यांनी व्यक्त केले.या पतसंस्थेच्या माध्यमातून सहकार क्षेत्रात इमानदारीने काम करणारी व्यक्ती म्हणून श्री. आत्माराम जाधव यांची ओळख असून संत सावता माळी पतसंस्थेने आजवर केलेले कार्य व ठेविदारांचा कमावलेला विश्वास याचा आदर्श घेण्यासारखा आहे असे विचार जिल्हा उपनिबंधक डॉ.प्रवीण लोखंडे यांनी व्यक्त करुन पतसंस्थेचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या उद्घाटक माजी आमदार प्रज्ञाताई सातव यांनी पतसंस्थेने मागील अठरा वर्षापासून इमाने इतबारे केलेले कार्य आणि जनतेचा मिळविलेला विश्वास पाहून समाधान व्यक्त केले व पतसंस्थेने यवतमाळ जिल्हा कार्यक्षेत्रामध्ये वाढ करून आता वाशिम जिल्ह्यात चार शाखांच्या रूपाने पदार्पण केले आहे.

## बाभुळगावात व्यसनमुक्ती होळी, ठाणेदार दीपामाला भेंडे यांच्य हस्ते व्यसनांना दिला अग्नी

जनमाध्यम प्रतिनिधी



बाभुळगाव - होळीच्या शुभमुहूर्तावर बाभुळगावात एका वेगळ्या आणि महत्त्वपूर्ण 'व्यसनमुक्ती होळी'चे आयोजन करण्यात आले. समाजात व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचवण्यासाठी नशाबंदी मंडळ महाराष्ट्राने इंदिरा चौकात हा अभिनव कार्यक्रम राबवला. ठाणेदार दीपामाला भेंडे यांच्या हस्ते दारूच्या बाटल्या, तंबाखूच्या पुड्या, सिगारेटची पाकिटे आणि गुटख्यासारख्या व्यसनांच्या प्रतीकांना होळीच्या अग्नीत जाळून व्यसनमुक्तीचा संदेश देण्यात आला.

सामान्यतः होळीच्या दिवशी लोक वाईट गोष्टी आणि जुन्या आठवणी होळीत जाळून टाकतात. त्याच धर्तीवर, या 'व्यसनमुक्ती होळी'मध्ये व्यसनाला एक वाईट सवय मानून, दारू, सिगारेट किंवा इतर व्यसनांच्या वस्तू प्रतीकात्मक स्वरूपात जाळण्यात आल्या. समाजाला लागलेले हे व्यसन आयुष्यातून कायमचे काढून टाकावे, असा स्पष्ट संदेश यातून देण्यात आला. यावेळी ठाणेदार दीपामाला भेंडे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, व्यसन हे एक असे ग्रहण आहे जे व्यक्तीला, कुटुंबाला आणि पर्यायाने समाजाला पोखरून टाकतं. दारू, सिगारेट, तंबाखू, गुटखा यांसारखी व्यसने केवळ आर्थिक नुकसानच करत नाहीत, तर आपले आरोग्य, नातेसंबंध,आई वडील आणि भविष्यही हिरावून घेतात. या व्यसनांमुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत. एका क्षणाच्या सुखासाठी आपण आयुष्यभराची किंमत मोजतो. त्यामुळे व्यसनांचा त्याग करून एक निरोगी आणि आनंदी जीवन जगण्याचा संकल्प करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी उपस्थितांनी व्यसमुक्ती मुक्तीचा सकल्प केला. जिल्हा संघटक ॲडव्होकेट रोशनी वानोडे यांच्या माध्यमातून बाभुळगाव येथे नशाबंदी मंडळ महाराष्ट्र गेली 15 वर्षांपासून हा 'व्यसनमुक्ती होळी'चा कार्यक्रम सातत्याने राबवत आहे. या उपक्रमामुळे समाजात अनेकांना व्यसनातून बाहेर पडण्यासाठी प्रेरणा देण्यात येते. यावेळी व्यसन मुक्ती तालुका संघटक योगेश वानोडे, सत्यम पाटणकर, विशाल पिसे, सागर गारगाटे, शहेजाद शेख, राजू नवाडे, आदित्य फुलकर, गजू कोटेकर, संतोष काशील,व पोलीस कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

## • वेचक

### पुसद येथिल वरिष्ठ तंत्रज्ञ यांचा लाईनमेन दिनी कार्यकारी अभियंता यांच्याहस्ते सत्कार!



पुसद - येथील कार्यकारी अभियंता विद्युत वितरण भवन येथे लाईनमन दिनाच्या औचित्य साधून वरिष्ठ तंत्रज्ञ अजय गुजर,बंडू पवार व राजेश आगम यांचा कार्यकारी अभियंता श्री. चव्हाण यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व शाल देऊन उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल महावितरण विद्युत विभागातर्फे सत्कार व स्वागत करण्यात आले तसेच मोठ्या उत्साहात पुसद विद्युत भवन येथे लाईनमन दिवस साजरा करण्यात आला यावेळी उपस्थित उपकार्यकारी अभियंता तसेच वरिष्ठ व कनिष्ठ अभियंता व विद्युत कर्मचारी उपस्थित होते.

### टिपेश्वर प्रकरणात मोठी घडामोड; रिसॉर्ट व व्यावसायिक बांधकाम तक्रारीची केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांकडून दखल

पांढरकवडा - टिपेश्वर अभयारण्य परिसरातील इको-संवेदनशील क्षेत्र (ESZ) मध्ये उभारण्यात आलेल्या कथित बेकायदेशीर रिसॉर्ट व व्यावसायिक बांधकामांविरोधात अंकित नैताम (जिल्हा उपाध्यक्ष, यवतमाळ जिल्हा ट्रायबल फोरम) यांनी दाखल केलेल्या तक्रारीची थेट केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांनी दखल घेतल्याची माहिती समोर आली आहे. पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अंतर्गत सार्वजनिक तक्रार (PG) क्र. MOEAF/E/२०२६/०००००७४६ नोंदविण्यात आली असून, संबंधित प्राधिकरणांना तात्काळ व नियमसंगत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच सविस्तर अहवाल विहित कालमर्यादेत सादर करण्यास सांगण्यात आल्याचे अधिकृत कळविण्यात आले आहे. टिपेश्वर वन्यजीव अभयारण्य हे क्षेत्र पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ व वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत संरक्षित आहे. अशा संवेदनशील क्षेत्रात व्यावसायिक बांधकामे होत असल्याच्या आरोपांमुळे स्थानिक प्रशासन, वनविभाग व मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्यांवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या प्रकरणात संबंधित वनाधिकारी, जिल्हा प्रशासनातील मंजुरी देणारे अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकारी व पर्यावरणीय परवानग्या तपासणारी यंत्रणा यांच्या भूमिकेची चौकशी व्हावी, अशी मागणी होत आहे. केंद्र स्तरावर या तक्रारीची दखल घेतल्याने प्रकरणाला नवे वळण मिळाले असून, आता प्रत्यक्ष कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने ही कारवाई निर्णायक ठरणार का, याकडे जिल्हावासीयांचे लक्ष वेधले गेले आहे. राज्यव्यापी आंदोलन उभारू : "जर नियमबाह्य बांधकामे झाली असतील, तर संबंधित अधिकारी व जबाबदार पदाधिकारी यांच्यावर फौजदारी कारवाई करून निलंबन करण्यात यावे. दोषींना वाचविण्याचा प्रयत्न झाल्यास राज्यव्यापी आंदोलन उभारले जाईल," असा इशारा अंकित नैताम यांनी दिला आहे.

### इस्लाम पक्षाच्या जिल्हा समन्वयक पदी आवेसोद्दीन यांची निवड!



उमरखेड़ - यवतमाळ जिल्ह्यात दिवस आणि दिवस राजकारण चे वेगळे चित्र दिसत आहे, उमरखेड शहरातील युवा सामाजिक कार्यकर्ते आवेसोद्दीन यांनी आपल्या कार्यकर्त्यांसोबत मालेगाव येथील (इंडियन सेक्युलर लार्जेस्ट असेंबली ऑफ महाराष्ट्र ) या इस्लाम पक्षाच्या संस्थापक अध्यक्ष माजी आमदार असिफ शेख भेट घेतली, तसेच उमरखेड तालुक्यासह जिल्ह्यात पक्षाच्या प्रचार व प्रसार करण्याची इच्छा दाखवत असिफ शेख यांच्या हस्ते पक्षप्रवेश केला. यावेळी आवेसोद्दीन यांची एकामताने यवतमाल जिल्हा समन्यवक पदी निवड करण्यात आली. तसेच पुढील वाटचाल साठी संस्थापक अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या.

## निवृत्तीनंतरही शिक्षणसेवा सुरूच गावातील विद्यार्थ्यांसाठी मोफत ट्युशन, १५० विद्यार्थ्यांना शिक्षणाचा देत आहेत आधार

जनमाध्यम प्रतिनिधी



महागाव - तालुक्यातील चिल्ली ईजारा येथे आजच्या काळात शिक्षण महाग होत असताना एका निवृत्त शिक्षक प्रेम मुडे सर यांनी समाजासाठी आदर्श उदाहरण निर्माण केले आहे. गावातील गरीब व गरजू कुटुंबातील मुलांना मोफत शिक्षण मिळावे, या उद्देशाने ते दररोज सकाळी मोफत ट्युशन घेत आहेत. या ट्युशनमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना नियमित शिकवले जात असून अभ्यासातील मूलभूत संकल्पना (बेसिक) पूर्णपणे स्पष्ट करून दिल्या जात आहेत.

या मोफत शिकवणी वर्गात आतापर्यंत सुमारे १५० विद्यार्थी एकत्र करण्यात आले आहेत. सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या पातळीनुसार एकमेकांशी लिंक लावून, टप्प्याटप्प्याने अभ्यास समजावून सांगितला जातो. वाचन, लेखन, गणित, तसेच शालेय अभ्यासक्रम समजून घेण्यावर विशेष भर दिला जात असून प्रत्येक विद्यार्थ्याची शंका संयमाने सोडवली जाते. हे निवृत्त शिक्षक जनता कनिष्ठ व्यवसायिक महाविद्यालय, पोमूर्णा जि. चंद्रपूर येथे शिक्षक असून मे २०२५ मध्ये ते सेवानिवृत्त झाले आहेत. सेवानिवृत्तीनंतर विश्रांती न घेता त्यांनी ऑगस्ट २०२५ पासून समाजासाठी मोफत शिकवणी वर्ग सुरू केले. आपल्या उपक्रमाबाबत बोलताना प्रेम मुडे सर म्हणाले, "पन्नास मुलांपैकी फक्त पाच जरी चांगले घडले तरी ते माझ्यासाठी मोठे यश आहे." या मोफत ट्युशनमुळे अनेक मुलांचा अभ्यासातील आत्मविश्वास वाढत असून पालकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. आर्थिक परिस्थितीमुळे खासगी ट्युशन परवडत नसलेल्या कुटुंबांसाठी हा उपक्रम मोठा दिलासा ठरत आहे. सेवानिवृत्तीनंतरही शिक्षणाची ज्योत तेवत ठेवणाऱ्या या शिक्षकांनी समाजासाठी शिक्षणसेवेचा नवा आदर्श निर्माण केला असून, खरे शिक्षक कधीच निवृत्त होत नाहीत हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे.

## विजय मोघे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकीचे उपक्रम

जनमाध्यम प्रतिनिधी



पांढरकवडा - श्री विनायक बहुउद्देशीय ग्रामीण संस्था दिग्रसचे सचिव तथा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीचे सिनेट सदस्य मा. श्री विजय मोघे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. वाढदिवस साधेपणाने साजरा करत समाजहिताचा संदेश देण्याचा स्तुत्य उपक्रम यावेळी राबविण्यात आला.

यानिमित्ताने गोपाळकृष्ण मंदिर येथे गरजू व गरीब नागरिकांना अन्नदान करण्यात आले. तसेच नवीन गोरक्षण संस्थान, इंदिरा नगर येथे विद्यार्थ्यांच्या हस्ते वडाची रोपे लावून (वृक्षारोपण) करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रालाही हातभार लावत महाविद्यालयातील ग्रंथालयात ई-रिसोर्सेसचा वापर वाढावा व ग्रंथालयाचे आधुनिकीकरण व्हावे यासाठी मा. विजय मोघे यांनी अत्याधुनिक संगणक भेट देऊन विद्यार्थ्यांना उपयुक्त अशी मौल्यवान देणगी दिली. या माध्यमातून विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे. या सर्व उपक्रमांचे आयोजन प्राचार्य डॉ. अजय सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. अमर वंजारी, प्रा. डॉ. अरुण दसोडे, प्रा. डॉ. नरेश महाजन, प्रा. डॉ. प्रदीप झिलपिलवार, ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ. एकता मेनकुदळे, प्रा. डॉ. सुयोग मानकर, प्रा. डॉ. विनोद चव्हाण, श्री. विजय काकडे, जितेंद्र निमकर तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबवून मा. विजय मोघे यांनी सामाजिक बांधिलकीची जाणीव पुन्हा एकदा अधोरेखित केली असून उपस्थितांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

## उमरखेड शासकीय रुग्णालयातील डायलिसिस सेंटरमध्ये सुवेधेचा अभाव

जनमाध्यम प्रतिनिधी



उमरखेड - शहरातील राजाराम उत्तरवार शासकीय रुग्णालयात नुकत्याच पाच महिन्यांपूर्वी उमरखेड तालुक्यातील ग्रामीण भागातील रुग्णाची डायलिसिस साठी होणारी हेळसाड थांबविण्यासाठी सुसज्ज असे डायलिसिस सेंटर सुरू करण्यात आले आहे. परंतु डायलेसिस रुग्णासोबत येणाऱ्या नातेवाईकासाठी बसण्याची व्यवस्था नसल्यामुळे रून्नआणि त्यांच्या नातेवाईकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. साधारणतः एका रुग्णाला डायलिसिस पूर्ण होण्यासाठी तीन ते चार तासाचा कालावधी लागतो. रुग्णांना अनेक तास वाट पाहावी लागते. तर नातेवाईकांना बाहेर उभे राहून प्रतीक्षा करावी लागते.

नातेवाईकाच्या समस्या - डायलिसिस सेंटर मध्ये, वेटिंग रूम मध्ये बसण्यासाठी खुर्च्यांची व्यवस्था नसल्यामुळे नातेवाईकांना बाहेरच उभे राहावे लागते. या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सुद्धा नाही. डायलेसिस सेंटर कडे येणाऱ्या रस्त्यावरच पाणी साचलेले असते. परिणाम.. रुग्ण आणि नातेवाईक विशेषता वृद्धांना तासन तास उभे राहावे लागते. त्यामुळे ते थकतात. परिस्थिती काही रुग्णांना डायलिसिस दरम्यान चक्कर येणे किंवा उलट्या होणे.

संभाव्य दुष्परिणाम सारखे प्रकार घडल्यास नातेवाईकांना त्वरित बोलावने कठीण होते. डायलिसिस केंद्रात पुरेशी बसण्याची व्यवस्था पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी रुग्णालयाने तातडीने कारवाई करावी अशी मागणी नातेवाईकाकडून होत आहे.

## संकटमोचन हनुमान मंदिर महागाव येथे होळी दहन मोठ्या उत्साहात

जनमाध्यम प्रतिनिधी



महागाव - शहरातील प्रभाग क्रमांक ८ मधील संकटमोचन हनुमान मंदिर येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही होळी दहनाचा कार्यक्रम अत्यंत भक्तीभावाने, आनंदाने आणि उत्साहाने साजरा करण्यात आला. या उपक्रमात प्रभागातील सर्व नागरिकांनी आणि हनुमान भक्तांनी मोठ्या संख्येने एकत्र येऊन सहभाग नोंदवला. सण आणि धार्मिक उत्सवांमुळे समाजात सामाजिक एकता आणि मांगल्याची भावना दृढ होते, याची प्रचिती या सोहळ्यात आली.

कार्यक्रमाची प्रमुख वैशिष्ट्ये : सामूहिक पूजन: होळी दहनापूर्वी संकटमोचन हनुमान मंदिरात विशेष आरती आणि पूजन करण्यात आले. भाविकांनी पारंपरिक पद्धतीने नैवेद्य अर्पण करून सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. भक्तीमय वातावरण: "बजरंग बली की जय" च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. ढोल-ताशांच्या गजरात तरुणाईने जल्लोष केला. प्रदूषणमुक्त होळीचा संदेश: आयोजकांतर्फे लाकडांचा कमीत कमी वापर करून आणि रसायनांचा त्याग करून पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले. एकतेचे दर्शन: प्रभागातील लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच स्तरातील नागरिकांनी या कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले, ज्यामुळे प्रभागात सलोख्याचे वातावरण पाहायला मिळाले. या मंगलमयी सोहळ्यानंतर आता नागरिकांमध्ये धुलीवंदन आणि रंगपंचमीचा मोठा उत्साह दिसून आला ओम कुसगवार सॅम कदम गजानन नरवाडे रवी कदम प्रवीण नरवाडे सचिन भरवाडे सोनू इंगोले गणेश घोडे सुनील कदम विष्णू जाधव महेश अण्णा पांडू नरवाडे श्रीकांत नागमोते गौरव गायकवाड ऋषिकेश वाकोडे ओंकार बेलखेडे

## कायरचे सुपुत्र प्रशांत निखाडे यांची पोलीस उपअधीक्षक (डीवायएसपी/एसीपी–प्रथम १ पदी निवड; शिवसेना (शिंदे गट) तर्फे कायर येथे घरी जावून सन्मान

जनमाध्यम प्रतिनिधी



वणी - तालुक्यातील कायर या गावातील शेतकरी कुटुंबातील सुपुत्र प्रशांत (बुद्धीवान) बिंबिसार निखाडे यांनी सलग पाच वर्षांत आठ उच्चपदस्थ शासकीय पदांवर यश मिळवत इतिहास रचला आहे. 2025 मध्ये त्यांची पोलीस उपअधीक्षक (Deputy Superintendent of Police) / सहायक पोलीस आयुक्त (ACP – Class 1) पदासाठी निवड झाली असून त्यांच्या या उतुंग भरारीमुळे संपूर्ण वणी तालुक्यात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रशांत निखाडे यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,कायर येथे तर माध्यमिक शिक्षण विवेकानंद विद्यालय, कायर येथे झाले.त्यानंतर एसपीएम कॉलेज, वणी येथून अकरावी-बारावी विज्ञान शाखेत विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होत त्यांनी लोकमान्य टिळक महाविद्यालय,वणी येथून बी.एस्सी.पदवी संपादन केली. 2018 मध्ये त्यांनी पुणे येथे स्पर्धा परीक्षेच्या तयारीस सुरुवात केली.कोरोना महामारीच्या कठीण काळात गावी परत येऊनही त्यांनी अभ्यासात खंड पडू दिला नाही. 2020 व 2021 मध्ये Maharashtra Public Service Commission (MPSC) च्या संयुक्त परीक्षेत PSI (पोलीस उपनिरीक्षक), STI (राज्य कर निरीक्षक) व ASO (सहाय्यक कक्ष अधिकारी) अशा पदांवर दुहेरी यश संपादन करत सलग सहा पदांवर गवसणी घातली. 2023 मध्ये राज्यसेवेतून सहाय्यक गटविकास अधिकारी (Assistant BDO) म्हणून नियुक्ती झाली.आणि आता 2025 मध्ये पोलीस उपअधीक्षक (DySP/ ACP – Class 1) पद मिळवून त्यांनी यशाचे शिखर गाठले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे कायर गावासह संपूर्ण वणी तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. दिवाळीनंतरही त्यांच्या यशाचा जल्लोष सुरू असून विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. प्रशांत निखाडे यांनी आपले यश म.जोतीराव फुले,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरणी अर्पण केले असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास व योग्य मार्गदर्शनाच्या बळावर मोठी स्वप्ने पाहावीत,असा प्रेरणादायी संदेश दिला आहे. यावेळी शिवसेना (शिंदे गट) चे जिल्हा संघटक विजय चोरडिया, आशिष खुलसंगे,सुधाकर गोरे, किशोर नांदेकर,प्रसाद ठाकरे, राजू तुराणकर,अजिंक्य शेंडे, शुभम गोरे,प्रतिक गौरकार, विठ्ठल शांकावर,भारत आदे,दत्तू चौधरी,संजय तोमस्कर,नंदु अंबोरे,बंडू कोंगरे,सागर अडकीले आदींसह अनेक शिवसैनिक उपस्थित होते.

## एपस्टीन फाईल प्रकरणी वंचित बहुजन आघाडीचा जाहीर निषेध, देशव्यापी चौकशीची मागणी




जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - आंतरराष्ट्रीय स्तरावर खळबळ माजवणाऱ्या एपस्टीन फाईल प्रकरणावर देशातील प्रमुख विरोधी पक्ष आणि अनेक राजकीय पक्षांनी मौन बाळगल्याबद्दल वंचित बहुजन आघाडीने तीव्र संताप व्यक्त करत जाहीर निषेध नोंदवला आहे. या प्रकरणात आंतरराष्ट्रीय स्तरावरील बड्या व्यक्तींसह भारतातील प्रभावशाली राजकारणी, मंत्री व उद्योगपतींची नावे समोर येत असताना त्यावर जाब विचारण्याचे धाडस कोणीही करत नसल्याचा आरोप वंचितने केला आहे.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांनी 2 मार्च रोजी मुंबई येथे या प्रकरणी जाहीर एल्गार पुकारत विरोधी पक्षांच्या मौनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. एपस्टीन फाईलमधील गंभीर आरोपांची स्वतंत्र व पारदर्शक चौकशी व्हावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या यवतमाळ जिल्हा कार्यकारिणीने जाहीर निषेध आंदोलन केले. आंदोलनात कार्यकर्त्यांनी तोंडाला काळ्या पट्ट्या लावून शांततापूर्ण मार्गाने आपला रोष व्यक्त केला. "देशातील लोकशाही, नैतिकता आणि कायद्याचे राज्य टिकवायचे असेल तर या प्रकरणाचा तडा लागलाच पाहिजे," अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

या निषेध आंदोलनाला जिल्हाध्यक्ष डॉ. नीरज वाघमारे, उपाध्यक्ष विशाल पोले, जिल्हा महासचिव ॲड. संजय इंगळे, अशोककुमार कयापाक, प्रमोद पाटील, गजानन कोकाटे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला व पुरुष कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. वंचित बहुजन आघाडीने येत्या काळात या प्रकरणी जनजागृती व आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही दिला आहे.

## आयकर विभाग, एसीबी विभागाने अवाढव्य संपत्तीच्या चौकशीसाठी तक्रारीची वाट बघू नये; सर्वसामान्य जनतेची मागणी

जनमाध्यम प्रतिनिधी

दिग्रस - देशाच्या आर्थिक प्रगतीमध्ये पारदर्शकता असणे महत्त्वाचे आहे. देशाचा अर्थव्यवस्थेचा कणा असलेला सामान्य करदाता आज एका मोठ्या संकटातून जात आहे. एकीकडे अल्प उत्पन्न असलेला मध्यमवर्गीय नागरिक आपल्या कष्टांच्या कमाईतून रुपया रुपयाचा कर भरत आहे. विकास कामामधून कमिशन गोळा करणाऱ्या अनेक विभागातील अधिकाऱ्यांना त्यांच्या मालमत्ता चे मागील पाच वर्षाचे ऑडिट होणे आवश्यक आहे. बेनामी मालमत्ता चा शोध घेण्यासाठी आयकर विभागाने केवळ तक्रारीची वाट न पाहता गुप्तचर यंत्रणेचा वापर करून छापे टाकावेत केवळ महसूल गोळा करणे ही आयकर विभागाची जबाबदारी नाही आर्थिक समतोल श्रीमंताकडील अघोषित संपत्ती बाहेर काढून ती देशाच्या विकासासाठी गरिबाच्या कल्याणासाठी उपलब्ध करून देणे.प्रामाणिक कर दाता जेव्हा पाहतो की बडे अधिकारी आणि नेते नियमाची पायमल्ली करून गडगंज संपत्ती जमा करत आहे.तेव्हा त्याचा व्यवस्थेवरचा विश्वास उडतो हे आर्थिक दरी कमी करणे. आणि भ्रष्टाचाराची ही साखळी तोडणे ही आयकर विभागाची घटनात्मक आणि सामाजिक जबाबदारी आहे. शासकीय सेवेत राहून पदाचा गैरवापर करणाऱ्या अधिकाऱ्यांची संशयास्पद मालमत्ता जप्त करून संबंधितावर कठोर कायदेशीर कारवाई करणे आज काळाची गरज बनली आहे. अशातच जिल्ह्यातील शासकीय सेवेत असणाऱ्या एका बांधकाम उपअभियंता नोकरी करीत असताना कोटी रुपयांची त्यांनी संपत्ती जमा केल्याच्या वृत्तपत्रामध्ये बातम्या झळकत आहे. देशासह राज्यातील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी आयकर विभाग तथा एसीबी विभागाने संशयास्पद धाडी टाकून केलेल्या भ्रष्टाचाराची सत्यता पडताळणे गरजेचे आहे.

## आरटीई 25% प्रवेश जाचक अटी रद्द करण्याची संध्या रणवीर यांची मागणी

जनमाध्यम प्रतिनिधी



महागाव - आर टी ई अंतर्गत 25% प्रवेशासाठी यावर्षी नवीन लादलेल्या अटी रद्द करण्यात येऊन विध्यार्थ्यांना सुलभ प्रवेश मिळावा या न्याय मागणीचे निवेदन शिक्षणमंत्री महाराष्ट्र शासन यांना सौं संध्या संदेश रणवीर यांनी पाठवून विद्यार्थी हितार्थ न्याय मागणी केली आहे. आर टी ई 25%अंतर्गत गरीब,गरजू व सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना शिक्षणाची मोफत प्रवेशाची संधी आहे.यात जाचक अटी टाकण्यात आल्याने अनेक पालकांना अडचणीला सामोरे जावे लागणार आहे यात पूर्वीची 3 किलोमीटर हवाई अंतराची अट काढून 1 किलोमीटर केल्याने अनेक विध्यार्थ्यांना या प्रवेशापासून वंचित राहावे लागणार आहे. शिक्षणाचा हक्क कायद्यात हवाई अंतराचा कुठलाही उल्लेख नसताना ही अट टाकण्यात आली असून हा बेकायदेशीर अन्याय असून ही अट रद्द करावी सोबतच भाडे करार नोंदणी साठी दुय्यम निबंधक कार्यालयाची सक्ती करण्यात आली असून त्याऐवजी केवळ 100 रुपयाच्या भाडेकरार किंवा घरमालकाच्या संमतीवरही प्रवेश द्यावा जेणेकरून विध्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत सुलभता येईल या दृष्टीने कार्यवाही व्हावी अशी मागणी संध्या रणवीर यांनी निवेदनातून केली आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अचलपूर शहरात एकही फायर ब्रिगेड वाहन उपलब्ध नाही

## नागरिकांच्या जिवाशी खेळ, नगरपरिषदेचे दुर्लक्ष.
## न.प शहर कार्यालयात २४ तास अग्निशमन वाहन उपलब्ध करण्याची मागणी

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर शहराची लोकसंख्या ही एक लाखाच्या वर आहे. परंतु, आपत्कालीन परिस्थितीवर नियंत्रण करण्यासाठी अचलपूर नगर परिषदेतर्फे अचलपूर शहरात फायर ब्रिगेडचे एकही वाहन नाही. त्यामुळे जर शहरात कुठेही आगीची घटना घडली, तर त्या आगीवर प्रशासन नियंत्रण कसे मिळविणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या भोंगळ कारभारामुळे स्थानिक नागरिकांची सुरक्षा धोक्यात असल्याचे दिसून येत आहे.

अचलपूर शहराची लोकसंख्या एक लाखाच्या जवळपास आहे. अचलपूर नगर परिषदेतील एकूण ४१ नगरसेवकांपैकी २४ नगरसेवक अचलपूर भागातील आहेत. तरीही अचलपूर शहरात एकही वेगळी फायर ब्रिगेड वाहन उपस्थित राहत नाही, ही मोठी शोकांतिका आहे.अचलपूर नगर परिषद शहर कार्यालयात फार ब्रिगेड उभी करण्याकरिता मोठी प्रशासकीय इमारत बांधण्यात आली आहे. त्यावर ठळक अक्षरात 'अचलपूर नगर परिषद अग्निशमन ठिकाण' असे नमूद आहे. त्याचे विधिवत उद्घाटनदेखील करण्यात आले.मात्र अजूनही अचलपूर शहरासाठी एकही फायर ब्रिगेड वाहन २४ तास येथे उभी करण्यात येत नाही. अचलपूर शहरातील नगरसेवकांनी अनेक वेळा अग्निशमन दलासाठी मागणी केली, मात्र नगर परिषदेने वाहन उपलब्ध करून दिले नाही.काही दिवसांपूर्वी अचलपूर शहरातील चावलमंडी भागात एका दुकानाला मोठी आग लागली होती. शनी मंदिराजवळ बिलनपुरा भागातसुद्धा एका घराला आग लागली होती. अशा अनेक लहान-मोठ्या आगीच्या घटना अचलपुरात घडत असतात. आग लागल्यावर परतवाडा येथून अग्निशमन दल येते. अचलपूर शहराला येण्यासाठी २० ते ३० मिनिटे त्याला लागतात. त्यामुळे अनेक वेळा आगीच्या मोठ्या घटना आटोक्यात येत नाही. त्यामुळे अचलपूर शहर कार्यालयात एक फायर ब्रिगेड वाहन नेहमी उभे करणे आवश्यक आहे.या अगोदर विलायतपुरा गुणवंत नगर या भागातसुद्धा घरे जळाली होती. फायर ब्रिगेडच्या वाहनाला परतवाडा येथून येण्याकरिता विलंब झाल्याने घरे जास्त प्रमाणात जळाली होती.



■ नगरपरिषद कार्यालयात अपुऱ्या मनुष्यबळामुळे ते शक्य झाले नाही. भविष्यात मनुष्यबळ मिळाल्यावर निश्चित अचलपुरात २४ तास एक फायर ब्रिगेड गाडी उभी करू. ज्याचा फायदा अचलपूर शहरातील नागरिकांना होणार आहे.

**धीरजकुमार गोहाड,**
मुख्याधिकारी, अचलपूर नगरपालिका

परतवाडा शहरात दोन्ही फायर ब्रिगेड गाड्या उभे राहतात. एक गाडी २४ तासाकरिता नेहमीकरिता अचलपूर शहरात उभे राहणे आवश्यक आहे.

## धुलिवंदनदिना निमित्त स्मशानभूमीत स्वच्छता व सेवा उपक्रम



बेलोरा-शिरजगाव बंड येथे धुळीवंदन दिनाचे औचित्य साधून स्मशानभूमी परिसरात स्वच्छता, सुशोभीकरण व धार्मिक सेवा उपक्रम उत्साहात पार पडला. ग्रामस्थांच्या स्वयंप्रेरणेने स्मशानभूमीतील झाडांना रंगरंगोटी करण्यात आली तसेच संपूर्ण परिसर स्वच्छ करून पवित्र स्थळाचे सौंदर्य वाढविण्यात आले. यावेळी भगवान शंकर यांच्या मूर्तीला विधिवत अभिषेक करण्यात आला. त्यानंतर उपस्थित ग्रामस्थांना चणा व तूर यांची उसळ देऊन नाश्त्याचे वाटप करण्यात आले. धुळीवंदन सण सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्याचा आदर्श या उपक्रमातून ग्रामस्थांनी घालून दिला. या कार्यक्रमात किशोर खवले (माजी सरपंच), नरेंद्रराव ठाकरे (माजी अध्यक्ष, सेवा सहकारी सोसायटी), दिलीपराव कारस्कर (सदस्य, सेवा सहकारी सोसायटी), बंडूभाऊ तायवाडे, दादारावजी गायधने, ज्ञानेश्वर मानापुरे, आमोलराव लांजेवार, बाळासाहेब चर्जन, विजयराव बुटे, प्रमोदराव जावरकर आदींनी सहभाग नोंदवून मोलाचे सहकार्य केले.

## हमी भावाने शासकीय हरभरा खरेदीचा शुभारंभ
### शेतकऱ्यांना मिळणार ५,८७५ रूपये दर

**चांदूरबाजार/वार्ताहर**

स्थानिक तालुका खरेदी विक्री संघाचेवतीने तालुक्यात, शासकीय हरभरा खरेदी केंद्राचा शुभारंभ करण्यात आला आहे.हा हमी भावाने,हरभरा खरेदीचा मुहूर्त साधण्यात आला.सदर हरभरा खरेदी केंद्राचे उद्घाटन सहायक निबंधक सहकार, प्रमोद कायदे व खविसचे अध्यक्ष डॉ प्रताप किटुकले यांच्या हस्ते करण्यात आले.

या शासकीय हरभरा खरेदी केंद्रावर शासनाने निश्चित केलेल्या, ५,८७५ रूपये या हमी दराने हरभरा खरेदी केल्या जाणार आहे.तसेच शासनाने निश्चित केलेल्या हेक्टरी २५ क्विंटल,या उत्पादकते नुसार ७/१२ वरील नमूद पेर्या निहाय



हरभरा खरेदी करण्यात येईल. शेतकऱ्यांनी नोंदणी केलेल्या क्रमवारी नुसार, हरभरा खरेदी करण्यात येईल.या हमी भाव खरेदी केंद्रामुळे, शेतकऱ्यांना हरभर्याला योग्य दर मिळण्यास मदत होणार आहे. मुहूर्ताला प्रथम नोंदणी केलेल्या सुरेश कृष्णराव गुडधे , या शेतकऱ्याचा हरभरा हमी भावाने खरेदी करण्यात आला.हमीभाव हरभरा खरेदी केंद्र शुभारंभाचे वेळी खरेदी विक्री संघाचे संचालक श्रीपाद आसरकर, विलास शेकार, श्रीकृष्ण वानखडे,संजय गुर्जर, साहेबराव पोहकार, प्रभाकर किटुकले,प्रभारी व्यवस्थापक सुनील कोंडे, शेतकरी भाई देशमुख, कर्मचारी आशिष सरोदे, निलेश डांगे, कामगार कंत्राटदार एजाज खॉ इबादत खॉ यांचे सह अनेक हरभरा उत्पादन शेतकरी उपस्थित होते.शासनाच्या या हमीभाव हरभरा खरेदी योजनेचा, तालुक्यातील हरभरा उत्पादन शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा.असे आवाहन खविसच्या अध्यक्षांनी केले आहे.

## सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी निरूपीत ब्रह्मविद्या प्रवचन सोहळा

**अमरावती/का.प्र.**

द्वारकाधीश श्रीकृष्ण मंदिर माताखिडकी अमरावती येथे श्रीकृष्ण महिला मंडळाचे वतीने सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी निरूपीत ब्रह्मविद्या प्रवचन सोहळ्याचे आयोजन ६ते १३ मार्च २०२६ पर्यंत करण्यात आले आहे.

प्रवचनाची वेळ दररोज सायंकाळी ६:३० ते ८ वाजेपरेंत राहिल घोटी. जी.नाशीक निवासी ब्रह्मविद्या विभूषित वयोवृद्ध, तपोवृद्ध प.पु.प.महंत, पुजदेकर बाबा महानुभाव, यांच्या सुमधुर वाणीतून निरूपण आयोजित करण्यात आले आहे. प. पु. पुजदेकर बाबा हे ब्रह्मविद्या शास्त्राचे अभ्यासक असून संपूर्ण भारतात अनेक ठिकाणी त्यांची सतत प्रवचने होत असतात. या प्रवचन सोहळ्याचे उद्घाटन दि. ६ मार्च रोजी सायंकाळी ठीक ६ वाजता अखिल भारतीय महानुभाव परीषदेचे अध्यक्ष तथा महानुभाव आश्रम राजापेठ अमरावती चे संचालक कवीश्वर कुळाचार्य आचार्य प्रवर प.पु.प.महंत मोहनराज बाबा कारंजेकर यांचे शुभहस्ते होणार आहे. याप्रसंगी श्रीकृष्ण मंदिर देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष सुभाष पावडे, उपाध्यक्ष डॉ. अशोक राऊत तसेच सचिव अॅड अरुण ठाकरे, कोषाध्यक्ष इंजि. एस. पी. देशमुख यांच्या उपस्थितीत होईल या सोहळ्याचा समारोपीय कार्यक्रम दि. १३ मार्च रोजी सकाळी १० वाजता, घेण्याचे ठरले आहे. समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष, प. पू. प. म. आचार्यप्रवर श्री दर्यापुरकर बाबा, बडनेरा आश्रम, तसेच रिद्धपूर निवासी महंत गोपीराज बाबा शास्त्री नवे महानुभाव हे असणार आहे. या प्रवचन सोहळ्याकरिता सर्व सद्भक्तांनी वेळेवर उपस्थित होते.

## माजी विद्यार्थिनींचा माहेर मेळावा



**अमरावती/का.प्र.**

मनपा मराठी मुलींची हायस्कूल बुधवार येथे माजी विद्यार्थिनींचा माहेर मेळावा मोठ्या थाटात संपन्न झाला. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मनपा माजी महापौर विलास इंगोले,मनपा नगरसेवक आशिष आतकरे, संजय शिरभाते तसेच मनपा नगरसेविका सुनीता भेले,ललिता रतावा तसेच माजी शिक्षणाधिकारी सविता चक्रपाणि, मनपा शिक्षण अधिकारी प्रकाश मेश्राम निवृत्त शिक्षक वर्ग विजय भुयार, तिडके शिक्षकेतर कर्मचारी शर्माजी, भोजने, दुबे या सर्व उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका कुऱ्हेकर यांनी केले माजी विद्यार्थिनी स्वाती काकडे हिने आपले मनोगत व्यक्त केले. तसेच ज्या विद्यार्थिनींनी आपल्या जीवनामध्ये यश संपादन केले. त्यापैकी अंजू विजयकर, रेखा धुर्वे, वैशाली हादवे यांच्या सत्कार करण्यात आला. शाळेची आठवण म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यानीला एक स्मृतीचिन्ह व गुलाब पुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच सर्व शिक्षकांचाही सन्मान करण्यात आला. नंतर सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. विविध खेळ नृत्य गाणे याचा आनंद घेत शाळेचा विद्यार्थ्यांनी निरोप घेतला. कार्यक्रमाचे संचालन शुभांगी करुले तिने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील मुख्याध्यापक वैशाली कुऱ्हेकर, प्रवीण पाटील,रवींद्र सरोदे, सुनील आसलकर, अमोल औरंगपुरे, वैशाली परतेकी, अश्विनी विघ्ने, अर्चना लिखितकर, किशोर टॅटू, विद्या जटाळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## संक्षिप्त

### साफल्य विद्यालयात नैसर्गिक रंग कार्यशाळा



**लेहेगाव** -सामाजिक वनीकरण विभाग परीक्षेत्र, मोर्शी व साफल्य विद्यालय, सावरखेड यांच्या संयुक्त विद्यमाने साफल्य विद्यालय सावखेड येथे नैसर्गिक रंग कार्यशाळाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला वनपाल राठोड, वनरक्षक सागर श्रीवास, वनीकरणाचे इतर कर्मचारी सुरज डोंगरे व मनोज चौधरी उपस्थित होते. कृत्रिम रंगाचे मानवी आरोग्यावरील दुष्परिणाम यामध्ये त्वचेचे विविध आजार तसेच मानवी डोळ्यावर होणारे दुष्परिणाम इत्यादी बाबत माहिती मुख्याध्यापक प्रशांत आजनकर यांनी प्रास्ताविकामधून विशद केली. वनपाल राठोड यांनी नैसर्गिक रंग तयार करण्याची कृती यामध्ये बीट, हळद ,पळस फुले व गुलाब फुले इत्यादींपासून तयार केलेले रंगाचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना करून दाखविले. वनरक्षक सागर श्रीवास यांनी परीसरातील केरकचरा जमा करून त्याची होळी करावी व पर्यायाने आपला परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे अशा प्रकारचे मत व्यक्त केले. या कार्यशाळेत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पळस फुलांचा हार व पळस फुलांचे गुच्छ तयार केले. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन विज्ञान शिक्षक नरेंद्र सुळे व आभार मुख्याध्यापक प्रशांत अजनकर यांनी केले. या कार्यशाळेच्या यशस्वी ते करिता विद्यालयातील गणित शिक्षक श्रीराम गुंजीटे, आर बी मालपे योगिता हिरूळकर,बि ओ ठाकूर यांनी परिश्रम घेतले.

### राष्ट्रीय विज्ञान दिवसानिमित्त प्रदर्शनी व बाल वैज्ञानिक मेळावा



**लेहेगाव** - गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी नावाजलेली जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा लेहेगाव येथे राष्ट्रीय विज्ञान दिवस बाल वैज्ञानिक मेळावा व विज्ञान प्रदर्शनी चे आयोजन करण्यात आले होते.नेहमीच आपल्या आगळ्या वेगळ्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या लेहेगाव जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी अत्यंत उच्च दर्जाचे मॉडल्स बनवून पाहुण्यांना व परीक्षकांना कौतुक करण्यास बाध्य केले. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन केंद्रप्रमुख सुनील बोकाडे यांनी केले. मुख्याध्यापक माधुरी टावे,यांच्या मार्गदर्शनात मनीषा शेंडे व चंद्रशेखर डोंगरे यांनी आयोजन केले.

### ग्रामीण भागात कलम ३७(१) व (३) लागू

**अमरावती** - जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस अधीक्षक (ग्रामीण), अमरावती यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे. सदर प्रतिबंधात्मक आदेश जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागात लागू करण्यात आला असून ११ मार्च २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी कळविले आहे.

### जिल्हाधिकारी कार्यालयात 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा



**अमरावती** - ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवनात उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे आणि प्रमुख वक्ते अविनाश दुधे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. सुरज मडावी, अधिक्षक निलेश खटके आणि विधी अधिकारी नरेंद्र बोहरा प्रमुख उपस्थित होते. यावेळी प्रमुख वक्ते दुधे यांनी मराठी भाषेच्या समृद्ध वारशावर प्रकाश टाकला. त्यांनी मराठीला दोन हजार वर्षांहून अधिक काळाचा गौरवशाली इतिहास असल्याने तिला 'अभिजात भाषेचा' दर्जा मिळाला असल्याचे सांगितले. निवासी उपजिल्हाधिकारी काकडे यांनी वाचनाच्या सकारात्मक परिणामांवर भर दिला. मराठी भाषेचा ऱ्हास थांबवण्यासाठी नवीन पिढीला वाचनाची गोडी लावणे आवश्यक असल्याने मत व्यक्त केले. जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. मडावी यांनी मराठी भाषा जपण्याचा आणि वाचन संस्कृती जोपासण्याचा दृढ संकल्प करण्याचे आवाहन केले. सिमिता दाभिरे यांनी प्रास्ताविक केले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी. सुरेंद्र रामेकर यांनी सूत्रसंचालन केले. सलोनी उमाळे यांनी आभार मानले.

### जिल्हा सनियंत्रण समितीची मान्यता

**अमरावती** -मेळघाटातील मोबाईल नेटवर्क सेवा सुधारण्यासाठी जिल्हा संनियंत्रण समितीने १० मोबाईल टॉवरच्या कामाला मंजुरी दिली आहे. यात ९ बीएसएनएल आणि एक ऑप्टीक फायबरच्या टॉवरचा समावेश आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने हा निर्णय घेतला आहे.जिल्हाधिकारी कार्यालयात आज मेळघाट पर्यावरण संवेदनशील क्षेत्राचे संनियंत्रण समितीची सभा पार पडली. यावेळी परतवाड्याचे विभागीय वन अधिकारी अनंता दिघोळे उपस्थित होते.मेळघाटातील दहा बीएसएनएलच्या टॉवरला राष्ट्रीय वन्यजीव मंडळाने मंजुरी दिली आहे. मात्र प्रत्यक्ष काम सुरू करण्यासाठी जिल्हा संनियंत्रण समितीची मंजुरी आवश्यक असते.यासोबतच वनक्षेत्रात करण्यात येणारे जलसंधारण तसेच इतर कामांनाही मंजुरी देण्यात आली.


## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार, जि. अमरावती**

आर.एम.जे.सी. ९९/२०२६ — ने. ता. ३०/०३/२०२६

**अर्जदार-** १. गोविंद देवराव राऊत, वय ५८ वर्षे, व्यवसाय -मजूरी
२. गजानन देवराव राऊत, वय ५६ वर्ष, व्यवसाय -मजूरी
दोन्ही रा. हैदतपूर पो. कुरळपूर्णा ता. चांदूर बाजार जि. अमरावती
३. रेखा ज्ञानेश्वर गजभिये, वय ५३ वर्ष, व्यवसाय घरकाम
रा. अशियाना क्लब जवळ, ब्रिस्क फैक्ट्री वडाळी, अमरावती ता.जि. अमरावती

**गैरअर्जदार :-** **निरंक**

**विरुध्द**

**बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठीकाणी राहतात. **मृतक देवराव तोटीरामजी राऊत** यांचा मृत्यु दि. १२/१२/२००६ रोजी रा. हैवतपूर ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे झालेला आहे. तसेच मृतक सुमित्रा देवराव राऊत तिचा मृत्यु दि.१७/११/२०२५ रोजी रा. हैदतपूर ता. चांदूर बाजार जि. अमरावती येथे झालेला आहे. वारस नाहीत. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराव्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशीर अर्जदारांना मय्यताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.नं. ९९/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २८/०२/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
चांदूर बाजार चांदूर बाजार



## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क, स्तर) चांदुर बाजार, जि. अमरावती.**

आर.एम.जे.सी. ६९/२०२६ — ने. ता. २०/०३/२०२६

**अर्जदार :-**
१. संजय गणपत यावले, वय ५५ वर्षे, व्यवसाय मजुरी
रा. शिरजगाव कसबा, ता. चांदूर बाजार जि. अमरावती

**विरुध्द**

**गैरअर्जदार : निरंक**

**बॉम्बे रेग्यूलेशन अॅक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठीकाणी राहतात. मृतक श्री नामदेव किसनराव यावले यांचा मृत्यु दि. ०६/१०/२००७ रोजी रा. शिरजगाव कसबा ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे झालेला आहे. तसेच मृतक प्रमिला नामदेवराव यावले, हिचा मृत्यु दि. २४/१२/२०२१ रोजी शिरजगाव कसबा ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे झालेला आहे.

यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराव्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदारांना मय्यताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं. ६९/२०२६ नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंया वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १०/०२/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार**
सहाय्यक दिवाणी व फौजदारी
न्यायालय चांदुर बाजार



## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

आज दि. २१/८/२०२५रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **निमखेड** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत निमखेड यांनी बोलाविल्यानुसार निमखेड येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नाव **कामृन्निसा सैय्यद शफी** अर्जात नमूद जन्म/मृत्यू दिनांक ०१/०१/१९६१ च्या बाबतीत

आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **निमखेड** येथील स्थनिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हांला माहिती आहे.

३) सदरील जन्म मृत्यू नोद निबंधकाकडे विहित वेळेत न होण्याचे कारण **प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे हे आहे**. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर- योग्य ते नमूद करा)

करिता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

**पंचाचे नाव**
१. प्रल्हाद प. सिरसाठ(सरपंच)
२.जे.व्ही. यावले (सरपंच)
३.पंकज न. राऊत(पो.पाटील)
३. जी. डी. फुटाणे

**सही**
१. प्रल्हाद प. सिरसाठ(सरपंच)
२.जे.व्ही. यावले (सरपंच)
३.पंकज न. राऊत(पो.पाटील)
३. जी. डी. फुटाणे

शिक्का

**समक्ष.**
**निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत कार्यालय,**
**निमखेड ता.चांदूर बाजार जि. अम.**



## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

आज दि. रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **निमखेड** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत निमखेड यांनी बोलाविल्यानुसार निमखेड येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नाव **अब्दुल माजीद शेख करीम** अर्जात नमूद जन्म/मृत्यू दिनांक १९/१/१९८३ च्या बाबतीत

आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे निमखेड येथील स्थनिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हांला माहिती आहे.

३) सदरील जन्म मृत्यू नोद निबंधकाकडे विहित वेळेत न होण्याचे कारण **प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे हे आहे.** (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर- योग्य ते नमूद करा)

करिता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

**पंचाचे नाव**
१. प्रल्हाद प. सिरसाठ(सरपंच)
२.जे.व्ही. यावले (सरपंच)
३.पंकज न. राऊत(पो.पाटील)
३. जी. डी. फुटाणे

**पंचाचे नाव**
१. प्रल्हाद प. सिरसाठ(सरपंच)
२.जे.व्ही. यावले (सरपंच)
३.पंकज न. राऊत(पो.पाटील)
३. जी. डी. फुटाणे

शिक्का

**समक्ष.**
**निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत कार्यालय,**
**निमखेड ता.चांदूर बाजार जि. अम.**

# सेवक संयुक्त कृती समितीची पुण्यात बैठक

## ठोस निर्णय होत नसल्याने आंदोलनाची भूमिका जाहीर; शिक्षण संचालक डॉ.शैलेंद्र देवळाणकर यांना दिले निवेदन

**अमरावती/का.प्र.**
महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठे व त्यांना संलग्नित महाविद्यालयांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे अनेक महत्त्वाचे प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. या प्रलंबित प्रश्नांच्या अनुषंगाने सेवक संयुक्त कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे नुकतीच झाली.

या बैठकीत शासनाच्या स्तरावर प्रलंबित असलेल्या प्रश्नांबाबत ठोस निर्णय होत नसल्याने, आंदोलनाची भूमिका घ्यावी, असा एकमताने निर्णय घेण्यात आला. बैठकीत ठरल्याप्रमाणे, आंदोलनाच्या संदर्भात सेवक संयुक्त कृती समितीच्या वतीने माननीय उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांना निवेदन सादर करण्यात आले. यापूर्वीही कृती समितीच्या वतीने अनेक वेळा प्रत्यक्ष भेटी घेऊन तसेच लेखी स्वरूपात शासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे.

मात्र, सातत्यपूर्ण पाठपुरावा करूनही अपेक्षित निर्णय न झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष व अस्वस्थता निर्माण होत असल्याची बाब कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांच्या निदर्शनास आणून दिली. यावेळी डॉ. देवळाणकर यांनी शिक्षकेत्तर सेवकांच्या समस्या सोडविण्यासाठी आपण प्रामाणिकपणे लक्ष देऊ, असे आश्वासन उपस्थित पदाधिकाऱ्यांना दिले.



या बैठकीस राज्याचे शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, प्रशासन अधिकारी सुयश दुसाने, कृती समितीचे अध्यक्ष अजय देशमुख, महासंघाचे अध्यक्ष प्रकाश म्हसे, महासंघाचे महासचिव रावसाहेब त्रिभुवन, विद्यापीठ महासंघाचे सचिव मिलिंद भोसले, महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष दिनेश दखणे, कास्ट्राईब युनियन कोल्हापूरचे अध्यक्ष आनंद खामकर, अशासकीय महाविद्यालयीन महासंघाचे अध्यक्ष माधव राऊळ, महासंघाचे उपाध्यक्ष अशोक रानवडे, अधिसभा सदस्य सुमित ढोरे, संतोष मदने, ज्ञानेश्वरराव बारस्कर, प्रशांत देशमुख, प्रफ्फुल घवळे, संदीप हिवरकर, दिलीप उपासे, मनोहर राजपूत, बाळासाहेब आंत्रे, शिवाजी उतेकर, मारुती धोत्रे, प्रवीण पाटील, विजय घरत, गोपाळ सोनवणे आदी पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**प्रलंबित प्रमुख मागण्या**

सातव्या वेतन आयोगातील १०, २० व ३० ही तीन लाभांची सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजना अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना तात्काळ लागू करण्यात यावी., शासनाच्या अधिपत्याखालील विभागांसाठी घेतलेल्या निर्णयांनुसार, दिनांक ०१/११/२००५ पूर्वी पदभरती जाहिरात / अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणांमध्ये, शासन सेवेत ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या अकृषी विद्यापीठे व संलग्नित अशासकीय महाविद्यालयांतील अनुदानित पदांवरील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात यावी. अकृषी विद्यापीठांतील उर्वरित शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग तात्काळ लागू करण्यात यावा. राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयीन सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मिळणारे रजा रोखीकरण सातव्या वेतन आयोगानुसार मिळणाऱ्या अंतिम वेतनाच्या आधारे करण्यात यावे. राज्यातील संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक पदभरतीस ज्या प्रमाणे मान्यता देण्यात आली आहे, त्याच धर्तीवर अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील रिक्त शिक्षकेत्तर पदे भरण्यास तात्काळ मंजुरी देण्यात यावी. राज्यातील संलग्नित महाविद्यालयांतील प्रयोगशाळा परिचर व ग्रंथालय परिचर यांच्या आश्वासित प्रगती योजनेंतर्गत होणाऱ्या वेतन निश्चितीबाबत समितीचा अहवाल जाहीर करून त्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पाच दिवसांचा आठवडा लागू करण्यात यावा. अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी वैद्यकीय देयके कॅशलेस पद्धतीने लागू करण्यात यावीत. या सर्व मागण्यांचा समावेश संबंधित निवेदनात करण्यात आलेला असून, लवकरात लवकर सकारात्मक निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सेवक संयुक्त कृती समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

# कर्जमुक्तीच्या आश्वासनासाठी बच्चू कडूंची मेळघाटात महापदयात्रा

## जारिदा वनविभाग कार्यालयावर घेराव टाकणार

**अमरावती/का.प्र.**
अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरात आमदार बच्चू कडू यांनी आयोजित केलेल्या 'कर्जमुक्तीची आठवण व मेळघाट संघर्ष महापदयात्रे'चा आज चौथा दिवस असून, आज जारीदा येथे वनविभागाच्या कार्यालयाला घेराव घालण्यात येणार आहे. सरकारने जाहीर केलेल्या कर्जमुक्तीच्या आश्वासनाची आठवण करून देण्यासाठी तसेच मेळघाटातील प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ही पदयात्रा काढण्यात आली आहे.



**वनविभागाच्या कार्यालयात घेराव कशासाठी?**
रंगूबेली व नजिकच्या ५ गावांची पाणीपुरवठा योजना शासनाकडून मंजूर करण्यात आली मात्र वनविभागाच्या परवानगीने ती रखडली आहे.राणीगाव येथे जलजिवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना मंजूर झाली. या कामाकरिता सरकारने ३ कोटी रूपये खर्च केले आहेत. तिचे ९०% काम पुर्ण झाल्यानंतर वनविभागाच्या परवानगीसाठी अडथळा आला. वनविभागाने परवानगी नाकारल्याने उर्वरित १०% काम अपुर्ण आहे.

सुमारे २५० किलोमीटरचा पायी प्रवास करणाऱ्या या महापदयात्रेला सेमाडोह येथून प्रारंभ झाला. प्रवासादरम्यान बच्चू कडू विविध आदिवासी गावांना भेट देत असून, स्थानिक बांधवांशी संवाद साधून त्यांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेत आहेत. रोजगार, शिक्षण, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा, वीज, रस्ते आणि मोबाईल नेटवर्क अशा मूलभूत सुविधांचा गंभीर प्रश्न मेळघाटात अद्याप कायम असल्याचे त्यांनी नमूद केले.या सर्व समस्यांचा अभ्यास केल्यानंतर बहुतेक अडचणी वनविभागाच्या परवानग्यांशी संबंधित असल्याचा आरोप करत, जारीदा येथील वनविभागाच्या कार्यालयाला घेराव घालण्याचा निर्णय घेतल्याचे बच्चू कडू यांनी सांगितले. रस्ते बांधकाम, पाणीपुरवठ्यासाठी पाईपलाईन टाकणे, मोबाईल टॉवर उभारणे आदी विकासकामे वनविभागाच्या नियमांमुळे प्रलंबित असल्याचा त्यांचा दावा आहे. परिणामी, व्याघ्रप्रकल्प क्षेत्रातील गावांमध्ये राहणाऱ्या आदिवासी नागरिकांना मूलभूत हक्कांपासून वंचित राहावे लागत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.मेळघाट व्याघ्र प्रकल्पाची स्थापना १९७४ साली झाली. त्यानंतर या स्थानिकांच्या हक्कांचा प्रश्नही अधिक तीव्र झाल्याचे सांगितले जाते. व्याघ्रप्रकल्पातील गावांमध्ये वनविभागाच्या अटी व निर्बंधांमुळे दैनंदिन जीवनावर परिणाम होत असल्याचा आरोप स्थानिकांकडून वारंवार केला जात आहे.दरम्यान, ४ तारखेच्या सायंकाळी जारीदा येथील वनविभागाच्या कार्यालयात वनविभाग,विद्युत विभाग व जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. मात्र केवळ बैठक घेऊन प्रश्न सुटणार नाहीत, ठोस निर्णय झाला नाही तर रात्रभर तसेच पुढील दिवसभर वनविभागाच्या कार्यालयात घेराव सुरू ठेवण्यात येईल, असा इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे.या पार्श्वभूमीवर आजचा घेराव आणि होणारी बैठक याकडे मेळघाटवासीयांसह जिल्ह्यातील राजकीय व प्रशासकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

बोराट्याखेडा, रेहट्याखेडा या गावांमध्ये पाण्याच्या टाकी उभ्या आहेत. मात्र त्यामध्ये पाणी भरण्यासाठी २०० मीटर पाईपलाईन टाकण्यासाठी शासनाने परवानगी दिली नसल्याने हे काम पुर्ण असूनही लोकांना त्याचा फायदा झाला नाही. बच्चू कडूंच्या ईशार्यानंतर या कामाची परवानगी एका दिवसात देण्याचे वनविभागाने आश्वासीत केले आहे.डोमी या ठिकाणी जाण्यासाठी कुठलाही कच्चा अथवा पक्का रस्ता नाही. तिथे फक्त एक पायवाट आहे. येथील रस्ता वनविभागाच्या मंजूरी नसल्यामुळे मंजूर झाला नाही.

# डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या नावे शैक्षणिक संकुलाची उभारणी

## आ. सुलभा खोडके यांची मुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे मागणी

**अमरावती/का.प्र.**
येथील शैक्षणीक वर्तुळात प्रशासकीय सुलभता तसेच विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व जनतेच्या सोयीसाठी अमरावती शहरातील शिक्षण विभागाची सर्व कार्यालय एकाच छताखाली आणण्यासाठी अमरावतीच्या आ.सुलभा संजय खोडके यांनी पुढाकार घेतला आहे. यासाठी अमरावती येथील विभागीय शिक्षण उपसंचालक, कार्यालयाच्या परिसरात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाने नविन सुसज्ज प्रशासकीय इमारत साकारून शैक्षणिक संकुलाची उभारणी करण्याबाबत आ.सुलभा खोडके यांनी मुख्यमंत्री ना.देवेन्द्रजी फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे. तसेच राज्यविधिमंडळाच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनादरम्यान येत्या ६ मार्च रोजी सादर होणाऱ्या बजेट मध्ये मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस यांनी आपल्या अर्थसंकल्पिय भाषणात याबाबतची घोषणा करण्याची विनंती सुद्धा आ. सुलर्भा खोडके यांनी केली आहे.



अमरावती शहर हे विभागीय मुख्यालय असून विदर्भातील महत्वाचे शैक्षणीक केंद्र आहे. सद्यस्थितीत अमरावती शहरामध्ये शिक्षण विभागाची अनेक कार्यालये आहेत, ज्यामध्ये विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक),वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक), लेखाधिकारी शिक्षण विभाग, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षण विभाग कर्मचारी निवास स्थान शिक्षणाधिकारी (योजना), अशी कार्यालये ही अमरावती शहराच्या वेगवेगळ्या भागात कार्यरत आहेत. सदर कार्यालये विविध ठिकाणी कार्यरत असल्यामुळे त्यांच्यामध्ये योग्य समन्वय राखण्यामध्ये अडचणी येत आहेत. तसेच, कार्यालयांसाठी उपलब्ध असलेली सध्याची जागा अपुरी पडत असून, त्यामध्ये विविध सोयी सुविधांची देखील कमतरता आहे. सदर कार्यालयांच्या इमारती जुन्या असून त्यांची वेळोवेळी दुरूस्ती करावी लागत आहे.त्यामुळे, सध्या अस्तित्वात असलेल्या विभागीय शिक्षण उपसंचालक, कार्यालयाच्या परिसरात नविन सुसज्ज प्रशासकीय इमारत/शैक्षणिक संकुल निर्माण करुन त्या इमारतीमध्ये शिक्षण विभागाची सर्व कार्यालये एकाच छताखाली आणल्यासाठी आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी विशेषत्वाने पुढाकार घेतला असून शासनाकडे पाठपुरावा देखील चालविला आहे.

# माऊलीचोर जि.प.सर्कलमध्ये परिवर्तन अटळ

**नांदगाव खंडेश्वर-** सध्या महाराष्ट्रात सगळीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना गेल्या अनेक वर्षापासून रखडलेल्या अमरावती जिल्हा परिषदेच्या निवडणुका सुद्धा लवकरच लागण्याची शक्यता आहे.ह्याच अनुषंगाने भारतीय जनता पक्षाने निवडणुकांमध्ये शत प्रतिशत भाजपा चा नारा देत विजयाकरिता कंबर कसलेली आहे असे नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील माऊली चोर सर्कलच्या सातरगाव येथे पार पडलेल्या भाजपा च्या कार्यकर्ता व पदाधिकारी मेळाव्यातून स्पष्ट होते. मतदार संघांचे लोकप्रिय आमदार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेला हा मेळावा म्हणजे आगामी जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये माऊली चोर सर्कलमध्ये होणाऱ्या परिवर्तनाची नांदी असल्याचे बोलले जाते. कारण संपूर्ण धामणगाव विधानसभा क्षेत्रामधील जिल्हा परिषद सर्कल मधून पहिला मेळावा माऊली चोर येथे घेऊन आमदार प्रताप दादा अडसड यांनी आपल्या कार्यकर्त्यांमध्ये नवी ऊर्जा दिल्याचे बोलले जाते. गेली वर्षानुवर्षे माऊली चोर हा जिल्हा परिषद सर्कलवर ढेपे गटाचे वर्चस्व राहिल्याने एकाच गटाची मक्तेदारी आणि विकास प्रचंड मागे अश्या परिस्थितीमुळे स्थानिक नागरिकांमध्ये प्रचंड रोष आणि भविष्यातील परिवर्तना बद्दल उत्सुकता निर्माण झालेली आहे. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी सरकारच्या केंद्र सरकारच्या योजना तसेच मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या राज्य सरकारच्या योजना सर्कल मधील गोरगरीब, कष्टकरी,शेतकरी, शेतमजूर तसेच माता भगिनी यांच्याकडे पोहोचत असतानाच आमदार आमदार प्रताप दादा अडसड यांच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयाची विकासकामे सुद्धा सर्कल मध्ये होताना दिसत आहे. जिल्हा परिषदेच्या प्रशासक काळात झालेल्या सर्व विकास कामांचे श्रेय लाटण्याकरिता विविध गटाचे लोकप्रतिनिधी पुढे पुढे करत असले तरीसुद्धा ही सर्व विकासकामे भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून होत असल्याचा विश्वास प्रत्येक नागरिकांमध्ये आहे असे. त्याचाच प्रत्यय असा की गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेला सातरगाव रस्ताचे काम २२ कोटी रुपये निधी मंजूर करून हा रस्ता आज लोकांच्या सेवेत उपलब्ध करून दिल्याने लोकांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून येत आहेत. आणखी अनेक विकासकामे ह्या सर्कल मध्ये केल्या जाईल निधीची कुठेही कमतरता पडू देणार नाही फक्त उमेदवार कोण दिला जाईल हे न बघता 'कमळ'च आपला उमेदवार आणि कमळ च निशाणी हे डोळ्यासमोर ठेऊन भाजपा ला बहुमतांनी विजयी करण्याचे आव्हान आमदार प्रतापदादा अडसड व रावसाहेब रोठे यांनी उपस्थितांना केले.यावेळी तालुका अध्यक्ष पंकज मेटे, निकेत ठाकरे, रणजित खंडाळकर, राजेश पाठक, पाडुरंग काकडे, स्वराज ठाकरे, मनीष जाधव, सरपंच काकडे ताई, गजानन काकडे, अरुणभाऊ पवार, विशाल मेश्राम, संजनाताई चौधरी, अनंतराव चौधरी, निखिल चोरे, दिपक तिखिले, पारवे, जगदीश नरखेडकर, सुभाष मुळे आदी उपस्थित होते.



पदाधिकारी व कार्यकर्ता मेळाव्यात भाजपचा निर्धार

## अविस्मरणीय व्यक्तीमत्व

# उमरलालजी केडिया

**बाबुजीचे ३६वे पुण्यस्मरणानिमित्त...!**



**स्व.** उमरलालजी केडिया उर्फ बाबुजी हे अमरावतीच्या पंचक्रोशीत राजकारणातले समाजकारणातले मोठे नांव.एक दरारा,धाक होता बाबुजींचा!कोणतीही सार्वत्रिक निवडणुक असो, बाबुजींची मदत सर्वांनाच लागत होती.

सन १९५२ ते १९७२ तब्बल वीस वर्षे अमरावती नगर पालिकेवर बाबुजींचे साम्राज्य होते. १९७२ ला जवळच्याच मित्रांनी बंडखोरी केली व बाबुजींच्या सत्तेला तडा गेला. त्यानंतर देखील बाबूजींचा रुबाब व राजकारणातील प्राबल्य वाढतच गेला. बाबुजी नगर पालिकेचे अध्यक्ष असतांना नगर पालिकेच्या प्रांगणात खुर्च्या टाकून बसत व लोकांची कामे तत्परतेने करीत असत. त्यामुळे बाबुजींची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढतच होती.अनेक कार्यकर्ते, नेते, आमदार, खासदार त्यांनी घडविले. स्व. काकासाहेब नवाथे, स्व. डॉ. देविसिंहजी शेखावत,स्व.बबनराव मेटकर, यांना आमदार म्हणून निवडून आणण्यात बाबूजींचा सिंहाचा वाटा होता.

स्व. नानासाहेब बोंडे १९७७ साली प्रचंड मतांनी लोकसभेला विजयी झाले. ते बाबुजींच्या संघटन व राजकीय कौशल्याने. स्व. के. जी. उर्फ बाबासाहेब देशमुख माजी खासदार हे बाबूजींना खुप मानत असे त्याकाळी के.जी. व बाबूजी एकत्र राहून निवडणुक जिंकायचे, काँग्रेसचे वरीष्ठ मंडळी स्व. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, वसंतराव साठे, बॅरिस्टर अंतुले साहेब, उमाशंकरजी दिक्षित,शंकरदयाल शर्मा, ही सर्व मंडळी बाबूजींचा आदर करीत असत. थेट संपर्क होता या बड्या मंडळींशी बाबूजींचा. मी बाबूजींचा अत्यंत लहान कार्यकर्ता होतो. माझे आजोबा बाबूजींचे मित्र होते तर माझे वडील स्व. सुधाकर वाघ हे बाबूजींचे अनुयायी होते. १९७८ पासून माझा व्यक्तीगत बाबुजींशी संपर्क आला. त्यावेळी आमची आर्थिक स्थिती खालवलेली होती. हाताला कामधंदा नव्हता यांचे बाबूंजींना खुप वाईट वाटायचे, ते म्हणायचे संजय; तुमच्या कुटूंबासाठी मी काहीच करू शकलो नाही. माझ्याकडे सत्ता नाही, कोणतेही पद नाही.

माझ्यावर बाबुजींचे खुप प्रेम होते. माझ्यासाठी काहीतरी करावे हे त्यांना सतत वाटत असे. सन १९८१ साली कापूस पणन संघात लिपीकांच्या जागा निघाल्या, मला बाबूजींनी अर्ज करायला सांगितले. एवढेच नाही तर त्यांनी कॉटन फेडरेशनचे त्यावेळचे डायरेक्टर यवतमाळचे स्व.फुलचंदजी अग्रवाल यांचे कडे मला पाठवले. फोन केला, माझी ऑर्डर निघाली पण माझे दुर्दैव, त्या ऑर्डरला स्टे आला. व सर्व भरती रद्द झाली. लग्न समारंभ, नामकरण समारंभ असो वा दुःखाचे प्रसंग असो बाबुजी प्रत्येक प्रसंग हा आपल्या घरचा समजून स्वतः पुढाकार घेवून जातीने गेटवर उभे राहून प्रत्येक कार्य पार पाडत असत. बाबुजींची ही गोष्ट प्रत्येक व्यक्तीच्या मनाला भावत होती, त्यामुळे एक वेगळाच दरारा व आदर, धाक बाबूजींचा होता.बाबुजींकडून मला खुप काही शिकायला मिळाले. राजकारणातले धडे ,संघटन, या बाबी अत्यंत बारकाईने त्यांनी मला शिकवल्या. मला बाबुजींमुळेच राजकारणात काम करायची संधी मिळाली.शहरातल्या प्रत्येक वार्डात, मोहोल्ल्यात बाबुजींचे समर्थक अनुयायी होते. कार्यकर्त्यांची मोठी फौज त्यांचेकडे होती. एखादा रोज भेटणारा कार्यकर्ता जर दिसला नाही तर लगेच बाबुजीं त्यांचे घरी कोणाला पाठवून चौकशी करीत असे. तो अडचणीत आहे काय? आजारी आहे काय?हे समजल्या बरोबर ते स्वतः जाऊन त्याची विचारपूस करत व मदत ही करत असे. यामुळेच शहरातील सर्वच जाती धर्मामध्ये बाबुजींची लोकप्रियता होती.

बाबुजीं हे मारवाडी समाजाचे हिंदी भाषिक असूनही त्यांनी बहुजन समाजावर खुप प्रेम केले. मुस्लीम समुदायाला बाबुजी आपलेसे वाटत. स्व. दिगंबरबुवा हिरपूरकर, शंकरआप्पा गदगकर, गणुभाऊ नवाथे, बाबासाहेब शिरभाते, रघुनाथ भोवते, नरहरी पिठे गुरूजी, राधेलालजी जयस्वाल, अमृतभाई जोशी, बिहारीलालजी अग्रवाल, तिवसा जिनवाले राठीजी, शिवचंदराय झुनझुनवाला, अनंतराव टाले, बंडोपंत गोखले, प्रभाकर मारुळकर, नारायणदास बियाणी,वसंतराव गुल्हाने,विठ्ठल मैंदड, प्रभाकरराव चोरे, शांताराम सरोदे, डॉ. मदन आचलिया, रमेश लढ्ढा, राजेंद्रजी नावंदर, देवकिसन शर्मा, रावसाहेब इंगोले,बैजनाथजी केशरवाणी, दौलतभाई देसाई, देवराजजी बोथरा, गोकुल मास्टर बसेरिया, रत्नलाल दिक्षित, रत्नशंकर तिवारी, अमृतलालजी गुप्ता, साहेबराव पाटील इंगोले,जुगलकिशोर अग्रवाल गुरूजी, कलावतीबाई लुंगे, नलिनीबाई हाडके, लिलाबाई लवंगे,प्रेमताई डहाके,सोबतच अब्दुल सत्तार बाबु, सरदारभाई, कैय्यामुद्दीन ठेकेदार, दादुभाई मन्सुरी, मुस्तफा पहेलवान इ.अनेक मुस्लीम मंडळी सुद्धा बाबुजींसोबत एकनिष्ठ होती. एका फोनवर किंवा निरोपावर ही सगळी मंडळी हजर होत असे.

परंतु आजचे राजकारण अत्यंत घाणेरडे व खालच्या स्तरावर गेले आहे, पैसा व गुंडागर्दी यालाच जास्त महत्व आले आहे, निष्ठावान कार्यकर्त्यांची व पक्षाची कोणालाही किंमत राहिली नाही. त्यामुळेच आज काँग्रेस पक्ष सुध्दा रसातळाला गेला आहे. असा महान लोकनेता अचानक पणे ५ मार्च १९९० रोजी हे जग सोडून गेला.आम्हांला पोरका करून गेला. कायमचा.

बाबुजींच्या निधना नंतर १९९४ साली डॉ. देविसिंहजी शेखावत हे शहर काँग्रेसचे अध्यक्ष होते. त्यांनी मला सहज विचारले बाबुजींचे ऑफिस आजकाल बंद दिसते, तेथे शहर काँग्रेसचे कार्यालय असावे असे मला मनापासून वाटते. या जागेमध्ये सामर्थ्य आहे, शक्ती आहे, विजय आहे, येथून अनेक खासदार, आमदार, निवडून आले. मी सुद्धा १९८५ साली याच कार्यालयातून प्रचार केला व निवडून आलो. ही जागा काँग्रेस कार्यालयासाठी मिळावी असा तू प्रयत्न कर. आणि मी त्याच दिवशी कामाला लागलो. बाबुजींचे सहकारी स्व.हिरपूरकर गुरुज, डॉ. मदन आचलिया, राजेंद्रजी नावंदर, बाबासाहेब शिरभाते, गदगकरआप्पा, या सर्वांना भेटलो व विनंती केली. या मंडळींना खुप आनंद झाला. कारण स्व. बाबुजींच्या स्मृती व आठवणींना पुन्हा उजाळा मिळणार होता.पुढे लगेचच दोन वर्षात डॉ. देविसिंहजी शेखावत यांनी पुढाकार घेवून महानगर पालिकेत ठराव घेतला, बाबुजींचा पुतळा उभारण्याचा. सुंदर जागा महानगर पालिकेने उपलब्ध करून दिली, व पिल्लर उभारून फ्लॅटफॉर्म तयार करून दिला. पुतळयाचा खर्च केडिया परिवाराने केला. तत्कालीन मुख्यमंत्री मा. विलासराव देशमुख यांचे शुभहस्ते मा. प्रतिभाताई पाटील, मा. वसुधाताई देशमुख, डॉ. सुनिल देशमुख, यांच्या प्रमुख उपस्थितीत या पुतळ्याचा भव्यदिव्य अनावरण समारंभ पार पडला.

महानगरपालिकेच्या सभागृहात सुद्धा स्व. बाबुजींचे तैलचित्र लावण्यात आले. त्यामुळे आजही बाबुजींच्या स्मृती कायम तेवत आहेत. हे सर्व डॉ. देविसिंहजी शेखावत यांच्या पुढाकाराने व प्रयत्नाने पार पडले. ही माझ्यासाठी मोठी बाब आहे.आज उरल्या फक्त आठवणी. बाबुजी आमच्या कायम स्मरणात आहेत, बाबुजी सारखा नेता झाला नाही, होणे नाही, हे सुद्धा तितकेच खरे आहे, त्यांना विनम्र श्रद्धांजली

**संजय सुधाकर वाघ**
उपाध्यक्ष,शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अमरावती.
मो. ९४२२१५५६२१

# आरटीओ रस्त्यावर खड्ड्यांचा कहर

# दोन विभागांच्या वादात नागरिकांचे हाल

## युवासेनेचा इशारा : तातडीने दुरुस्ती न झाल्यास आक्रमक आंदोलन



**अकोला :** शहरातील प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे जाणारा मुख्य रस्ता अक्षरशः खड्ड्यांनी विदीर्ण झाला असून दोन विभागांतील समन्वयाअभावी दुरुस्ती रखडल्याचा आरोप युवासेनेने केला आहे. या प्रकारामुळे दररोज हजारो नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

वाहन नोंदणी, परवाना, नूतनीकरण, ट्रान्स्फर, फिटनेस आदी अत्यावश्यक कामांसाठी सर्वसामान्य नागरिक, व्यापारी, शेतकरी, विद्यार्थी मोठ्या संख्येने आरटीओ कार्यालयात ये-जा करतात. मात्र कार्यालयाकडे जाणारा रस्ता पूर्णपणे खड्डेमय झाला आहे. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने रस्त्याची वास्तविक अवस्था लक्षात येत नाही आणि अपघातांचा धोका वाढतो. अनेक वाहनांचे नुकसान होत असून दुचाकीस्वारांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला व दिव्यांगांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत असल्याने संताप व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर युवासेना जिल्हाप्रमुख डॉ. अभिजित मुळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संघटक कृष्णाल भांभुरकर यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने रिजनल वर्कशॉपचे कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) व्ही. एल. वाराडे यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन दिले. सदर रस्त्याची तात्काळ पाहणी करून कायमस्वरूपी व दर्जेदार दुरुस्ती करावी, तसेच तत्पूर्वी खड्डे बुजविणे व इशारा फलक लावणे आदी तात्पुरत्या उपाययोजना कराव्यात, अशी ठोस मागणी करण्यात आली.

विशेष म्हणजे आरटीओ आणि रिजनल वर्कशॉप या दोन विभागांतील जबाबदारी ढकलण्याच्या भूमिकेमुळे काम प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. दोन विभागांच्या वादात सामान्य जनतेचे हाल होत असून प्रशासनाने जबाबदारी निश्चित करून तातडीने काम सुरू करणे गरजेचे असल्याचे युवासेनेने स्पष्ट केले. यावेळी सौरभ राठोड, सोमेश सरप, युग मंत्री, सौम्य शर्मा, अभिराज मोहोड, कृष्णा देशमुख यांच्यासह युवासैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> ‘नागरिकांच्या सुरक्षिततेशी तडजोड सहन केली जाणार नाही. तातडीने दुरुस्तीचे काम सुरू न झाल्यास जनतेच्या सहकार्याने तीव्र व आक्रमक आंदोलन उभारले जाईल’
>
> **डॉ. अभिजित मुळे पाटील**
> जिल्हाप्रमुख, युवासेना



# मुरूमाचे शेकडो ब्रास उत्खनन

## गावंडगाव परिसरात अवैध गौणखनिज वाहतुकीचा धुमाकूळ

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील गावंडगाव परिसर पुन्हा एकदा गौण खनिज माफियांच्या कारवायांनी चर्चेत आला आहे. शेत सपाटीकरणाचा बनाव करून जेसीबीच्या सहाय्याने रात्रीच्या अंधारात शेकडो ब्रास मुरूमाचे उत्खनन करून आठ ते दहा ट्रॅक्टरमधून अवैध वाहतूक करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार ४ मार्च रोजी उघडकीस आला. विशेष म्हणजे, या मुरूमाचा वापर सुरू असलेल्या पहाडसिंगी ते मळसुर रस्त्याच्या डांबरीकरण कामासाठी करण्यात आल्याचा संशय व्यक्त होत आहे.

यापूर्वी अवघ्या दोन दिवसांपूर्वी गावंडगाव–पहाडसिंगी परिसरातील विहिरींमधील खडकांची शेकडो ब्रास अवैध वाहतूक झाल्याचे प्रकरण समोर आले होते. त्यानंतरही महसूल विभागाने वेळीच कारवाई न केल्याने गौण खनिज माफियांचे मनोबल वाढल्याची चर्चा आहे.

याबाबत तहसीलदार राहुल वानखेडे यांनी सांगितले, ‘संबंधित जागेचा पंचनामा करण्याबाबत मंडळ अधिकारी व तलाठी यांना सूचना दिल्या आहेत. गुरुवारपर्यंत अहवाल प्राप्त होईल. त्यानंतर नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.’

### चार दिवसांत लाखोंचा महसूल बुडाला?

### पहाडसिंगी-मळसुर रस्त्याच्या कामासाठी वापराचा संशय; महसूल विभागावर प्रश्नचिन्ह



स्थानिक सूत्रांच्या माहितीनुसार, एका महसूल अधिकाऱ्याच्या ‘आशीर्वादा’मुळे अवघ्या चार दिवसांत खडक व मुरूमाचे शेकडो ब्रास उत्खनन करून वाहतूक करण्यात आली. या प्रकारामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडाल्याचे चित्र आहे. रात्रीच्या वेळी सुरू असलेल्या या कारवायांमुळे परिसरात ट्रॅक्टरची वर्दळ वाढली होती; मात्र संबंधित यंत्रणा मात्र मौन बाळगत असल्याची टीका होत आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांनी दखल घ्यावी

गावंडगाव परिसरात सुरू असलेल्या गौण खनिज उत्खननाच्या मालिकेमुळे नागरिकांत संताप व्यक्त होत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन उत्खनन व अवैध वाहतुकीत सहभागी असलेल्या माफिया, कंत्राटदार आणि संबंधित वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

### तहसीलदारांच्या आदेशाची पायमल्ली?

महसूल विभागाच्या प्रत्येक बैठकीत तहसीलदार राहुल वानखेडे हे मंडळ अधिकारी व तलाठी यांना गौण खनिज उत्खनन रोखण्याबाबत सक्त निर्देश देत असतात. मात्र प्रत्यक्षात आलेगाव मंडळातील गावंडगाव परिसर उत्खनन व अवैध वाहतुकीचा अड्डा बनल्याचे चित्र आहे. शासनाच्या निर्देशानुसार संबंधित क्षेत्रात गौण खनिजांचे उत्खनन अथवा अवैध वाहतूक आढळल्यास मंडळ अधिकारी व तलाठी जबाबदार राहणार आहेत. तरीही आदेशांची अंमलबजावणी होत नसल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# आज अशोक वाटिका येथे कलावंत मेळावा



■ प्रतिनिधी | अकोला ■

समता कला मंच सांस्कृतिक साहित्यिक परिषदच्या वतीने आज गुरुवार दिनांक ५ मार्च रोजी दुपारी १२ वाजता अशोक वाटिका येथे वृद्ध साहित्यिक व कलावंत मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हभप विठ्ठल महाराज खापरकर, हभप मुरलीधर लोनागरे महाराज, काकड महाराज गावंडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात शाहीर नागसेन सावदेकर तथा माजी सरपंच डी जे वानखडे यांचा भव्य सत्कार करण्यात येणार आहे. या वृद्ध साहित्यिक व कलावंत मेळाव्यात कलावंतांच्या पेन्शन व अन्य समस्यावर चर्चा करण्यात येऊन आगामी कार्यक्रम तयार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास जिल्ह्यातील वृद्ध कलावंत व साहित्यिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कला मंचाचे मिलिंद बनसोड यांनी केले आहे.

## जाहीर नोटीस

### विद्यमान दिवाणी न्यायालय (क. स्तर), तेल्हारा यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. ८६/२०२६ प्रोसेस नं. २७४/२०२६
चौ.ता. ०६/०४/२०२६ दिनांक : ०४/०३/२०२६

**अर्जदार :** १. श्रावण आकाराम तायडे वय ६० वर्षे, धंदा-काही नाही २. ललीता सुभाष तायडे वय ४६ वर्षे, धंदा-घरकाम ३. कमलेश सुभाष तायडे वय २८ वर्षे, धंदा-शिक्षण ४. शुभांगी सुभाष तायडे वय २७ वर्षे, धंदा-शिक्षण अर्जदार क्र. १ रा. बॅरेक नं. १२९२, बिहाइन्ड पुंज पंचायत हॉल, सेक्शन- ३१, ओ.टी. सेक्शन उल्हासनगर ४ ठाणे, ता. जि. ठाणे अर्जदार क २ ते ४ रा. बरेक नं. १२९२/२ ओ.टी. सेक्शन, व्ही.टी. सि. उल्हासनगर ठाणे, ता.जि. ठाणे महाराष्ट्र

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ४ नुसार मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तेल्हारा यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदार क. १ चे आई वडील मयत नामे आकाराम कडतुजी तायडे व गिताबाई आकाराम तायडे हे अनुक्रमे दि.. ०८/०९/२०१३ व १७/०९/२०२० रोजी उल्हासनगर, ठाणे ता. जि. ठाणे येथे मरण पावले व सुभाष आकाराम तायडे हा दिनांक १७/०६/२०१० रोजी मयत झालेला आहे त्यामुळे अर्जदार हेच कायदेशीर वारस असून इतर कोणतेही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुद्ध इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक ०६/०४/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०४/०३/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर, तेल्हारा

## जाहीर सुचना

सर्व जनतेस व वित्तीय संस्थेस ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, शेख जबक शेख मुनाफ कुरेशी रा. माळीपेठ, मेहकर जि. बुलढाणा, यांनी खालील वर्णनाची मालमत्ता आय. सि. आय. सि. आय. होम फायनान्स कंपनी लि. येथे गहाण ठेवुन कर्ज मिळण्याकरिता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :** मौजे मेहकर - १ न. प., ता. मेहकर जि. बुलढाणा च्या हद्दीतील शेत स. क्र. १५ चे वि. उप-विभागीय अधिकारी, मेहकर यांच्या फाईल वरील मह. प्र. क्र. एन. ए.ए.- ३४ / मेहकर/१०/२०११-१२ आदेश दि. २२/०४/२०१३ नुसार पारित ले-आउट नकाशातील प्लॉट ४० ज्याचे क्षेत्रफळ १७२.५० चौ. मी. असून, ज्यास चतुर्सिमा : पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : रस्ता, ऊत्तरेस : वेगळे ले-आउट व दक्षिणेस : प्लॉट क्र. ४१.

येणे प्रमाणे वरील मालमत्तेचे दस्त क्र. ४३८५ दि १६/०९/२०२१ रोजीचे मुळ खरेदीखत जे मालमत्तेचे साखळी दस्त आहे ते हरविले/गहाळ झाले आहे. त्याकरीता पोलीस स्टेशन मेहकर येथे दि. २६/०२/२०२६ रोजी तक्रार दाखल केली आहे.

त्याअर्थी जर वरील मालमत्तेवर कोणाचे काही कर्ज, गहाण, बोजा, हक्क, अधिकार अथवा ताबा असल्यास त्यांनी सदर सुचना प्रकाशीत झाल्या पासुन ७ (सात) दिवसात खालील नमुद पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानीशी आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणाचाही कसल्याही स्वरुपाचा आक्षेप नाही असे समजुन आय. सि. आय. सि. आय. होम फायनान्स कंपनी लि. हे वरील मालमत्ता गहाण ठेवुन कर्जाची रक्कम वितरीत करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत वा ऊजर चालणार नाही याची नोंद घ्यावी.

दि. ०४/०३/२०२६

**अधिवक्ताः संजीव रा. बोचरे,**
संतोष नगर, आगाशे गुरुकुल,
मलकापुर रोड, अकोला - ४४४००४
मोबा. ९८९०४४४८२४

## जाहीर नोटीस

### वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. २७२/२०२६ प्रोसेस नं. २८४५/२०२६
चौ.ता. ०४/०४/२०२६ दिनांक : ०२/०३/२०२६

**अर्जदार :** १. मनकर्णा देविदास गावंडे २. प्रमोद देविदास गावंडे अर्जदार क्र. १ व २ रा. विठ्ठल मंदिरा जवळ, न्यु खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला. ३. सौ. संगिता राजेश बहाकर रा. कानशिवणी, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : देविदास विठ्ठल गावंडे
**पत्ता :-** रा. विठ्ठल मंदिराजवळ, न्यु खेतान नगर, खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत देविदास विठ्ठल गावंडे यांचे दि. २१/०८/२०२३ रोजी श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल, अमरावती जि. अमरावती येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. २२६/२०२६ प्रोसेस नं. २२८४/२०२६
चौ.ता. २७/०३/२०२६ दिनांक : १७/०२/२०२६

**अर्जदार :** १. सौ. जयश्री गणेश दांडगे रा. अंबिका माता मंदिर जवळ, गजानन नगर गल्ली नं. २, डाबकी रोड, अकोला. २. कल्याणी सागर अकोटकर (कल्याणी गणेश दांडगे) रा. माळीपूरा, जुने शहर, बडनेरा, अमदपूर, अमरावती. ३. कार्तिक गणेश दांडगे रा. अंबिका माता मंदिर जवळ, गजानन नगर गल्ली नं. २ डाबकी रोड, अकोला, ४. चंचल अभिजीत खानझोडे (चंचल गणेश दांडगे) रा. अंबिका माता मंदिर जवळ, गजानन नगर गल्ली नं. २, डाबकी रोड, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : श्री. गणेशराव नामदेवराव दांडगे
**पत्ता :-** रा. अंबिका माता मंदिर जवळ, गजानन नगर गल्ली नं. २, डाबकी रोड, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्री. गणेशराव नामदेवराव दांडगे यांचे दि. १८/०८/२०१३ रोजी अंबिका माता मंदिर जवळ, गजानन नगर गल्ली नं. २, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### दिवाणी न्यायालय क स्तर बाळापुर
### दयानंद मारुती वाघमारे यांचे न्यायालयात
### सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर बाळापुर, बाळापुर, अकोला.

दिवाणी किरकोळ अर्ज/७०/२०२६
शेषराव शामराव मानकर, वि. कोणीही नाही
पुढिल तारिख : २७-०४-२०२६

**अर्जदार :** १. शेषराव शामराव मानकर वय अं ६५वर्ष धंदा शेती २. प्रकाश शामराव मानकर (मयत) २ (अ). श्रीमती शारदा प्रकाश मानकर वय अं५५वर्ष धंदा घरकाम २ (ब). श्रुती प्रकाश मानकर वय अं३० वर्ष धंदा शिक्षण २(क). आदित्य प्रकाश मानकर वयं अं२५वर्ष धंदा शिक्षण ३. मनोहर शामराव मानकर वय अं५६वर्ष धंदा खाजगी नोकरी ४. सुनील शामराव मानकर वय अं४८वर्ष धंदा शेती सर्व रा. जागृत चौक, वाडेगांव, ता.बाळापूर जि.अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केला आहे. मयत अन्नपुर्णा शामराव मानकर ही दिनांक २८.०८.२०२५ रोजी मरण पावली. तसेच मयत प्रकाश शामराव मानकर हे दिनांक २७. ०१.२०२६ रोजी मौजे वाडेगांव ता.बाळापूर जि. अकोला येथे मरण पावले. वरील नमूद अर्जदार यांना मयत अन्नपुर्णा शामराव मानकर व मयत प्रकाश शामराव मानकर यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय व ईतर लाभाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक २७.०४.२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०४.०३.२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय, क स्तर, बाळापूर

## Change In Name

I have change
my From
**MUKHTAR MOHAMMAD SHAIKH NABI**
-TO-
**SHAIKH MUKHTAR SHAIKH NABI**
My Residential Address is Gulzar pura Mahavir ki chowl old city Akola 444002

## Change In Name

I Have change
my name From
**MEHMOODA BANO MAJEED KHAN**
-TO-
**MEHMUDA BANO SHAIKH MUKHTAR**
My Residential Address is Mahavir ki chal Gulzar pura Dabki road akola 444002

जनमाध्यम न्यूज अँड पब्लिकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसूल कॉलनी, एसटी स्टॅन्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.
संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ९४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन्स क्र. AKL/HO/03/2004
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन- ९८२३०१६३००,९४२२९५६२६६
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला
## ई-निविदा सुचना ३७/ २०२५-२०२६

**जावक क्रमांक १५५३ / ईनिसु- ३७ निलि / २०२६ / दिनांक २.३.२०२६**

email.akola.ee@mahapwd.gov.in Phone No 0724-2435195

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला या महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामांकरिता ब-१ नमुन्यातील काम क्र. १ ते ४ निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन मागविण्यात येत आहे) निविदेतील अटी व शर्ती यांची पूर्तता करतील, असे सक्षम कंत्राटदार तसेच काम क्र. १ अंतरराष्ट्रीय कंपनी यांची उप कंपनी भारतीय असल्यास निविदे स्पर्धे मध्ये भाग घेवू शकेल. निविदा स्पर्धेमध्ये भाग घेऊ शकतील. कंत्राटदारांकडून व १ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे अटी व शर्तीच्या अधीन राहून निविदेमध्ये सहभाग नोंदवू शकतील. ई-निविदा संकेत स्थळ https://www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्रं. | कामाचे नांव | कामाची किंमत (रुपये) | संवर्ग |
|---|---|---|---|
| १ | अकोला जिल्हयातील बार्शिटाकळी येथील श्री. खोलेश्वर संस्थान येथे आवार भिंत, सभागृह, प्रसाधन गृह तसेच पेव्हर ब्लॉकचे बांधकाम करणे | ३४९३६५२५ | पात्र |
| २ | अकोला जिल्हयातील सस्ती ता. पातूर येथे वंदनीय बाळासाहेब ठाकरे शेतकरी भवन बांधकाम करणे | १४९३२४८८ | पात्र |
| ३ | अकोला जिल्हयातील सस्ती ता. पातूर येथे सभागृह बांधकाम करणे | ३०१२६२० | पात्र |
| ४ | अकोला येथे वर्ग-१ अधिकारी यांचे बंगल्याचे बळकटीकरण करणे | ४०९९४७५ | मकासस |

**अटी व शर्ती -**

१. सर्व पात्र / इच्छुक निविदाकारांनी निविदा डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या https://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
२- ई-निविदा काम क्र. १ ते ४ कामांची ई-निविदा दिनांक ०५.०३.२०२६ रोजी १०.०० पासून दिनांक १२.०३.२०२६ रोजी १८.०० वाजे पर्यंत डाऊनलोड व हॅश सबमीशन करता येतील. ई-निविदा कानांची ई-निविदा उघडण्याचा दिनांक १६.०३.२०२६ ( पुढील ई-निविदा विषयक कार्यक्रम ऑनलाईन प्रमाणे )
३. वरील काम क्रं. १ कामाची निविदा पूर्व बैठक दिनांक ०६/०३/२०२६ वेळ १२.०० वा. मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती येथे आयोजित करण्यात येईल.
४. वरील काम क्रं. २ कामाची निविदा पूर्व बैठक दिनांक ०६/०३/२०२६ वेळ १२.०० वा. मा. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला येथे आयोजित करण्यात येईल.
५. वरील काम क्र. ०१ व ०२ कामांची ई-निविदा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला येथे उघडण्यात येतील
६. वरील काम क्र. ०३ व ०४ कामांची ई-निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला येथे उघडण्यात येतील.
७. खालील संकेत स्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध राहील. https://www.mahatenders.gov.in
८. इंतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये उपलब्ध आहेत. कोणत्याही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न सांगता अस्विकृत करण्याचे सर्व अधिकार सक्षम प्राधिकरणाकडे राखून ठेवण्यात आले आहेत.
९. वरील कामांसाठी कंत्राटदाराने त्यांचे अभियंत्यासह मोक्याची जागेची पाहणी करून ई- निविदा सादर करावी व कोणतेही अतिरिक्त दावे स्विकारल्य जाणार नाही.
१०. ऑनलाईन वेळापत्रक लागू व अंतिम राहील.

**(प्रसाद पाटील)**
कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग अकोला

## जाहीर नोटीस / प्रगटन

सर्व लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार आनंद मोहनलाल चांडक, रा. तोष्णीवाल लेआऊट, अकोला-मुर्तिजापुर रोड जवळ, अकोला, ता. जि. अकोला यांच्या मालकीची मिळकत मौजे उमरी प्र. ता. जि. मु. दु. निबंधक दुय्यम निबंधक नगरपरिषद अकोला येथील शेत सर्व्हे नं. २७ चे जमीनीचे उपविभागीय अधिकारी अकोला यांच्या कार्यालयातील महसुल प्रकरण क्र. ६/५९/६९-७० आदेश तारीख १८.०९.१९७८ व मुळ महसुल प्रकरण क्र. ८/२/६०-६१ आदेश तारीख २७.१२.१९६८ या आदेशाप्रमाणे पास झालेल्या लेआऊट मधील प्लॉट नं. १८ (सध्या नझुल शिट नं. ७९, ८०, नझुल प्लॉट नं. १/१८) एकूण क्षेत्रफळ ३०५.४१ चौ. मिटर म्हणजे ३२८७.४३ चौ. फुट व त्यावर आरसीसी बांधकाम केलेले घर ज्याचा कायदेशिर मालक असून यातील वरील नमुद असलेली मालमत्तेतील निम्मा प्लॉट ज्याचे मोजमाप १५२.७१ चौ. मिटर म्हणजे १६४३.९ चौ. फुट जागा ही माझे पक्षकाराला वारसाहक्काने मिळालेली आहे व हा निम्मा प्लॉट चे मालक हे माझे पक्षकाराचे वडील मोहनलाल प्रेमराज चांडक हे होते. माझ्या पक्षकाराच्या वडीलांनी सदर मिळकत २००३ साली नरेंद्र विठ्ठलदास राठी यांच्याकडुन दि. १६.१०.२००३ रोजी रजी. खरेदीखत क. ३३८०/२००३ व्दारे विकत घेतलेली होती. माझे पक्षकाराचे वडील मोहनलाल प्रेमराज चांडक यांचा मृत्यू दि. ०९.०६.२००४ रोजी झाला होता व त्यांच्यानंतर ही मिळकत माझे पक्षकाराला वारसाहक्काने कायदेशिररित्या मिळालेली आहे.

माझे पक्षकाराच्या वडीलांनी ही मिळकत विकत घेत असतांना नरेंद्र विठ्ठलदास राठी यांनी सिमा मोहनलाल चांडक यांचेकडून घेतलेले सदरहू निम्मा प्लॉट मिळकतीचे मुळ खरेदीखत क. अकन- ९७६/१९८८ दि. २८.०३.१९८८ त्यांच्या ताब्यात घेतलेले होते. सदरहू खरेदीखत क. अकन- ९७६ / १९८८ दि. २८.०३.१९८८ चे मुळ खरेदीखत हे माझे पक्षकाराकडून गहाळ झालेले आहे.

सदरचे मुळ दस्त हरविल्याचे, गहाळ झाल्याचे माझ्या पक्षकाराच्या लक्षात आले आहे. सदर मुळ दस्तऐवज गहाळ झाल्याने व सापळत नसल्याने त्याबाबत माझे पक्षकाराने मा. पोलीस निरिक्षक साहेब सिव्हील लाईन, पोलीस स्टेशन, अकोला येथे दि. ०४.०३.२०२६ रोजी तकार केली आहे. येणे अंतर्गत येणारी मिळकत माझ्या पक्षकाराची असून त्याबाबत कुठलाही व्यवहार माझ्या पक्षकाराने केलेला नसुन तसेच वर नमुद मुळ दस्तऐवज कोणालाही सापडल्यास या जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३ (तीन) दिवसाच्या आंत खालील दिलेल्या पत्यावर प्रत्यक्ष किंवा फोन करून कळवावे. सदर दस्ताच्या आधारे केलेला कोणताही व्यवहार आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही.

अकोला
दि. ०४/०४/२०२५

**पक्षकाराकरीता अधिवक्ता**
**(ॲड. मृणाल व्हि. कोहाडे)**
‘गुरूपुष्प’, न्यु तापडीया नगर, श्री कॉलनी,
शांती निकेतन शाळेजवळ, अकोला
मो. नं. ९९७०६५३६६६

## जाहीर नोटीस

### वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १४८५/२०२३ प्रोसेस नं. २५७६/२०२६
चौ.ता. १७/०३/२०२६ दिनांक : २३/०२/२०२६

**अर्जदार :** १. शिल्पा कैलाशराव नहाटे २. आर्यन कैलाशराव नहाटे ३. कार्तिका कैलाशराव नहाटे तिघेही रा. श्रीराम चौक, रेणुका नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : कैलाश बाबाराव नहाटे
**पत्ता :-** रा. श्रीराम चौक, रेणुका नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी भारतीय उत्तराधिकार अधिनियमाचे कलम ३७२ अन्वये उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे. त्यांनी अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत कैलाश बाबाराव नहाटे यांचे दि. २८/०९/२०२२ रोजी अकोला येथे निधन झाले.

अर्जामध्ये पूढे असेही नमूद आहे की सदरहू मयत कैलाश बाबाराव नहाटे यांचे नावे अकोला आणि वाशिम जिल्हा मध्यवर्ती क्रेडिट को ऑपरेटिव्ह बँक अकोला येथे पी.पी.एफ खाते उघडले ज्याचा खाते क्रमांक १३४ आणि ९० त्यापैकी खाते क्रमांक १३४ दिनांक २२.०९.१९९२ रोजी उघडण्यात आले आणि .रू ४५,०००/- रक्कम जमा करण्यात आली आणि दोन्ही खाती एकाच वेळी उघडण्यात आली आणि रक्कम जमा करण्यात आली.

अ. खाते क्रमांक १३४ पीपीएफ जमा केल्याची तारीख दिनांक २२.०९.१९९२ रक्कम ४५,०००/- लाभांसह ब. खाते क्रमांक ९० पीपीएफ जमा केल्याची तारीख दिनांक २७.११.१९९१ रक्कम ४५,०००/- लाभांसह क. खाते यवतमाळ अर्बन को. ऑपरेटिव्ह बँक लि. यवतमाळ शाखा अकोला. बचत खाते क्रमांक ०७२४२४२६२७८ ग्राहक आयडी २३०२३००१९८२ कैलास बाबाराव नहाटे यांच्या नावे रू. ७०,१३६/- ड. बचत खाते क्रमांक अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अकोला शाखा राजराजेश्वर जुने शहर अकोला खाते क्रमांक ००४०११ २०१०००३७७० कैलास बाबाराव नहाटे यांच्या १,००,१४०/– जमा आहेत. सदरहू रकमेचा लाभ मिळण्याकरीता उपरोक्त अर्जदाराने उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळणेसाठी उपरलिखित अर्ज केला आहे. अर्जामध्ये पूढे असेही नमूद केले आहे की, वरील अर्जदार यांचे शिवाय मयतास कोणीही उत्तराधिकारी नाही. सबब, उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे. करीता अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२९१/२०२६
**श्री.राजेश अधिक तीन -वि- गैरअर्जदार संतोष**
पुढील ता.०६.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Rajesh Purushottam Agrawal, Age 58 Yrs. Occu.: Doctor R/o Shree Gajanan Blood Bank, Neharu Square, Hanuman Temple, Yavatmal (Maharashtra) 445001
2. Sau.Seema Sunilkumar Pitti, Age 55 Yrs. Occu.: Household R/o M-1-105, Amrutganga Apartment, Sinhgad Road, Near Shorba Hotel, Manikbaug, Pune City, Pune, Anand Nagar (M.S.) -411051
3. Sau.Rekha Nitin Agrawal, Age 54 Yrs. Occu.: Household R/o D-105, Royal Imperio, Kokane Square, Rahatni Pune City, Pune Maharashtra. 411017
4. Gajanan Purushottam Agrawal, Age 52 Yrs. Occu.: Business R/o Nilgiri, Congress Nagar Road, Near Dr.Yadgire Hospital, Vijay Colony, Amravati. Tq. Dist. Amravati. Maharashtraa-444601

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Santosh Purushottam Agrawal, Age 50 Yrs. Occu.: Business R/o Nilgiri Congress Nagar Road, Near Dr.Jamthe Vijay Colony, Amravati. Tq. Dist. Amravati. Maharashtra-444601

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सितादेवी पुरुषोत्तम अग्रवाल** हे दिनांक 26.12.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. व **पुरुषोत्तम मदनलालजी अग्रवाल** हे दिनांक १८.०३.२००३ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **राजेश अधिक तीन विरुध्द गैरअर्जदार संतोष** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **राजेश अधिक तीन विरुध्द गैरअर्जदार संतोष** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२६.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१०/२०२६
**श्रीमती सुनंदा अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२५.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Sau.Sunanda Rameshrao Nandagawali, Age 63 Yrs. Occu.: Household R/o Near Priya Kirana, Yashoda Nagar No.1, Rukhmini Nagar,Amravati
2. Archana Jyotipal Chaware, Age 42 Yrs. Occu.: Service R/o M.Post Lohgaon, Amravati.
3. Satish Ramesh Nandagawali, Age 41 Yrs. Occu.: Service R/o Ward No.1, Yashoda Nagar, Near Priya Provision, Po.Rukhmini Nagar, Amravati, Tq.Dist.Amravati
4. Rina Vishal Rangari, Age 39 Yrs. Occu.: Household R/o Sanjay Gandhi Nagar No.1, Rukhmini Nagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **रमेश चंद्रभान नंदागवळी** हे दिनांक 03.05.2023 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुनंदा अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुनंदा अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

प्रो.नं.६३२/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.२६.०३.२०२६

वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय
किरकोळ अर्ज क्र./११४/२०२६ दिनांक २५.०३.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्जदार -**
१. सारिका गोपाल नेसनेसकार, वय ४२ वर्षे, धंदा - घरकाम
२. श्वेता गोपाल नेसनेसकार, वय १७ वर्षे, धंदा - शिक्षण
३. राम गोपाल नेसनेसकार, वय १३ वर्षे, धंदा - शिक्षण
अ.नं.२ व ३ करीता अ.पा.क.आई अ.नं.१
४. पंचफुला रामभाऊ नेसनेसकार, वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम
सर्व रा.पिंपळोद, ता.दर्यापूर, जि.अमरावती

--- विरुध्द ---

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **गोपाल रामभाऊ नेसनेसकार** हे दिनांक **२८.१०.२०२५** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** मयत **गोपाल रामभाऊ नेसनेसकार** यांचे नांवे मौजा पिंपळोद, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील शेत गट नं.१८३ क्षेत्र १.२१ हे.आर, आकार रु.७.१८, भो.वर्ग-२ही कुटुंबातील सामाईक शेती तथा मिळकत आहे.

आज दि.२६.०२.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

---

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३९९/२०२६
**श्रीकांत व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०९.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Shrikant Sanjay Sarode, Age 33 Yrs. Occu.: Business
2. Samrat Sanjay Sarode, Age 35 Yrs. Occu.: Business Both R/o Mardi Road, Sant Gadge Baba Colony, Amravati.
3. Priyanka Sanjay Sarode, Age 31 Yrs. Occu.: Service R/o Shitole Niwas Spine Road, Moshi Pradhikaran Sector 4, Pune

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **संजय उदेभानजी सरोदे आणि माधुरी संजय सरोदे** हे अनुक्रमे दिनांक 30.11.2025 व 20.12.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **श्रीकांत व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीकांत व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १७६**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

# ७०९ वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** होळी (दि.२) आणि धुलीवंदन (दि.३) या सणांच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहरात अपघात टाळण्यासाठी वाहतूक विभागाने विशेष मोहिम राबवत कडक नाकाबंदी केली. राजापेठ वाहतूक विभाग, गाडगेनगर वाहतूक विभाग आणि फ्रेजरपुरा वाहतूक विभाग यांच्या संयुक्त कारवाईत मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या एकूण ७०९ वाहनचालकांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात आली.

पोलीस आयुक्त आणि पोलीस उपायुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या सूचनेनुसार ही मोहीम राबविण्यात आली. राजापेठचे पोलीस निरीक्षक प्रविण वांगे, गाडगेनगरच्या पोलीस निरीक्षक रिता उईके आणि फ्रेजरपुराच्या पोलीस निरीक्षक ज्योती विल्लेकर यांच्या नेतृत्वात अधिकारी व अंमलदारांनी विविध चौकांवर तपासणी नाके उभारून नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई केली. दारू पिऊन वाहन चालविणाऱ्या १८ चालकांवर मोटार वाहन कायदा कलम १८५ अंतर्गत कारवाई करण्यात आली. ट्रिपल सीट प्रवास करणाऱ्या ३७३ जणांवर कलम १२८(१)/१९४(सी) नुसार दंड ठोठावण्यात आला. मॉडिफाइड सायलेंसर लावणाऱ्या २ वाहनांवर कारवाई झाली, तर वाहन चालविताना मोबाईलचा वापर करणाऱ्या ३१ जणांवर कलम १८४(सी) अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात आली. वाहतूक चिन्हांचा अवमान करून विरुद्ध दिशेने वाहन चालविणाऱ्या २३ चालकांवरही कारवाई झाली.

---

## पाहिजे

अमरावती, अचलपूर व वरूड येथे नामांकित लॉ फर्म मध्ये युवक व युवतींना पार्ट टाईम काम करण्याची संधी.
शिक्षण- १२ वी पास
पगार- १०,००० + टिए डिए + कमीशन (ट्रेनिंग झाल्यावर पगार वाढ व ईतर इन्क्रिमेंट्स)
**संपर्क - ९६०७५८२०९४**

---

## NAME CHANGE

OLD NAME
MUSHTAQ AHMAD SHAIKH IBRAHIM
NEW NAME
MUSHTAQUE AHMAD SK IBRAHEEM

ADDRESS
PIMPAL PURA
CHANDUR BAZAR
MOBILE 7020382954

---

## NAME CHANGE

OLD NAME
SAJID KHAN MAJID KHAN PATHAN
NEW NAME
SAJID KHAN MAJID KHAN

ADDRESS
DHARMAL PURA
CHANDUR BAZAR
MOBILE 9960578694

---

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३६२/२०२६
**रेहाना व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०७.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Rehana Parveen Isa Khan, Age 55 Yrs. Occu.: Household
2. Shirin Parveen Abdul Sharik, Age 37 Yrs. Occu.: Household
3. Imran Khan Isa Khan, Age 35 Yrs. Occu.: Service All R/o Taj Nagar No.1, Near Char Khamba Chauk Nawaz Medicals, Amravati. Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **इसा खान हुसेन खान** हे दिनांक 20.12.2013 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **रेहाना व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रेहाना व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## शुध्दीपत्रक

विद्यमान दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात दाखल कि.दि.अ.क.२५४२/२०२५ या कायदेशीर वारस प्रमाणपत्र प्रकरणामध्ये अर्जदारांनी यापुर्वी दिलेल्या जाहीरातीत अर्जदार नं.२ यांच्या नावामध्ये मुद्रणदोष राहिलेला आहे. जाहीरातीत अर्जदार नं.२ यांचे नांव **कल्पना श्रीकृष्ण लेंडे** असे प्रसिध्द झाले आहे. तथापि, अर्जदार नं.२ यांचे बरोबर व संपूर्ण नांव खालीलप्रमाणे आहे.

**कल्पना श्रीकृष्ण भोंडे**

ही दुरुस्ती सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

स्थळ - अमरावती
दिनांक ०१.०३.२०२६

अर्जदाराकडून अधिवक्ता
**ॲड.निखील पुरुषोत्त्मराव देशमुख,**
शिवप्रस्थ **१२ ब,** वृंदावन कॉलनी,
स्कूल ऑफ स्कॉलर शाळेमागे,
निंभोरा, अमरावती

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी खालील वर्णन केलेली स्थावर मालमत्ता (घर) सौ.वर्षा नवनीत डांगुर, वय ५९ वर्षे, व्यवसाय - गृहिणी, रा.नेवीपुरा, कारंजा लाड, ता.कारंजा, जि.वाशिम यांच्या बरोबर यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील असलेली मालमत्ता खरेदी करण्याचा सौदा सुर आहे.

**मिळकतीचे वर्णन** - नोंदणी पोटतुकडी अमरावती शहर वि.कचेरी अमरावतीचे कक्षेतील अमरावती मनपा च्या हद्दीतील मौजे-अकोली, प्रगणे-बडनेरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्वे नं.१६/३/२ मधील जमिनीतील मा.प्रशासक व नियोजन प्राधिकरण मनपा अमरावती यांचे दिनांक २६.०५.१९९२ चे आदेशान्वये व सहा.संचालक नगर रचना अधिकारी मनपा अमरावती यांचे दिनांक १०.०६.१९९२ चे पत्रातील अटी व शर्ती नुसार लेआऊट मंजूर व वि.जिल्हाधिकारी साहेब अमरावती यांचे फाईलावरील रे.के.नं. एन.ए.पी. ३४/आकोली-२१/१९९१-९२ नुसार कन्व्हर्शन मंजूर झालेल्या मधुसुदन कॉलनी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जागेतील प्लॉट नं.१०३ (एकशे तीन) याची साईज ९ मी.X १८ मिटर असून याचे एकुण क्षेत्रफळ १७४३.१२ चौ.फुट (१६२.०० चौ.मी.) आहे. यावर सहा.संचालक, नगर रचना अधिकारी, मनपा अमरावती यांचे पत्र क.अमनपा/संसनर बां.प.हु.नं.०४८०, दिनांक २२.०१.२०२० नुसार बांधलेले विटा सिमेटचे व स्लॅब असलेले घर यात एक हॉल, एक किचन, डायनिंग, एक बेडरुम, दोन मास्टर बेडरुम, संडास बाथरुम, पोच कम्पौड वॉल, इलेक्ट्रिक मिटर व फिटीग, नळ फिटीग, बोअरवेल व यात असलेल्या तदंगभूत वस्तुसह बांधकामाचे एकुण क्षेत्रफळ ७७.९ चौ.मि. आहे. याची सामाईक चतुःसिमा खालीलप्रमाणे--
पुर्वेस - प्लॉट नं.१०२, पश्चिमेस - प्लॉट नं.१०४, उत्तरेस - लेआऊटमधील रोड, दक्षिणेस - प्लॉट नं.७८.

तरी वरील स्थावर मालमत्तेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, गहाण, बोझा, वारसा हक्क, जप्ती, कर्ज, ताबा अथवा कोणत्याही कुठल्याही प्रकारचा अधिकार असल्यास नोटीस प्रकाशित झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत पूर्ण लेखी पुराव्यासह माझ्या वरील नमुद पत्त्यावर, माझेशी संपर्क साधावा. मुदतीनंतर माझे पक्षकार कराराप्रमाणे वरील स्थावर मालमत्तेची रितसर नोंदणीकृत खरेदी करुन घेतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी. याकरीता सदर जाहीरनोटीस.

ठिकाण - अमरावती
दिनांक ०४.०३.२०२६

**(ॲड.प्रतिक पी.पाटील)**
अमरावती
ऑफिस-ग्राऊंड फ्लोअर, श्रीराम सुपर मार्केट,
श्रीराम मंदिर समोर, कोल्हटकर मंगल
कार्यालयाजवळ, राजापेठ, अमरावती
मो.नं.९८६०८२७९४७

---

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.३५७/२०२६
**नलिनी व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०७.०४.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

